## University of Mumbai
### INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
### OFFERS FOLLOWING PROGRAMMES

| PROFESSIONAL PROGRAMMES |
| --- |
| 1. B.Sc. IT |
| 2. B.Sc. Computer Science |
| 3. M.Sc. IT |
| 4. M.Sc. Computer Science |
| 5. M.C.A. |

| TRADITIONAL PROGRAMMES | |
| --- | --- |
| 1. B.A. | 7. M.A. in English |
| 2. B.Com. | 8. M.A. in Sociology |
| 3. M.Com. | 9. M.A. in History |
| 4. M.Sc. Mathematics | 10. M.A. in Economics |
| 5. M.A. in Marathi | 11. M.A. in Education |
| 6. M.A. in Hindi | 12. M.A. in Political Science |

| P.G. DIPLOMA COURSES | |
| --- | --- |
| | 1. Diploma in Financial Management (DFM) |
| | 2. Diploma in Operating Research in Management (DORM) |



University of Mumbai
INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING
Dr. Shankar Dayal Sharma Bhavan, Vidyanagri, Santacruz (East), Mumbai 400 098
Published by Director, IDOL on behalf of University of Mumbai.
https://mu.ac.in/distance-open-learning
9789391735029

द्वितीय वर्ष कला सत्र-III (CBCS)

मराठी अभ्यासपत्रिका क्र. II विषय कोड : UAMAR301

# University of Mumbai
## INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

# द्वितीय वर्ष कला
## सत्र - III (CBCS)

# मराठी अभ्यासपत्रिका क्र. II

## विषय कोड : UAMAR301

# द्वितीय वर्ष कला

## सत्र - III (CBCS)

# मराठी अभ्यासपत्रिका क्र. - II

## विषय कोड : UAMAR301

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **अनिल बनकर**
कला आणि मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रा. मनिषा बनकर**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. डॉ. सिताराम म्हस्के**
बिर्ला महाविद्यालय, बिर्ला कॉलेज रोड,
मुरबाड रोड, कल्याण (प), ठाणे

: **डॉ. गजानन अपिने**
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**ऑगस्ट २०२१, मुद्रण - १ ISBN : 978-93-91735-02-9**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** मुंबई युनिव्हर्सिटी प्रेस
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | कादंबरी : एक साहित्यप्रकार – प्रा. मनिषा बनकर | ०१ |
| २) | ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ – प्रा. डॉ. सिताराम म्हस्के | १४ |
| ३) | ‘दिवे गेलेले दिवस’ - प्रा. डॉ. गजानन अपिने | ४५ |


❖❖❖❖

## द्वितीय वर्ष कला,
## सत्र - III, मराठी अभ्यासपत्रिका क्र. II

द्वितीय वर्ष, कला (मराठी) अभ्यासपत्रिका क्र. २ च्या अभ्यासक्रमात तिसऱ्या सत्रात 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय व दोन कादंबऱ्या यांचा समावेश आहे. चौथ्या सत्रात 'आत्मकथन' या साहित्यप्रकाराची ठळक वैशिष्ट्ये व दोन आत्मकथने यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम दोन सत्रात अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम दोन सत्रात विभागला असून नेमलेल्या विशिष्ट तासिकांमध्ये तो शिकवला जाणे आवश्यक आहे.

**सत्र ३, एकूण व्याख्याने ४५, श्रेयांकने ३**

**घटक १ - कादंबरी : एक साहित्यप्रकार - परिचय (१५ तासिका) श्रेयांकन १**

कादंबरी हा कथनात्मक साहित्यप्रकार त्या दृष्टीने त्याच्या घटकांची माहिती कथानक, निवेदन, व्यक्तिरेखा, भाषा, निवेदनाचे प्रकार, व्यक्तिरेखांचे प्रकार, कादंबरीची एकूण संरचना.

**घटक २ : 'थँक यू मिस्टर ग्लाड', - कादंबरी - अनिल बर्वे पॉप्युलर प्रकाशन (१५ तासिका) श्रेयांकन १**

**घटक ३ : 'दिवे गेलेले दिवस', - कादंबरी - रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन (१५ तासिका) श्रेयांकन १**

**तृत्रीय सत्रांत परिक्षा - गुण १०० :**

वरील अभ्यासपत्रिकेचे प्रथम सत्रान्त प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे.

**द्वितीय वर्ष कला, मराठी अभ्यासपत्रिका क्र. ३**

प्रश्न १ 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचा सैद्धान्तिक परिचय यावर पर्याय देऊन एक प्रश्न - गुण २०.

प्रश्न २ 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीवर पर्याय देऊन एक प्रश्न - गुण २०.

प्रश्न ३ 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीवर पर्याय देऊन एक प्रश्न - गुण २०.

प्रश्न ४ प्रत्येक गटातील एकेक टीप लिहा (अंतर्गत पर्यायांसह) - गुण ३०.

१) आत्मकथनाचा सैद्धान्तिक परिचय
२) 'थँक यू मिस्टर ग्लाड'
३) 'दिवे गेलेले दिवस'

प्रश्न ५ अभ्यासपत्रिकेतील घटक २ व ३ वर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न. प्रत्येक घटकावर ४ असे एकूण ८ वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न विचारले जातील, परीक्षार्थींनी त्यापैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवायचे आहेत. प्रत्येक योग्य उत्तरास २ गुण असे एकूण गुण १०.

❖❖❖❖

# १

# कादंबरी : एक साहित्यप्रकार

**घटक रचना :**


१.० उद्देश

१.१ प्रस्तावना

१.२ कादंबरीची व्याख्या

१.३ मराठी वाङ्मयाचा उदय

१.४ कादंबरी वाङ्मयाचे स्वरूप

१.५ कादंबरीचे विशेष

१.६ कादंबरीचे घटक

१.६.१ कथानक

१.६.२ व्यक्तिचित्रण

१.६.३ भाषा

१.६.४ व्यक्ती आणि समाज यांचे अतूट नाते

१.६.५ वातावरण

१.६.६ रचनापद्धती

१.७ कादंबरी वाङ्मयाचे प्रकार

१.७.१ सामाजिक कादंबरी

१.७.२ दलित कादंबरी

१.७.३ ग्रामीण कादंबरी

१.७.४ ऐतिहासिक कादंबरी

१.७.५ मानसशास्त्रीय कादंबरी

१.८ समारोप

१.९ संदर्भग्रंथ सूची

१.१० संभाव्य प्रश्न


## १.० उद्देश

- कादंबरी वाङ्मयाविषयी आवड निर्माण करणे.
- विविध कादंबरीकारांची माहिती मिळविणे.

- कादंबरी वैशिष्टांचा अभ्यास करणे.
- वेगवेगळ्या समाजजीवनातील माहिती मिळविणे.
- विविध कालखंडांतील कादंबरीचा अभ्यास करणे.
- कादंबरीतील जीवनानुभवाची माहिती घेणे.
- विशिष्ट कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय परिस्थिती लक्षात घेऊन कादंबरीची वैशिष्ट्ये तपासणे.
- कादंबरी वाचनाची आवड निर्माण करणे.

## १.१ प्रस्तावना

कादंबरी हा अत्यंत लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. साहित्य म्हणजे जीवनानुभवांचे प्रकटीकरण होय. कादंबरी हा एक दीर्घ कथनात्मक साहित्यप्रकार आहे. या साहित्यप्रकाराला अभ्यासतांना आपणास काळ, आवाज, करार या संकल्पना लक्षात घ्याव्या लागतात. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक मानला जातो. या साहित्यप्रकारात मानवी जीवनाचे संपूर्ण वर्णन केले गेलेले असते. मानवी जीवनातील व्यक्ती आणि समाजाचे अनेकविध प्रश्न विविध घटनेतून मांडलेले असतात. कादंबरी हा साहित्यप्रकार कल्पनाधिष्ठित प्रकार आहे. इंग्रजीतील 'Novel' वरुन मराठीत 'कादंबरी' हा साहित्यप्रकार आला आहे असे मानले जाते. अशा Novel ची व्याख्या इंग्रजीतही करणे अवघड असल्याची कबुली देण्यात आली आहे. (The most protean of Literary forms, the Novel is the Least amenable to formal definitions.) याचे कारण कादंबरीत केवळ त्याच साहित्यप्रकाराचे वैशिष्ट्ये म्हणून सांगायला जावे तर तिची वैशिष्ट्ये मान्य साहित्यप्रकारातही आढळतात. सामान्यतः कादंबरी हा एक गद्य कल्पनाधिष्ठित साहित्यप्रकार असल्याचे दिसून येते.

## १.२ कादंबरीच्या व्याख्या

कादंबरी हा विस्तृत स्वरूपातला प्रवाही असा साहित्यप्रकार आहे. 'कादंबरी' म्हणजे काय? असा प्रश्न येथे उपस्थित व्हावा हे स्वाभाविक आहे. साहजिकच 'कादंबरीची व्याख्या सांगणे क्रमप्राप्त होते. पण नेमक्या वेचक शब्दात कादंबरीची व्याख्या सांगणे तितके सापे नाही. कादंबरीची व्याख्या करता येत नाही याचे कारण तिच्यात सर्व साहित्यप्रकारांच्या वैशिष्ट्यांचा समावेश होतो. काहीवेळा ती काव्यमय होते, काहीवेळा ती विवेचन करते, काहीवेळा वर्णन, भाष्य करत असते.

**१. भालचंद्र नेमाडे यांची व्याख्या :**

"कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत, अशी साहित्यकृती असते. कादंबरीत या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोट समूहाचे, पोट संस्कृतीचे

तपशीलवारपणे दर्शन घडविलेले असते. आशयसूत्र बळकट असतात. पात्रे सलग उभी असतात."

**२. रा. ग. जाधव यांची व्याख्या :**

"कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व त्यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इत्यादी घटकांना गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी."

**३. इंग्रजी अभ्यासकांच्या व्याख्या :**

कादंबरी वाङ्मयाला पाश्चात्त्य देशांत प्रारंभ झाला. त्यामुळे बऱ्याच इंग्रजी अभ्यासकांनी कादंबरीच्या व्याख्या केल्या आहेत.

**विल्यम लिटिल :**

"Novel is a fictious prose narrative of considerable length in which characters and actions representative of real life are portrayed in a plot of more or less complexity." म्हणजे "जीवनाची प्रतिनिधित्व करणारी पात्रे व त्याचे कार्यव्यापार ज्यात चित्रित केलेले असतात अशा कल्पित गद्यकथेला अथवा वृत्तांताला कादंबरी म्हणतात."

**अर्नेस्ट बेकर :**

"The interpretation of human life by means of fictions narrative in prose." म्हणजे "मानवी जीवनाचे स्पष्टीकरण ज्यात केलेले असते अशा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय."

## १.३ कादंबरी वाङ्मयाचा उदय

प्राचीन काळात कादंबरी ही दीर्घ कथात्मक स्वरूपात लिहिली जात असे. प्राचीन काळात काव्य-महाकाव्य लिहिली जात असे. ती एक कादंबरी स्वरूपाची दीर्घ कथा असे काव्यामधून ती सांगितली जात असे. मध्ययुगात मुद्रणकला अवगत झाल्यामुळे गद्यलेखन लिखित स्वरूपाचे आले. त्यामुळे महाकाव्याची कथा गद्यात लेखन होऊ लागली आणि अखेर इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावातून कादंबरी वाङ्मयप्रकार विकसित झाला. प्राचीन काळातील महाकाव्य ही मुद्रणकलेमुळे गद्य स्वरूपात लिहिले जाऊ लागले. यातूनच कादंबरी साहित्यप्रकार जन्माला आला. 'Novel' या पाश्चात्त्य वाङ्मयप्रकारावरुन मराठी साहित्यात 'कादंबरी' हा साहित्यप्रकार मराठीत उदयास आला.

आधुनिक काळात इंग्रजी राजवट आल्यामुळे भारतात दोन प्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. ती म्हणजे अद्भुतरम्य कादंबरी आणि वास्तववादी कादंबरी होय.

**अद्भुतरम्य कादंबरी :**

"महाकाव्यापासून जन्माला आलेल्या कादंबरीला अद्भुतरम्य कादंबरी असे म्हणतात."

**वास्तववादी कादंबरी :**

"जी कादंबरी इतिहास डोळ्यासमोर ठेवून लिहिली गेली तिला (Novel) वास्तववादी कादंबरी म्हणतात."

दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांमध्ये आपणास जीवनदर्शन आणि जीवनातील सत्य, समस्या यांचा उलगडा होत असतो. कोणत्याही प्रकारची कादंबरी असो, त्यातून आपणास मानवी जीवनाचे दर्शन होते आणि जीवन समजण्यास मदत होते.

## १.४ कादंबरी वाङ्मयाचे स्वरूप

कादंबरीची व्याख्या करता येत नाही, तरी तिचे स्थूल स्वरूप सांगण्याचा प्रयत्न करता येईल तो असा :

अ) कादंबरी हा दीर्घ कथा असलेला गद्य प्रकार आहे. तिचा व्याप आणि कालपट इतर साहित्यप्रकारापेक्षा मोठा असतो.

ब) मानवी जीवनाचे दर्शन अधिक समग्रपणे ती घडवू शकते.

क) आपले कथानक व्यक्तीभोवती कादंबरीने गुंफलेले असते. क्वचितच पशुपक्षीही तेथे प्रवेश करतात. पण ते माणसांचीच भाषा बोलतात.

ड) निवेदन हा एकमेव पर्याय तिला आविष्कारासाठी अवलंबवावा लागतो.

इ) तिचे विषय आणि प्रांत अमर्याद असतात. असे असले तरी नेमक्या शब्दात तिचे स्वरूप टिपता येईलच असे नाही. विशेष म्हणजे कादंबरीचे स्वरूप सांगण्याचा त्याच्या उत्पत्तीविषयीचा प्रयत्न कोणीही केल्यास तो धाडसाचा ठरेल.

**कादंबरी निवेदनाचा आधार :** कादंबरी हा एक कथात्मक साहित्यप्रकार असून निवेदन हा तिचा एकमेव आधार आहे. तिला स्वतःला प्रकट व्हायचे असेल तर हे निवेदन त्रयस्थपणे, स्वतःच्या मुखाने, वेगवेगळ्या पात्रांच्या मुखाने, पत्राद्वारा, डायरीतून, आत्मकथाच्या मार्गाने किंवा अन्य कोणत्यातरी स्वरूपातच करावे लागते.

**विविध अभिरूचीचे वाचक :** 'आजकालच्या गोष्टी' मधून म्हणून लिहिल्या गेलेल्या हरिभाऊ आपट्यांच्या वास्तववादी कादंबऱ्यांनी ज्या वाचकवर्गांत कादंबरीची आस्था निर्माण केली, त्यानंतरच्या ना. सी. फडकेंच्या रंजनवादी कादंबरीने याच वाचकवर्गाची कक्षा वाढविली. तरुण वाचकांना वेड लावले आणि वास्तववादाचा मुखवटा धारण करणारी ही कादंबरी संख्येने मोठा वाचकवर्ग निर्माण करून गेली, पण याच पार्श्वभूमीवरच्या व्यक्तीमनाचा वेध घेणाऱ्या चिं.त्र्यं. खानोलकरांच्या 'रात्र काळी घागर काळी', श्री. ना. पेंडशांच्या 'गारंबीचा बापू' या कादंबरीची वैशिष्ट्येही लक्षात घ्यावी लागतात. गो. नी. दांडेकर, र.वा. दिघे, व्यंकटेश माडगुळकर ही नावेही येथे वेगळ्या संदर्भात घ्यावी लागतील. ग्रामीण जीवनाचे, प्रादेशिकतेचे, कोकणच्या पार्श्वभूमीचे चित्रण यामुळेही मराठी कादंबरीने आपल्या 'सदाशिव पेठी' वातावरणातून दूरवर हातपाय पसरल्याचे जाणवते.

कादंबरी कल्पित स्वरूपाची असल्यामुळे विशिष्ट लेखक, त्याला भावलेले विशिष्ट वातावरण या स्वरूपात कादंबरी निर्माण करतो. म्हणूनच कादंबरीचे स्वरूप लेखकाच्या अनुभवावर आणि विचारशक्तीवर अवलंबून असते.

## १.५ कादंबरीचे विशेष

- कथात्मकता हा कादंबरीचा प्रमुख विशेष आहे.
- काळाचा व्यापक पट कादंबरीमध्ये चित्रित केलेला असल्याने तिचे स्वरूप दीर्घ असते.
- कथानक, पात्रचित्रण, भाषा, निवेदन, वातावरणनिर्मिती, वर्णन इ. महत्त्वाचे घटक कादंबरीमध्ये समाविष्ट होतात.
- कादंबरी ही कोणत्याही विषयावर आधारलेली असते. तिला विषय मर्यादा असत नाही.
- कादंबरीमध्ये समाज वास्तवावर आधारित सत्य जीवनाचे संपूर्ण चित्रण केलेले असते.
- घटना कल्पनेच्या माध्यमातून रंगून सांगितल्या जातात. त्यामुळे तो इतिहास न वाटता वास्तव कादंबरी वाटते.
- कादंबरीत वातावरण निर्मिती केली जाते, त्यातील घटना प्रत्यक्षात घडल्या आहेत असे वाटते.
- लेखक आपल्या कादंबरीत घटना, प्रसंग, भाषा (साधी, सोपी) वापरत असतो, त्यामुळे वातावरणाला भावेल अशी कादंबरीची निर्मिती होते.

## १.६ कादंबरीचे घटक

कादंबरी हा दीर्घ स्वरूपाचा लेखनप्रवास असतो. तो प्रवास दीर्घ करणारे अनेक घटक तिच्यामध्ये अंतर्भूत असतात. त्यामध्ये कादंबरीचा लेखक, कथानक, व्यक्तिरेखा, भाषा, वातावरण, वर्णनशैली इ. अनेक घटक असतात. कादंबरीच्या लेखकाला 'कादंबरीकार' असे संबोधले जाते.

**लेखक :** कादंबरीचे घटक कोणते या दृष्टीने विचार केला तर सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून लेखकाचा / कादंबरीकाराचाच विचार करावा लागेल. लेखकाच्या मनोभूमीतून कादंबरीचा जन्म होतो. त्याचे व्यक्तीमन, जीवनविषयक दृष्टिकोन, त्याच्यावरील संस्कार, त्याच्या प्रतिभेची झेप, त्याचे समाजावलोकन, त्याचे ज्ञान, त्याची वृत्ती-प्रवृत्ती, अभ्यास या गोष्टीचा परिणाम त्याच्या साहित्यकृतीवर होत असतो. कादंबरीतील लेखकाचे अस्तित्व वाचकाला जाणवत असते. कधी तो कादंबरीच्या निवेदकाकरवी बोलत असतो तर कधी स्वतःच कादंबरीचे निवेदन करत असतो. नाटकामध्ये जसा लेखक अदृश्य असतो. त्याने निर्माण केलेली पात्रेच केवळ संवादातून व्यक्त होतात. पण कादंबरीत पात्रांच्या संवादा व्यतिरिक्त लेखक वर्णन व निवेदनातून वाचकाला सतत जाणवत असतो.

लेखक ज्या वातावरणात वाढत असतो, त्या सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचे त्याच्यावर परिणाम होत असतात. निसर्गाचाही त्यात वाटा असतो. उदा. हरिभाऊ आपट्यांच्या

'उषःकाल' मधल्या पहिल्या प्रकरणात रात्रीच्या वेळी पावसात घौडदौड करणारा घोडेस्वार याची साक्ष पटते.

**१.६.१ कथानक :**

कथानक हा महत्त्वाचा घटक आहे. कथानकाशिवाय कादंबरी पूर्ण होत नाही. कथानकात घटना आणि प्रसंगांची साखळी असते. प्रारंभ, मध्य, शेवट या तीन अवस्थेतून कथानकाचा विकास होत असतो. कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता, कार्यकारणमीमांसा व कुतूहल निर्मिती हे गुण आवश्यक असतात. चांगल्या कथानकात एका प्रसंगातून दुसरा प्रसंग स्वाभाविकपणे तर उद्‌भवतोच, पण कथानकाला पुढे कशी गती मिळणार याविषयी वाचकाच्या मनात कुतूहल निर्माण होते, ही उत्कंठा सतत टिकविणे यातच लेखकाचे कौशल्य दिसून येते.

**१.६.२ व्यक्तिचित्रण :**

लेखक हाच कादंबरीचा मुख्य घटक असतो यात शंकाच नाही. पण लेखकाने निर्माण केलेली व्यक्ती हा कोणत्या साहित्यप्रकाराचा केंद्रबिंदू आहे, कादंबरीही त्याला अपवाद नाही. पण कादंबरीतील व्यक्तीचा विशेष असा की, येथे कादंबरीकार व्यक्तीकडे कोणत्याही अंगाने पाहू शकतो. कवितेमध्ये व्यक्तीमनाला दिलेले महत्त्व पुरेसे होते, नाटकात व्यक्तीमन, त्याचा स्वभाव, त्याचा रागालोभादी विकास, त्याची जीवनदृष्टी, त्याचा पराक्रम यांचे दर्शन घडविता येत असले तरी व्यक्तीचे बाकीचे बारकावे वाचकाने समजून घ्यायचे असतात. व्यक्तीचे अंतर्बाह्य चित्रण करण्याचे स्वातंत्र्य कादंबरीकाराखेरीज कोणताच कलाकार घेऊ शकत नाही. कादंबरीतील व्यक्ती ते घटक अमर्याद असल्यामुळे तिचे शरीर आणि मन पूर्णांशाने उघड करून दाखविण्याची किमया फक्त कादंबरीकारच करू शकतो.

कादंबरीतील व्यक्तिचित्रण हा कादंबरीकाराचा हुकमी एक्का आहे. ज्या व्यक्तीभोवती कथानकाची गुंफण केली जाते, त्या व्यक्तीवर सारे लक्ष लेखकाला (पर्यायाने वाचकाला) केंद्रित करावे लागते. व्यक्तीचे मत हे नाटकात, चरित्रात, लघुनिबंधात चित्रित केलेले नसते हे खरे, पण त्याला पथ्य पाळून व्यक्त व्हायचे असते. त्यामुळे पूर्णांशाने त्याच्या मनाचे पापुद्रे उकलण्यास अवसर मिळत नाही. उलट कादंबरीकाराला भरपूर अवसर असतो. त्याने निर्माण केलेली पात्र त्याच्या हातून जिवंत होत असते.

व्यक्ती आणि समाज याचे अतूट नाते असते, ही गोष्ट कादंबरी व्यक्तिचित्रणाच्या द्वारा सिद्ध करू शकते. कादंबरीत वावरणारी व्यक्ती वर्तमान काळाइतकीच भूतकाळातूनही फिरताना दिसते. लेखक तो काळ आपल्यापुढे उभा करू शकतो.

उदा. वि.स. खांडेकरांची 'ययाती'तील बोलणारी पात्रे गतकाळातील घटना सांगत सांगतच कथानकाची गती प्रवाही ठेवताना दिसतात.

भालचंद्र नेमाड्यांची 'कोसला' मधला पांडुरंग सांगवीकर आपल्या बरोबरच वाचकाला वर्तमानकाळात फिरवित राहतो.

**१.६.३ भाषा :**

भाषेद्वारे मानव विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करत असतो. त्याचे माध्यम भाषा असते. भाषा ही खास मानवी संवादासाठीची व्यवस्था आहे. मानवाच्या बाह्य व्यवहाराबरोबर भाषा मनातील अंतरिक व्यवहार देखील पार पाडत असते. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर परिस्थितीचा प्रभाव असतो. भाषा ही प्रवाही असते म्हणून ती सतत बदलत असते. कारण की भाषा ही व्यक्तीपरत्वे, जातीजमातीनुसार, काळानुरूप, भौगोलिक प्रदेशानुसार बदलत असते.

भाषा हा कादंबरीचा महत्त्वपूर्ण घटक आहे. साहित्याची निर्मिती, आकलन, आस्वाद, समीक्षा ही भाषेद्वारेच होत असते.

भाषेच्या अंगी निर्मितीशीलता असते. म्हणूनच भाषा नवा अनुकर स्वीकारु शकते, नवा अनुभव मांडू शकते. भाषेमुळेच आपण भूतकाळातील कोणतीही घटना सांगू शकतो. भाषेमुळेच आपल्या डोळ्यासमोर हुबेहुब आकृती उभी राहते.

वाङ्मयप्रकारानुसार भाषा आपली रूपे बदलत असते. उदा. कवितेत संवादातून भाव व्यक्त होतात, निबंधात मुद्देसरपणा चर्चा असते. नाटकात साधनरूप भाषा असते तर कादंबरीमध्ये कधी साधनरूप तर कधी माध्यमरूप भाषा असते.

भाषा हा कादंबरीचा महत्त्वपूर्ण घटक आहे. साहित्यिकाची प्रतिमा रूपाद्वारे प्रकट होत असते.

**१.६.४ व्यक्ती आणि समाज यांचे अतूट नाते :**

व्यक्ती आणि समाज हा कादंबरीचा मुख्य आधार असल्यामुळे लेखक त्याला भावलेले आणि अनुभवलेले जीवन कल्पनेच्या बळावर निर्माण करतो. मानवी जीवनाचे संपूर्ण चित्रण त्याच्या कल्पनेच्या अनुषंगाने तो करतो आणि त्यातूनच कादंबरी तयार होते. मानवी जीवनाची उकल करण्यास कादंबरी हे महत्त्वाचे साधन ठरले आहे.

कादंबरी हा साहित्यप्रकार समाजजीवनाबरोबरच वाहून जाणारा असल्यामुळे समाजजीवनातले व्यवहार, माणसांमाणसातील आपआपसातील संबंध, राग, लोभ, हर्ष, खेद, द्वेष या भावना त्याच्या केंद्रस्थानी साधूनच असतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तीच्या विविध कृती-प्रतीतून घडत असते. म्हणून व्यक्ती आणि साधन यांचे अतूट नाते असते.

**१.६.५ वातावरण :**

कादंबरीत व्यक्ती इतकेच वातावरण या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. आजच्या मराठी कादंबरीचा जो प्रवास झाला आहे, तो पाहता तिने आपल्या आवडीचे वातावरण वेळोवेळी हाताळले आहे. उदा. अगदी प्रारंभीची 'मुक्तामाला-मंजुघोषा' प्रवृत्तीची कादंबरी अद्‌भुतरम्य वातावरणात रंगलेली होती.

पुण्यातले सदाशिवपेठी वातावरण हा तर हरिभाऊ आपट्यांच्या सामाजिक वास्तववादी कादंबऱ्यांवर शिक्का मारला गेला होता. फडके-खांडेकरांनी शहरातल्या उच्चभ्रू वर्गातून नायक-नायिका निवडल्या, फडक्यांनी सुखवस्तू वातावरण व स्वप्नाळू सृष्टी निर्माण करून त्याकाळाच्या

तरुण पिढीला वेड लावले. खांडेकरांच्या कादंबऱ्यातील नायक पुष्कळसे दारिद्र्य, ध्येयवाद, राजकारण, देशसेवा, तुरुंगवास या वातावरणातून घडत होते. श्री. व्यं. केतकरांनी तर समाजच अस्वस्थ करून सोडला. वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांनी स्त्रियांच्या भोवतालच्या परिस्थितीचा व कौटुंबिक वातावरणाचा वेध घेऊन त्यांच्या प्रश्नांना बोलके केले.

मराठी कादंबरीने शहरी भागातून प्रादेशिक वातावरणात, ग्रामीण जीवतात जे हात पाय पसरले त्यामुळे लेखकांना व्यापक अनुभव घ्यायला जागा मिळाली. लेखकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाला तो उपकारकच ठरला. त्याच्या अनुभवाचे क्षितिज विस्तारले आहे.

एकंदरीत कादंबरीत वातावरणाचा खूप मोठा प्रभाव पडतो.

### १.६.६ रचनापद्धती :

कादंबरीत तिच्या रचनापद्धतीचा पण विचार करावा लागतो. कलाकृतीत 'काय सांगितले आहे' यापेक्षा 'कसे सांगितले आहे' याला महत्त्व असते आणि ते रचनापद्धतीमुळे साधले जाते. कादंबरी लेखन हे प्रारंभी निवेदन स्वरूपाचे तृतीय-पुरुषी कथनाद्वारे केल्याचे आढळून येते. लेखकाने आपल्या आवडीनुसार प्रथम (म्हणजे आत्मकथनपर) निवेदन, पात्रांच्या मूखातून निवेदन, क्वचित पत्रातून कथा चालू ठेवण्याची पद्धती, कधी डायऱ्यांतून निवेदन असे विविध रचनाप्रकार हाताळलेले दिसतात. कादंबरी जितकी म्हणून रंजक व आकर्षक वाटेल तितकी करण्यासाठी योग्य ती निवेदनपद्धती लेखकाला वापरता येते. ते स्वातंत्र्य लेखकाने घ्याचे असते. कादंबरी कोणतीही असो तिची रचनापद्धती कोणतीही असो, लेखकाला निवेदन हे माध्यम स्वीकारल्यावाचून आपली कलाकृती प्रकट करताच येत नाही.

### १.६.७ कादंबरीचे निवेदन :

कथानक, पात्रचित्रण या घटकाबरोबरच निवेदन हा एक कादंबरीचा विशेष आहे. कादंबरीत कथानक किंवा तिचे साकाररूप त्यातील निवेदन तंत्रामुळे सिद्ध होत असते. मराठीमध्ये प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी अशी दोन मुख्य निवेदनपद्धती आहेत. यातील प्रथमपुरुषी निवेदनात कादंबरीतील एखादे पात्र 'मी' या संबोधनाने कथा कथन करत असते. तर तृतीयपुरुषी निवेदनात कादंबरीची कथा कादंबरीबाहेरील एखादी व्यक्ती तटस्थतेने सांगत असते, वर्णन करत असते. या दोन पद्धतीशिवाय संवादशैली, पत्रात्मक निवेदन तंत्राचाही कादंबरीकार वापर करत असतो. पत्रात्मक कादंबरीमध्ये पु.शि. रेगे यांची 'सावित्री' ही कादंबरी येते.

### १) प्रथमपुरुषी निवेदनपद्धती :

आत्मसंवादी स्वरूपाच्या निवेदनासाठी प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर केला जातो. यामध्ये कादंबरीच्या केंद्रस्थानी कादंबरीची 'मी' ही व्यक्तिरेखा असते. तिच्या नजरेतून संपूर्ण कादंबरीचे कथन सांगितले जात असते. कादंबरीचे आशयसूत्र, त्यातील घटना, सुख-दुःखे, भावना या सर्व कादंबरीतील 'मी' या व्यक्तिरेखेशी जोडलेल्या असतात. यामध्ये कादंबरीतील हा निवेदक इतर पात्रांच्या मनात काय चालले आहे किंवा त्यांना जाणवणाऱ्या भावनांचे वर्णन करू शकत नाही. ही मर्यादा या निवेदन पद्धतीला असते.

### २) तृतीयपुरुषी निवेदनपद्धती :

प्रथमपुरुषी निवेदनात कादंबरीचे सर्व कथन कादंबरीतील एखादे पात्र स्वतःच्या नजरेतून करत असते तर तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीमध्ये कादंबरीचे कथन कादंबरीबाह्य सर्वसाक्षी असणारा निवेदक करत असतो. कथेमध्ये घडणाऱ्या घटना किंवा सुख-दुःखाच्या गोष्टी हा निवेदक केवळ सांगत असतो. त्याचा त्या घटनांशी किंवा भावनांशी काहीही संबंध असतोही किंवा नसतोही. हा निवेदक कादंबरीतील एखादे पात्रही असू शकते पण तोही सर्वसाक्षी असतो. म्हणजे तो स्वतःबरोबर कादंबरीतील इतर पात्रांच्या मनातील भावनांचे चित्रण, वर्णनही करत असतो. त्याला अशा गोष्टींचे वर्णन करण्यास मर्यादा असत नाहीत. मराठीतील बहुतांश कादंबरीमध्ये या निवेदन पद्धतीचे अधिक अवलंब झालेला दिसतो.

### इतर निवेदनपद्धती :

**अ) आत्मसंवादी निवेदनपद्धती :** कादंबरीतील निवेदक हा स्वतःच्या भावना स्वतःशीच बोलत असतो. जसे नाटकामध्ये स्वगते असतात त्याच पद्धतीने कादंबरीतील हा निवेदक स्वतःच्याच जगण्याबद्दल स्वतः बोलत असतो. हे बोलणे स्वगताप्रमाणेच असते. असे निवेदन तंत्र मात्र मर्यादेनेच वापरले जाते. सबंध कादंबरीभर हे निवेदन वापरले जात नाही तर इतरही निवेदनाचा आधार त्यावेळी घेतला जातो.

**आ) संवादात्मक निवेदनपद्धती :** नाटकाशी साम्य असणारी ही निवेदन पद्धती काही कादंबरीमध्ये वैशिष्ट्यपूर्णरित्या वापरली जाते. कादंबरीत घडणाऱ्या घटना आणि त्यामध्ये व्यक्तिरेखांचा सहभाग निवेदकाला थेटपणे दाखवायचा असेल तेव्हा कादंबरीतील पात्रे एकमेकांशी बोलू लागतात. या बोलण्या व्यतिरिक्त त्यांच्यामध्ये घडणाऱ्या घटना निवेदक मध्ये - मध्ये कादंबरीमध्ये सांगत असतो. हे संवाद घटनेला पुढे नेत असतात किंवा एकमेकांच्या संवादातून कादंबरीत घडणाऱ्या घटनेच्या अर्थाचे सूचन करत असतात. त्यामुळे कादंबरी गतिमान बनत असते. काहीवेळा हे संवाद विशिष्ट विषयावरील चर्चेसारख्या असतात व कादंबरीच्या विषयाची खोली या चर्चांमधून सुचवित असतात. या निवेदनाद्वारे कादंबरीकार कादंबरीतील पात्रांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी उपलब्ध करुन देत असतो.

### इ) पत्रात्मक निवेदनपद्धती :

ही निवेदनपद्धती ही प्रथमपुरुषी निवेदन स्वरूपाची असते. तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीमध्ये निवेदक सर्वसाक्षी असतो त्यामुळे तो सर्वांच्या मनातील भावनांचे कथन करत असतो. त्यामानाने प्रथमपुरुषी निवेदकावर मर्यादा येत असल्याने तो अशा स्वरूपाच्या निवेदनाचा वापर करत असतो. ज्यातून निवेदकाव्यतिरिक्त दुसऱ्या पात्राच्या मनातील भावना, वृत्ती किंवा इतर गोष्टी वाचकांना कळवून द्यायच्या असतील तेव्हा कादंबरीत पत्रांचा समावेश करुन ते हे काम सोपे करत असतो. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला लिहिलेल्या पत्रातून त्याचे विचार, भावना याचा प्रत्यय वाचकाला येत असतो. उदा. पु. शि. रेगे यांची 'सावित्री' ही कादंबरी.

## १.७ कादंबरी वाङ्मयाचे प्रकार

कादंबरी हा वाङ्मयप्रकार अनेक विषयांना, शैली-तंत्राला व विविध मानवी जीवनानुभवाला सामावून घेणारा साहित्यप्रकार आहे. त्यामुळे या विशेषांमुळे कादंबरीचे अनेक

प्रकारे वर्गीकरण केले जाते. कादंबरीचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील स्वरूपही कमालीचे बदलत गेलेले दिसते. त्यामुळे या काळात कादंबरीच्या वरील घटकांमध्येही भिन्नता दिसून येते. कादंबरीचे सर्वच प्रकारातील काही महत्त्वाच्या प्रकारांचा विचार आपण इथे करू. यामध्ये विषयानुसार १) सामाजिक २) ऐतिहासिक ३) पौराणिक ४) चरित्रात्मक ५) मनोविश्लेषणात्मक किंवा मानसशास्त्रीय ६) राजकीय, ७) संज्ञाप्रवाहात्मक असे प्रकार दिसतात. तर १९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यात जे प्रवाह निर्माण झाले त्यानुसार १) ग्रामीण / प्रादेशिक २) दलित ३) आदिवासी ४) स्त्रीवादी हे जाणीवनिष्ठ प्रकारभेद सांगितले जातात.

प्रथमतः विषयानुसार होणाऱ्या कादंबरीतील प्रकारभेदांचा विचार करू.

### १.७.१ सामाजिक कादंबरी :

१९ व्या शतकात जन्मलेला हा वाङ्मयप्रकार आहे. सामाजिक प्रश्नांचे चित्रण ज्यामध्ये होते, सामाजिक प्रश्न, समाजातील घटक, भोवतालचे वातावरण, संस्कृती, रितीरिवाज अनेकविध प्रश्नांचा उहापोह ज्या कादंबरीत होतो, त्या कादंबरीस सामाजिक कादंबरी म्हणतात.

### १.७.२ ऐतिहासिक कादंबरी :

ऐतिहासिक कादंबरीमध्ये वास्तव व त्यावेळचा काळ महत्त्वाचा असतो. ऐतिहासिक कादंबरीचे वास्तव हे ऐतिहासिकच असते. यात भूतकालीन जीवन व वातावरण साकारण्याचा प्रयत्न असतो. इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यात फरक असतो. ऐतिहासिक कादंबरीला ऐतिहासिक गोष्ट म्हणता येत नाही, कारण त्यात कल्पित रूप असते. कल्पितरूप हे ऐतिहासिक वास्तवाशी सुसंगत असले पाहिजे.

उदा. 'स्वामी' कादंबरीतील काल्पनिक पात्रे, ऐतिहासिक घटनांशी सुसंगत वाटतात.

### १.७.३ पौराणिक कादंबरी :

या प्रकारच्या कादंबऱ्यांना आधुनिक भाषेत सांगितलेल्या पुराणकथा असे म्हटले जाते. ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षाही या कादंबरीतील आशयाचा काळ प्राचीन मानला जातो. तसेच पुराणकथा या पूर्णतः कल्पनेवर आधारलेल्या असतात तशाच याही कथा कल्पनाप्रधान घटनांवर आधारलेल्या असतात. पौराणिक व्यक्तींचे चरित्र यात मांडलेले असते. मराठीतील 'ययाती', 'मृत्यूंजय', 'राधेय', 'कर्णायन' या काही महत्त्वाच्या पौराणिक कादंबऱ्या आहेत. पुराणातील कर्ण, श्रीकृष्ण यांच्या जीवनाचे चित्रण या कादंबऱ्यातून होताना दिसते.

### १.७.४ चरित्रात्मक कादंबरी :

समाजजीवनातील भूतकालीन किंवा वर्तमानकालीन व्यक्तीच्या जीवनाचा पट या कादंबऱ्यांमधून मांडला जातो. उदा. हरिभाऊ आपटे यांचे जीवनचरित्र भीमराव कुलकर्णी यांनी त्यांच्या 'हरिभाऊ' या कादंबरीमध्ये रेखाटले आहे. तसेच श्री. ज. जोशी यांची 'आनंदी गोपाळ' ही कादंबरी डॉ. आनंदीबाई जोशी व गोपाळ जोशी यांच्या जीवनचरित्रावर आधारलेली आहे. चरित्रामध्ये त्या त्या व्यक्तीचे चरित्र जसेच्या तसे मांडलेले असते. पण चरित्रात्मक कादंबरीमध्ये या चरित्राला एक कलात्मक अंग देऊन त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या शोध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो.

### १.७.५ मानसशास्त्रीय कादंबरी :

मानसशास्त्रीय कादंबरीत माणसाच्या मनातील भावना आणि त्याचे वर्तन यांस महत्त्व असते. चांगले-वाईट मनात होणारे संघर्ष याचे चित्रण असते. माणसाचे वर्तन अनेकविध स्वरूपाच्या परिस्थितीला अनुसरुन निरनिराळ्या प्रकारे बनलेले असते. माणूस हा समाजात वाढत असतो. त्या समाजाचे, संस्कृतीचे परिणाम त्याच्या वर्तनावर होत असतात. त्या वर्तनातून त्याच्या जगण्याची शैली मानसशास्त्रीय कादंबरीकार मांडण्याचा प्रयत्न करतो.

थोडक्यात, मानसिक वास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी म्हणजे मानसशास्त्रीय कादंबरी होय. उदा. गंगाधर गाडगीळ - 'लिलीचे फूल'

मानसशास्त्रीय कादंबरीचे महत्त्व हे माणसाचे वर्तन आणि त्याच्या मनातील विचार प्रकट करणे यात आहे.

### १.७.६ राजकीय कादंबरी :

ज्या कादंबरीमध्ये राजकीय कल्पना व राजकीय वातावरणाचा अधिकतेने वापर केलेला असतो अशा कादंबऱ्यांना राजकीय कादंबरी म्हणतात. मराठीत अरुण साधू यांची 'सिंहासन', ग.त्र्यं. माडखोलकरांची 'कांता' या राजकीय कादंबऱ्या होत. सरकारी कामकाजापासून राजकीय क्षेत्रातील चढाओढ, राजकीय नेत्यांचया वृत्ती-प्रवृत्ती, संघर्ष, राजकीय डावपेच या सर्वांचा समावेश कादंबरीतील पात्र, घटनांद्वारे या कादंबरीत झालेला असतो.

### १.७.७ संज्ञाप्रवाहात्मक कादंबरी :

मानवी मनाचा जाणीव आणि नेणीव अशा दोन पातळ्या असतात. त्यातील नेणीवेच्या पातळीच्या जवळ असणाऱ्या अनुच्चारित स्वरूपाच्या भावना या प्रकारच्या कादंबरीतून व्यक्त होत असतात. वैयक्तिक जीवनातील काही आठवणी, प्रतिक्रिया, अस्पष्ट अशा भावना यात येत असतात. उदा. बा.सी. मर्ढेकर यांची 'रात्रीचा दिवस', कमल देसाई यांची 'काळा सूर्य', चिं. त्र्यं. खानोलकरांची 'अजगर' या कादंबऱ्या संज्ञाप्रवाहात्मक कादंबऱ्या होत. या कादंबऱ्यांवर कित्येकदा दुर्बोधतेचाही शिक्का मारला जात असतो. कारण त्यात येणारे कथानक किंवा घटना, कादंबरीची भाषा यांचा अर्थ सहजतेने लावणे शक्य नसते.

या विविध विषयवार प्रकारानुसार साठोत्तरी साहित्य प्रवाहातील ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी हे ही वेगळ्या जीवनजाणिवा व्यक्त करणारे कादंबरीचे प्रकार दिसतात.

### १.७.८ ग्रामीण किंवा प्रादेशिक कादंबरी :

ग्रामीण कादंबरीतून ग्रामजीवनाचे दर्शन होते. ग्रामीण जीवन, तेथील रीतीरिवाज, निसर्ग, शेती, तेथील संस्कृती, आर्थिक, सामाजिक, धार्मिक परिस्थिती यातून उद्‌भवणारे समस्या या ग्रामीण कादंबरीत चित्रित केलेल्या असतात. खाण्यापिण्याच्या सवयी, कुटुंबव्यवस्था, देवदेवता, सण, परंपरा त्यांची मानसिक इ. ग्रामीण कादंबरीत दिसून येते. या कादंबरीलाच प्रादेशिक कादंबरी असे म्हटले जाते. कारण या कादंबऱ्यातून विशिष्ट प्रदेशाचे, तिथल्या बोलीभाषेचे, तिथल्या मानवी जीवनाचे चित्रण आलेले असते. उदा. उद्‌धव शेळके यांची 'धग' रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा', व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी', आनंद यादवांची 'गोतावळा' इ. या कादंबऱ्या विशिष्ट प्रदेशातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना दिसतात.

**१.७.९ दलित कादंबरी :**

भारतीय समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर आधारित आहे. वर्णव्यवस्थेत समाजसंस्थेने नाकारलेल्या शूद्र-अतिशुद्रांना जी वागणूक मिळत असते, त्याचे विवेचन करणारी कादंबरी म्हणजे दलित कादंबरी. ज्यातून दलितांचे दुःख, त्यांची समाजात होत असलेली घुसमट, तडफड, यातून बाहेर पडण्यासाठी ते करत असलेली तळमळ दिसून येते.

उदा. बाबुराव बागूल यांची 'सूड'
केशव मेश्राम यांची 'हकिकत'
जयवंत दळवी यांची 'चक्र'

अशा स्वरूपाच्या कादंबऱ्यातून दलितांच्या जीवनाचे चित्रण केले गेले आहे.

**१.७.१० आदिवासी कादंबरी :**

ज्या कादंबरीतून आदिवासी जीवनजाणीव व्यक्त केलेली असते अशी कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी होय. मराठी साहित्यामध्ये ज्या प्रमाणात आदिवासी कविता व कथा लिहिल्या गेल्या त्या प्रमाणात आदिवासी कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या नाहीत. डॉ. कृष्णा भवारी यांची 'इधोस', भास्कर भोसले यांची 'दैना', अनिल सहस्त्रबुद्धे या आदिवासीवर लेखकाने लिहिलेली 'डांगाणी', 'वावटळ' या कादंबऱ्या आहेत. आदिवासी लोकांचे जनजीवन, त्यांच्या निसर्गाविषयीच्या धारणा, प्रेम, त्यांची संस्कृती याचे चित्रण या कादंबऱ्यातून येते.

**१.७.११ स्त्रीवादी कादंबरी :**

समाजामध्ये जातीय, वर्गीय धार्मिक व लिंगभावातून स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या जीवनाचा वेध स्त्रीवादी कादंबरीमधून घेतला जात असतो. स्त्रियांच्या जगण्यात नेहमी दुय्यमभाव येत असतो. याची बोच अनेक लेखनातून उदा. कथा, कवितांमधून स्त्रिया मांडत असतात. हीच स्त्रीजीवनविषयक जाणीव स्त्रीवादी कादंबरीतूनही मांडली जाते. शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर', 'रोहिणी कुलकर्णी यांची भेट', गौरी देशपांडे यांच्या बहुतांश कादंबऱ्या इ. अनेक लेखिकांनी स्त्रीवादी स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत.

एकूणच मराठी कादंबरी प्रकारामध्ये विषयानुसार, रचनातंत्रानुसार, साहित्यप्रवाहानुसार प्रकार मानले जातात. तसेच मराठी साहित्यात रूढ झालेले विविध वाद, वास्तववाद, जीवनवाद, कलावाद, अस्तित्ववाद, अभिजातवाद यानुसार व रंजनपर, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर, ऐंशोत्तरी असे कालखंडानुसारही कादंबऱ्यांमध्ये भेद केले जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) कादंबरी या साहित्यप्रकाराचे घटक नमूद करा.

## १.८ सारांश

मराठी कादंबरीच्या संदर्भात असे म्हणावे लागते की, 'यमुनापर्यटन' पासून सुरु झालेली वास्तवाशी नाते सांगणारी ही कादंबरी नवीन मूल्ये मांडत आता वेगळ्या स्वरूपात साकार होत आहे. 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप' मध्ये भालचंद्र नेमाडे लिहितात, "कादंबरीचे द्रव्य आजच्या लौकिक जीवनातूनच घ्यावे आणि शैलीला केवळ आशयाचेच परिणाम घ्यावे" अशा कल्पनेपाशी येऊन ती पोहचली आहे, हे नेमाडे यांचे म्हणणे पटण्याजोगे आहे.

आज मराठी कादंबरी विविध प्रवाहांनी, जाणिवांनी, रूपांनी व परिणाममूल्यांसह आपल्या जबाबदारीच्या जाणिवेनेही विकास पावलेली आहे असे म्हणता येते. इतक्या मोठ्या प्रमाणात मराठी कादंबरी समृद्ध झालेली असल्याचे मान्य करता येते.

## १.९ संदर्भग्रंथ सूची


१) प्रा. जाधव, रा.ग. १९७६ : 'मराठी विश्वकोश खंड - ३', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९७६, पृ. ४९९, ६०१.

२) डॉ. हस्तक, उषा, 'साहित्य अध्यापन आणि प्रकार' (वा.ल. कुलकर्णी, गौरव ग्रंथ) मौज प्रकाशन, मुंबई - पृ. २५५.

३) जोग, रा. श्री. १९७३, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड - ५', भाग - १, मराठी साहित्य परिषद, पुणे.

४) थोरात, हरिश्चंद्र २०१० - 'कादंबरी : एक साहित्यप्रकार', शब्द पब्लिकेशन्स, मुंबई - २०१०

५) डॉ. राजाध्यक्ष, विजया (समन्वयक), २००२, 'मराठी वाङ्मयकोश - खंड ४' (समीक्षा - संज्ञा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

६) नेमाडे, भालचंद्र १९८६ - 'मराठी साहित्य ; प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, पृ. २४

७) बांदिवडेकर, चंद्रकांत १९९६ - 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लिकेशन्स, द्वि. आ. पुणे - १९९६

८) गाडगीळ, गंगाधर गाडगीळ १९६२ - 'साहित्याचे मानदंड', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.२०

९) गणोरकर, प्रभा, २००१ : 'संज्ञा संकल्पना कोश', ग.रा. भटकल फाऊंण्डेशन, मुंबई, पृ. १७.

१०) घवी, रवींद्र, १९९१ : 'प्रदक्षिणा खंड -२', कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, पृ. १५८.

## १.१० संभाव्य प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी

१) 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचा परिचय करून द्या.

२) 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचे विशेष सांगा.

३) 'लेखक' हाच कादंबरीचा मुख्य घटक होय. या विधानाची चर्चा करा.

४) 'वातावरण' या कादंबरी घटकाचा परिचय करून द्या.

### आ)टीपा लिहा.

१) कादंबरीचे घटक स्पष्ट करा.

२) कादंबरीचे रुप विशेष लिहा.

३) कादंबरी : एक साहित्यप्रकार यावर टीप लिहा.

४) व्यक्तीचित्रण, रचनापद्धती या कादंबरीच्या घटकांचे वर्णन करा.

### इ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) अद्‌भूतरम्य कादंबरी कशापासून जन्माला येते ?

२) कादंबरी हा साहित्यप्रकार इंग्रजीतील कोणत्या साहित्यप्रकारापासून उदयास आला ?

३) वि.स. खांडेकर यांच्या कोणत्या कादंबरीतील पात्रे गतकाळातील घटना सांगतात ?

४) भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखेचे नाव काय ?

❖❖❖❖

# २

# थँक यू मिस्टर ग्लाड - अनिल बर्वे

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ लेखक परिचय
२.३ विषय विवेचन
२.४ थँक यू मिस्टर ग्लाड या कादंबरीत घडलेले घटना प्रसंग
२.५ कादंबरीचे कथानक
२.६ कादंबरीतील पात्रचित्रण
२.७ कादंबरीचे वातावरण
२.८ कादंबरीची भाषा आणि निवेदन
२.९ सारांश
२.१० संदर्भग्रंथ सूची
२.११ संभाव्य प्रश्न

## २.० उद्दिष्टे

मराठी साहित्यातील कादंबरी हा वाङ्मय प्रकार आपण समजून घेत आहोत.

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही अनिल बर्वे यांची कादंबरी. या कादंबरीचे विशेष, या कादंबरीचे वैशिष्ट्ये, या कादंबरीतील घटनाक्रम, या कादंबरीतील वातावरण, कादंबरीची भाषाशैली आणि निवेदन, मर्यादा, व्यक्तिचित्रे या घटकात मांडले गेले आहेत. याशिवाय या कादंबरीमध्ये लेखकाने वापरलेल्या कलाटणी तंत्राचा आपण अभ्यास करणार आहोत.

**संदर्भ : विद्यार्थ्यांनी साहित्य वाचणे, मूळ कादंबरी वाचणे अनिवार्य आहे.**

- 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला या कादंबरीचे कथानक सांगता येईल.
- 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील पात्रचित्रण सांगता येईल.
- या कादंबरीतील वातावरण स्पष्ट करता येईल.
- या कादंबरीची भाषा आणि निवेदन स्पष्ट करता येईल.

- एकूण या कादंबरीचा अभ्यास करून कादंबरीतील मुख्य पात्र आणि गौण पात्र यांच्यातील फरक स्पष्ट करता येईल.
- लेखकाने लिहिलेल्या कादंबरीची शैली समजून घेता येईल.
- कादंबरीचा आशय आणि विषय समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

साहित्याच्या कथा, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांप्रमाणेच कादंबरी हा एक वाङ्मयप्रकार आहे. घटना, कथानक, पात्रे, निवेदनशैली, भाषा इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते.

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा मजकूर भरपूर असतो. या मजकुराला आपण कथानक असे म्हणतो. कथानकात घटना, प्रसंग, पात्रे, निवेदन पद्धती या सर्वांचा समावेश असतो.

कथानकात हे सारे घटक एकजिनसीपणाने येत असल्यामुळे कथानक एकात्म होते. कादंबरीत घटना हा लहानात लहान घटक असतो. घटना, लेखक, निवेदक व अन्य पात्रे यांच्या हेतूंमधील व जीवनसृष्टीमधील देवघेव स्पष्ट करीत असते. यामुळे ती घटना ही प्रत्यक्षातील घटनेसारखी घटना राहात नाही. ती घडवलेली घटना होते. घटनेला विविध हेतूंची आवरणे मिळाल्यामुळे तिचे गुंतागुंतीच्या अनुभवात रूपांतर होते. कादंबरीत घटना अनुक्रमाने येऊन चालत नाहीत. कथानक तयार होण्यासाठी उद्देशानुसार क्रमभंग होतो. काही घटना वगळल्याही जातात. गरजेनुसार कादंबरीकार घटना हाताळत असतो. घटना केवळ क्रमानुसार आल्या तर त्यांची गोष्ट तयार होईल. पण कार्यकारण भावानुसार त्यांची मांडणी क्रमशः न होता क्रम मोडून झाली तर कथानक तयार होते. कथानकात उपकथानके मूळ कथानकाला प्रभावशाली करण्यासाठी येत असतात. विविध प्रकारचे विषय घेऊन जीवनाशी संबंधित अशी आशयसूत्रे पकडून कादंबरीने सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक, संज्ञाप्रवाहात्मक, विज्ञानविषयक असे अवतार धारण केलेले दिसतात. हे सर्व प्रकार कथानकातून निष्पन्न होतात. कादंबरी हा जीवन व्यवहाराबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा साहित्यप्रकार आहे. जीवन व्यवहाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. त्याच्या सादप्रतिसादांनीच जीवनाला रंगढंग प्राप्त होतात. जीवन व्यवहाराच्या रंगढंगाप्रमाणेच त्यालाही रंगढंग प्राप्त होऊन व्यक्तिमत्त्व लाभते. हे व्यक्तिमत्त्व बाह्य व आंतरिक असे दोन्ही मिळून बनलेले असते. कादंबरीत अशी व्यक्तिमत्त्वे पात्ररूपाने वावरत असतात. कादंबरीकार या पात्रांच्या इच्छा, आकांक्षा, क्रिया-प्रतिक्रिया यांचे दर्शन घडवून ते खरेखुरे वाटावेत असा प्रयत्न करीत असतो. कादंबरीचा विशिष्ट दृष्टिकोन या पात्रांद्वारा राबविला जात असतो. व्यक्ती-समाज यांच्याशी कादंबरी हा साहित्यप्रकार निगडित असल्यामुळे व समाजात नाना प्रकारच्या व्यक्ती आढळतात त्यामुळे 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने व्यक्ती तितकी पात्रे असे म्हणावयास हवे. नायक, नायिका, खलनायक, प्रतिनायक ही मुख्य तर इतर पात्रे गौण मानली जातात.

कादंबरीतील कथानक हे कुठल्यातरी वातावरणात घडते. हे वातावरण आभासात्मक असते. म्हणजे खरे असल्याचा भास निर्माण केलेला असतो. कादंबरी हा जीवनप्रवाहाशी

समांतरपणे चालणारा वाङ्मयप्रकार असल्यामुळे स्वाभाविकच त्याचा आवाका मोठा आहे. परिणामतः समाज, त्यातील व्यक्ती, त्यांचे जीवन या साऱ्यांचे संबंधांसह जगणे कादंबरीत येते. कादंबरीकार हा सर्व आवाका लक्षात घेऊन त्याच्या परीने जीवनदर्शन घडवण्याचा प्रयत्न करीत असतो. जीवनाला बाह्य व आंतरिक असे दोन्ही संदर्भ असतात. बाह्य संदर्भात, मानवी संबंध, विविध स्थळ व काळ यांच्याशी निगडित असतात. आंतरिक संबंधात व्यक्ती तिचे समग्र परंपरेतले, समाज व्यवस्थेतले स्थान यांचा तीव्रपणे विचार करते. थोडक्यात, कादंबरीला वास्तवता प्राप्त होण्यासाठी, पात्रांना जिवंतपणा प्राप्त करून देण्यासाठी विशिष्ट स्थलकाल उभारावे लागते. याचे आपणास भौगोलिक, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मानसिक, इत्यादी प्रकारे वातावरणाचे वर्गीकरण करता येते.

कोणतीही साहित्यकृती ही वाचकांशी संवाद साधत असते. या संवादातून ती वाचकाला जीवनविषयक जाणीव करून देत असते. ही जाणीव सुखद, दुःखद कशाही स्वरूपात असेल. या जाणीवेमुळे वाचक प्रगल्भ होत असतो. ही प्रगल्भता त्याला साहित्य कृतीतल्या अनुभवांद्वारे येते. लेखकाचे हे अनुभव मूल्याधिष्ठित असतात. लेखक आपल्या व्यक्तिगत मूल्य भानांची सामाजिक संदर्भांशी सांगड घालून त्यांना व्यापकपणा प्राप्त करून देतो. लेखकाचा व्यक्तिगत मूल्यभाव हा लेखकाचा दृष्टिकोन असतो. कुठल्याही साहित्यकृतीला दृष्टिकोनामुळेच अर्थपूर्णता येते.

कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथनात्मक साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत अनेक आशयसूत्रे असतात. पानांची गर्दी होते. कादंबरीतल्या आशयाला नेमकेपणाने पेलण्यासाठी प्रस्तुतीकरणाच्या अनेक पद्धती वापराव्या लागतात. विविध माध्यमातून हे प्रस्तुतीकरण व्हावे लागते. निवेदन, वर्णन, संभाषण, स्वभाषण, भाष्य या प्रस्तुतीकरण पद्धती तर पत्र, दैनंदिनी ही माध्यमे, कादंबरी ही गद्यातून प्रस्तुत होत असूनही ती काव्यात्म होऊ शकते. तसेच गद्यशैलीचा लवचिकपणे वापर करून बाह्य व आंतर मनोविश्वाला समर्थपणे व्यक्त करू शकते. कादंबरीत भाषा प्रायः साधनरूप असते, पण प्रसंगी तिला माध्यमरूपही व्हावे लागते. साध्या बोलण्यात देखील साधनरूप पार करून भाषा काव्यात्म होते. म्हणजेच अधिक अर्थ सूचित करणारी माध्यमरूप होते. कादंबरीतील वातावरण विविधरंगी करायला भाषाच मदत करते. निरनिराळ्या पात्रांची निराळी भाषा, प्रसंगाला अनुरूप भाषा वापरुन कादंबरीकार कादंबरीला जिवंतपणा आणून सत्याभास निर्माण करीत असतो. विविध कालखंडातील, विविध कथासूत्रे आशयानुरुप प्रकट करणारी, विविध प्रदेशांची वैशिष्ट्ये जाणवून देणारी भाषिक रूपे विविध कादंबऱ्यांतून दिसतात.

मराठीमध्ये कादंबरी लेखनाची सुरुवात इंग्रजी साहित्याच्या आधारे झालेली दिसून येते. संस्कृतच्या आधारे सुद्धा कादंबरीची मांडणी करता येणे शक्य आहे. बाणभट्ट कादंबरी इत्यादी.

१८५५ पासून मराठी भाषेत विविध प्रकारच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. सुरुवातीला भाषांतराच्या माध्यमातून कादंबरी नवलकथा, नावल, नोवेल ते नवल आणि कादंबरी असा कादंबरीचा प्रवास झाला आहे. कादंबरीच्या आशय विषयानुसार कादंबरीचे विविध प्रकार पडताना दिसून येतात. जसे सामाजिक कादंबरी, धार्मिक कादंबरी, विज्ञान कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, प्रेम विषयावरील कादंबरी, मानवाच्या जीवनाची आणि जगण्याची जी जी क्षेत्र आहेत अशी कित्येक क्षेत्रे कादंबरीने व्यापली आहेत. म्हणून कादंबरीचे अनेक प्रकारांमध्ये विभाजन किंवा विभागणी करता येणे शक्य आहे. कादंबरी हा खूप मोठा अवकाश असलेला खूप मोठा आशय असलेला निवेदन प्रधान असा साहित्यप्रकार आहे.

एक कडक जेलर त्याची क्रूरता आणि त्याच्या विरोधात उभा ठाकलेला फाशीची शिक्षा झालेला एक नक्षलवादी. नक्षलवाद्यांच्या 'बोले तैसा चाले' या वर्तणुकीतून कादंबरीत असलेला उलट्या काळजाचा मिस्टर ग्लाड याच्या मनाचे परिवर्तन झाले. नक्षलवाद्यास ठोठावलेली फाशीची शिक्षा आणि फाशी होईपर्यंतच्या इतर सर्व गोष्टी या कादंबरीमध्ये येतात. या कादंबरीमध्ये ज्या कालखंडात हा नक्षलवादी राहतो त्या कालखंडात जेलर आणि कैदी यांच्यामध्ये बदलत जाणारे नाते हा या कादंबरीचा खऱ्या अर्थाने आत्मा आहे. हा या कादंबरीचा खरा विषय आहे. त्यामुळे या दोघांच्या संवादामुळे, प्रति संवादामुळे या कादंबरीला प्रचंड वेग आलेला आहे. एखाद्या धबधब्यासारखे या कादंबरीतला प्रवाहीपण वाचकांच्या मनावर आपटतो. वाचकांना कोणतीही उसंत न मिळता पुढील काही घटनाक्रम सुरु होतात.

## २.२ लेखक परिचय

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही एक उत्तम प्रवाही ही कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये दोन व्यक्तीतील संघर्ष आणि तात्त्विक मते दोन टोकापर्यंत पोहोचली आहेत. 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही अनिल बर्वे यांची पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीची पहिली आवृत्ती १९७६ साली प्रकाशित झाली. २०१७ मध्ये या कादंबरीची सहावी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

त्यांच्या 'थँक यू मिस्टर ग्लाड', 'डोंगर म्हातारा झाला', 'स्टडफार्म', 'अकरा कोटी गॅलन पाणी', 'आतंक' अशा एकूण पाच कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. याशिवाय अनिल बर्वे यांच्या नावावर 'युद्ध विराम' आणि 'होरपळ' हे दोन कथासंग्रह आहेत. 'थँक यू मिस्टर ग्लाड', 'कोलंबस वाट चुकला', 'हमिदाबाईची कोठी', 'पुत्रकामेष्ठी', 'आकाश पेलताना', 'चर्मावती चंबल', 'मी स्वामी या देहाचा', 'जूलिएटचे डोळे' ही (अप्रकाशित) त्यांची नाटके आहेत. याच बरोबर 'रोखलेल्या बंदुका' आणि 'उठली जनता', 'झु दाओ अन चर्च बेल' ही पुस्तके अनिल बर्वे यांच्या नावावर प्रसिद्ध आहेत.

अनिल बर्वे हे व्यवसायाने पत्रकार असलेले दिसून येतात. अत्यंत उत्तम पत्रकारिता त्यांनी केली आहे. १९७१ साली इंदिराबाईंच्या विरोधात लेखन केल्याने त्यांना जेलची हवा सुद्धा खावी लागली आहे. आणीबाणीच्या काळामध्ये अनिल बर्वे यांचे लेखन अधिक तीव्र झालेले दिसून येते.

## २.३ कादंबरी विषयक विवेचन

कठोर वागणारा जेलर आणि फाशीची शिक्षा झालेल्या एका नक्षलवादी कैद्याने जेलरचे केलेले ह्रदय परिवर्तन हा या कादंबरीचा विषय आहे. नक्षलवाद्याला झालेली फाशीची शिक्षा आणि त्यानुसार फाशीच्या दिवसापर्यंतच्या गोष्टी सांगत असताना या कालखंडात जेलर आणि कैदी यांच्यामध्ये बदलत जाणारे संदर्भ हा मुख्य कादंबरीचा विषय आहे. मिस्टर ग्लाड म्हणजेच जेलरला बदलवण्यात थोडा भाग त्याची मुलगी जेनिफर अथार्त जेनी ही सुद्धा आहे. अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये आणि अडचणीच्या काळात सापडलेल्या आपल्या पूर्वायुष्यातील जेलरला वीरभूषण पटनाईक यांच्या निमित्ताने आपल्याला जे करता आले नाही ते हा वीरभूषण करून दाखवतो. जेलरच्या पूर्व आयुष्यामध्ये हिटलरचे नाझी सैनिक ग्लाड समोरच त्याच्या प्रिय पत्नीस

हिसकावून नेतात. मात्र तरणाबांड असलेला ग्लाड काही करू शकत नाही हा त्याचा नॉस्टेल्जियाचा संदर्भही सदर कादंबरीमध्ये मांडला आहे हे आपण पाहू.

## २.४ कादंबरीत घडलेले घटना प्रसंग

'थँक यू मिस्टर ग्लाड' अनिल बर्वे यांची प्रवाही कादंबरी आहे. या कादंबरीतील सर्व घटना प्रसंग काल्पनिक आहेत. मात्र लेखकाच्या भाषा शैलीमुळे ते जिवंत तर वाटतात पण सुटसुटीत व सत्यही वाटतात. सध्याच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणामुळे या कादंबरीमध्ये मांडलेल्या बारीक-सारीक गोष्टीमुळे ही कादंबरी अत्यंत उल्लेखनीय वाटते. या कादंबरीमध्ये घटनांना फारसे महत्त्व नाही. एका मागोमाग घडणाऱ्या घटना या कादंबरीला वेग प्राप्त करून देतात. या कादंबरीतील व्यक्तिरेखांचे पदर उलगडून दाखवण्यासाठी घटना प्रसंगांची कादंबरीत रेलचेल आहे. फाशीची शिक्षा झालेला कैदी, वीरभूषण पटनायक हा वैद्यकीय सेवेतील सर्वोत्तम डॉक्टर असून त्याचे वयही अंदाजे ३० वर्षे असावे. त्याची जेलमध्ये येण्याची घटना व त्याच्या स्वाभिमानाने ओतप्रोत भरलेला कॉम्रेड विचार या कादंबरीतून चित्रित होतो. कादंबरीतील जेलर मिस्टर ग्लाड हा कौर्याचा प्रतीक असून वीरभूषण पटनायक हा शौर्याचा प्रतिनिधी आहे. या दोघांच्या तऱ्हेवाईक वागण्याच्या पद्धतीमुळे या कादंबरीतून संघर्ष उभा राहतो.

## २.५ थँक यू मिस्टर ग्लाड या कादंबरीचे कथानक

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीला कथानक फारच थोडे दिसते. ही संपूर्ण कादंबरी, कादंबरीतील पात्रांच्या भोवती फिरताना दिसते. वीरभूषण नावाच्या नक्षलवाद्याला फाशीची शिक्षा झालेली आहे. जोपर्यंत त्याला फाशीची ऑर्डर निघत नाही तोपर्यंत या नक्षलवाद्याला राजमहेंद्री जेलमध्ये ठेवले जाते. या नक्षलवाद्याला जेवढ्या कालावधीसाठी या जेलमध्ये ठेवले जाते तेवढ्याच कालावधीत या कादंबरीचे कथानक घडताना दिसते.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये वर्णन केलेला जेल हा 'राजमहेंद्री' या नावाचा आहे. या जेलमध्येच वीरभूषण पटनाईक या नक्षलवाद्यांची या जेलचा मुख्य जेलर असलेल्या मिस्टर ग्लाड यांच्याशी गाठ पडते. या कादंबरीतील जेलर मिस्टर ग्लाड हा सैतानाचा अवतार आहे. कैद्यांशी क्रूर वागणारा, त्यांचा अमानुष छळ करणारा, त्यांना लाथा-बुक्यांनी तुडवून काढणारा ग्लाड हा अशा रांगड्या पद्धतीचा आहे. ग्लाडला असे वाटते की, नवीन आलेल्या राजकीय कैद्यावर असेच वागण्याचा आपण प्रयत्न करू. सुरुवातीच्या त्याच्या प्रयत्नातून या कादंबरीचे कथानक उलगडत जाताना दिसते. 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी अत्यंत छोटी म्हणजे केवळ ९२ पानाची आहे आणि याच कादंबरीला साजेशे कथानक यात येते. आपण एखादा सिनेमा पाहावा त्यातील दृश्य आपल्या डोळ्यासमोर उभे राहावे अशा पद्धतीने या कादंबरीतील कथानक आपल्या नजरेसमोर उभे राहते. खरंतर ही लेखकाची चित्रदर्शी लेखन करण्याची कला आहे. या कादंबरीत 'आदिवासी भागातील पोलीस चौकी उडवून देत सात पोलिसांसह एका सब-इंस्पेक्टरला ठार मारण्याच्या आरोपावरुन वीरभूषण पटनाईक या ३० वयाच्या तरुण उमद्या नक्षलवादी आणि मुळातच व्यवसायाने डॉक्टर असलेल्या क्रांतिकारकाला फाशीची शिक्षा सुनावली जाते.' फाशीची शिक्षा पूर्ण होईपर्यंत त्याला राजमहेंद्री जेलमध्ये ठेवले जाते. राजमहेंद्री जेल म्हणजे एक प्रकारची दहशत आहे. राजमहेंद्री जेलचा जेलर ग्लाड साहेब असा सैतान आहे

की, त्याला पाहताच अट्टल गुन्हेगार चळाचळा कापतात. 'घरात एखादा नाग निघावा, आपल्या हातात काहीच शस्त्र नसावं आणि नागाने फडां काढून आपल्या डोक्यावर नेम धरावा अशा पद्धतीची व्यवस्था या ग्लाडमध्ये दिसून येते. ग्लाडचा प्रचंड दरारा आहे, मात्र वीरभूषण त्याला अजिबात घाबरत नाही. दगडासारखे काळीज असलेला व्यक्ती परंतु आपल्या वर्तनातून वीरभूषण पटनाईक त्याला बदलायला मजबूर करतो. म्हणजे नक्षलवाद्यांच्या न घाबरण्याचा बेधडक छातीवर आणि वृत्तीवर अवलंबून आहे. समानतेने वागण्याची अपेक्षा ठेवणारा वीरभूषण पटनाईक आणि सर्व नियम पायदळी तुडवणारा मिस्टर ग्लाड यांचा संघर्ष या कादंबरीमध्ये टोकाचा होतो. मिस्टर ग्लाड या कादंबरीमध्ये जो वागतो, तो त्याच्या आयुष्यातील त्याला ज्या दुखेरी जखमा झाल्यामुळे त्यांना विसरण्यासाठी तो असे वागतो. त्याच्या आयुष्यातील नॉस्टेल्जिया त्याचा पिच्छा पुरवतो.

दररोज एखाद्या कैद्याच्या अंगावरची कातडी सोलपर्यंत लाथाबुक्क्यांनी मार देणारा ग्लाड आपल्या टिफिनला हात लावत नसे. मात्र नक्षलवाद्यांच्या भूमिकेमुळे त्याला आपल्या आजूबाजूच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि भावनिक वस्तुस्थितीचा योग्य तो परिणाम होतो. जेलर ग्लाड आणि वीरभूषण यांच्यातील हा संघर्ष रोमहर्षक होऊन शेवटी वीरभूषणची बाजूची सरशी होते.

मिस्टर ग्लाड आणि वीरभूषण पटनाईक यांच्यात ३६ चा आकडा असतो. आचार विचार आणि वागणूक तसेच कृतीसाठी ते एकमेकांच्या विरोधात उभे असतात. या कादंबरीमध्ये अचानक परिस्थिती अशी होते की सर्वशक्तिमान आणि सर्व शक्ती त्याच्या हातात असूनही तो हतबल होतो आणि वीरभूषण पटनाईक यांच्यासमोर झुकतो. आपल्या लेकीचा जीव वाचवण्याची विनंती करतो. स्थिती अशी असते की ग्लाडची लाडकी लेक जेनिफर आपल्या बाळंतपणासाठी भारतात, आपल्या वडिलांकडे म्हणजेच राजमहेंद्री जेलमध्ये येते. तिचे दिवस भरत आलेले असतात. ज्या काळात ती बाळंत होणार असते त्यावेळी सगळ्या सुविधांनी सज्ज असलेला जेल एकदम प्रतिकूल होतो. या काळात क्रूरकर्मा असलेला पिता आपल्या मुलीसाठी किती व्याकुळ होतो याची जाणीव वाचकांना होते. या कालावधीमध्ये वीरभूषण जेनीच्या प्रसुतीचे काम देण्यात येते. येत्या चार-पाच तासाच्या वेळात वीरभूषणला फाशी द्यायची असते. मुळातच डॉक्टर असलेला वीरभूषण अशा या बाक्या प्रसंगात त्याला केवळ ४ तासांनी फासी देणार असतात. या कालावधीत तो जेनीचे उत्तम बाळंतपण करतो. तिला आणि तिच्या बाळाला सुखरूप सोडवतो. फाशी जाण्या अगोदर नक्षलवादी वीरभूषण पटनायक आपले कौशल्य पणाला लावून जेनीला आणि तिच्या बाळाची सुखरूप सुटका करतो.

**कलाटणी तंत्र :**

लेखक अनिल बर्वे यांनी या कादंबरीमध्ये कलाटणी तंत्राचा वापर करून कादंबरीमध्ये आणखी रंग भरलेला आहे. जेनी चे व्यवस्थित ऑपरेशन करून वीरभूषणला फाशी देण्यासाठी थोडाच कालावधी शिल्लक असतो म्हणून त्याला घाईगडबडीने फाशीच्या कोठडीकडे घेऊन जायची तयारी सुरू होते. आता वीरभूषण फासावर लटकवला जाईल असे वाचकांना वाटत असतानाच काही कळायच्या अगोदरच मिस्टर ग्लाड आपल्या सर्विस रीव्हॉलवर मधून वीरभूषण पटनाईकच्या छातीवर गोळ्या झाडून त्याला ठार मारतो. शेवटी साहेबांच्या हातात त्याने केलेल्या गुन्ह्यामुळे बेड्या पडतात. मात्र याचा ग्लाडचा मनावर काही परिणाम होत नाही. तो शांत निर्विकार राहिल्याने त्याच्या मनाचा मीच राहतो. अखेरीस आपण गोळी छातीवर का मारली हे

ज्या वेळेस ग्लाड वीरभूषणला सांगतो. त्यावेळेस गोळी ज्याठिकाणी लागलेली आहे त्या ठिकाणी दोन्ही हात दाबून धरत वीरभूषण त्याचे डोळे लक्ष लागतात आणि खाली पडता पडता वीरभूषण 'थँक यू मिस्टर ग्लाड' असे म्हणून ही कादंबरी संपते. अशी प्रकारची कलाटणी देऊन लेखकाने कादंबरी अधिक अग्रेसर, अधिक प्रवाही तसेच प्रेक्षकांना अचंबित करून टाकणारी आहे.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीच्या कथानकामध्ये इतर पात्रेही आलेली आहेत. ग्लाडची पत्नी मारा / मरियम या कादंबरीत प्रत्यक्ष कुठेही नाही, मात्र आठवणींच्या रूपाने ती कादंबरीमध्ये नेहमीच असल्याचा भास होतो. मरियम सारखीच हुबेहूब दिसणारी तिची मुलगी जेनिफर, नक्षलवादीची बायको उमा जी शंभर ते दीडशे मैलावरुन भर उन्हाळ्यात अनवाणी पायांनी आलेली आहे. तिची आर्थिक परिस्थिती दयनीय आहे. तरीसुद्धा नायकाला (आपल्या पतीला) उमेद देण्यासाठी तिथपर्यंत आलेली आहे. वेंधळा जमादार त्याच्या जेलमधील वेगवेगळे विभाग, तेथील कर्मचारी, सेंट्री, ग्लाडच्या बंगल्यावरील माणसं या सर्वांना लेखकाने कथानकाच्या सूत्रात बांधून घेतले आहे. 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी लेखकाने पूर्वस्मृती निवेदनाने म्हणजेच फ्लॅशबॅक तंत्राने लिहिलेली आहे.

ग्लाडच्या अवतीभोवती मरियमच्या उर्फ माराच्या आठवणी सतत जाग्या राहतात. मारा ही वंशाने ज्यू असल्याने हिटलरच्या ज्यू द्वेषाची शिकार होते. हिटलरने असे मानले होते की, ज्यू लोक हे अत्यंत वाईट लोक आहे. त्यांच्यामुळे आपल्या देशाची शान जाते. म्हणून त्याने ६० लाख पेक्षा जास्त लोकांना गॅसचेंबर बनवून एका वेळेस ५ ते १० हजार लोकांना 'डीटेंशन सेंटर' बनवून त्यात कोंबून मारले. एका दिवसात ५ हजार लोकांना जाळण्याची क्षमता त्याने विकसित केली. जाळण्यासाठी संपत्ती वाया जाते म्हणून त्याने एका दिवसात १० हजार लोकांना यंत्राच्या साहाय्याने खड्डे करून त्यात अर्धे मेलेले लोक, अर्धे जिवंत गाडले. आपल्या लोकांना हिटलर ने आपल्या गेस्टापो यांना असा आदेश दिला होता की, 'जो ज्यू दिसेल त्याला हवा तसा ठार मारा' (संदर्भ गुगल) मरियमच्या संदर्भात आपल्या देशाच्या सर्वेसर्वा असलेल्या हिटलरच्या आदेशाचे तंतोतंत पालन करणाऱ्या गेस्टापो यांनी तिला अत्यंत क्रूरपणे ठार मारले. आपल्या प्रेयसीला आपल्या समोरच गेस्टापो केसाला धरुन फरफटत नेत आहेत, तिचे केस तोडत आहेत. कोणत्याही पद्धतीने प्रतिकार करु न शकणारा ग्लाड त्या लोकासमोर लाचार होतो, तिला सोडून देण्यासाठी त्यांच्या पाया पडतो. मात्र यावर मारा खवळून उठते आणि ग्लाडच्या मुस्कटात लगावून बाणेदार व करारीपणे म्हणते, "पुरुषासारखा पुरुष असून षंढासारखा या अत्याचारापुढे लोळण का घेतो आहेस?" (पृ. १८)

या कादंबरीतील घटना, प्रसंग आणि पात्रे आपापली म्हणणे प्रकट करण्यासाठी या कादंबरीमध्ये येतात. कादंबरीतील पात्र अतिशय छोट्या कामासाठी जरी आली तरी वाचकांच्या मनावर एक घर करतात.

**सारांश :**

मिस्टर ग्लाड विरुद्ध क्रांतिकारी आणि संघर्षप्रवण कैदी वीरभूषण यांचा लढा अपूर्व असा आहे. दोन विरुद्ध टोकांच्या संघर्षाच्या विचारांची माणसं एकत्र आल्याने काय होऊ शकते हे या कादंबरीतून लेखकाने दाखवून दिले आहे. या दोघांच्या संघर्षामध्ये मरियम, जेनी, आणि उमा या स्वाभिमानी आणि स्वतंत्र विचार शैलीच्या स्त्रियांच्या जगण्यामुळे या कादंबरीला अधिक भारदस्तपणा आला आहे. कादंबरी या पात्रांमुळे अधिक प्रभावी झाल्याची दिसते.

## २.६ 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील पात्रचित्रण

**या कादंबरीतील प्रमुख पात्रे / व्यक्तिरेखा / स्त्री आणि पुरुष प्रतिमा :**

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये अतिशय कमी आणि मोजकी पात्रे आहेत. खरेतर या कादंबरीमध्ये दोनच मुख्य पात्रे आहेत. या पात्रांना अधिक उठावदार करण्यासाठी लेखकाने इतर पात्रांची निर्मिती केली आहे. या प्रत्येक पात्राची जगण्याची स्वतःची एक शैली आहे. आटोपशीर आणि परिपूर्ण लेखनामुळे ही पात्रे या कादंबरीत अधिक रंग भरून या कादंबरीची परिपूर्णता करण्याचा प्रयत्न करतात. कादंबरीतील या कागदी पात्रांना विविध नावाने ओळखले जाते जसे पात्र, व्यक्तिरेखा, स्त्री आणि पुरुष प्रतिमा इत्यादी.

या कादंबरीमध्ये लक्षात राहणारी पात्र किंवा लक्षवेधी पात्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१) वीरभूषण पटनायक : नक्षलवादी पारंपरिक पद्धतीचा कादंबरीचा नायक
२) मिस्टर ग्लाड : राजमहेंद्री जेलचा जेलर आणि कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा
३) मिस्टर ग्लाड याची पत्नी : मरियम उर्फ मारा
४) वीरभूषणची पत्नी उमा
५) ग्लाडची सुंदर मुलगी : जेनिफर / जेनी
६) वेंधळा जमादार

### १) वीरभूषण पटनायक : नक्षलवादी

वीरभूषण पटनाईक हा या कादंबरीतील नक्षलवादी आहे. पारंपरिक पद्धतीचा कादंबरीचा नायक आहे. राजमहेंद्री जेलमध्ये आल्यानंतर त्याला कैदी नंबर ८४२ असा बिल्ला मिळतो. हा नक्षलवादी सडपातळ बांध्याचा असून वय वर्ष ३० आहे. वीरभूषण फाशीच्या शिक्षेसाठी राजमहेंद्री जेलमध्ये आलेला आहे. तो जरी नक्षलवादी असला तरी व्यवसायाने डॉक्टर, उत्तम सर्जन आहे. एका आदिवासी भागातील चौकी बॉम्बच्या साहाय्याने उडवणे, त्यात सात पोलीस कर्मचारी आणि एक पोलीस सब इंन्स्पेक्टर याला मारण्याच्या अपराधाबद्दल कोर्टाने त्याला फाशीची शिक्षा ठोठावली आहे. फाशीच्या अंमलबजावणीपर्यंत तो राजमहेंद्री जेलमध्ये राहणार आहे. वीरभूषण पटनाईक हा या कादंबरीमध्ये शौर्याचा प्रतिनिधी आहे.

वीरभूषण पटनाईक हा शरीराने किरकोळ बांध्याचा आहे. मात्र त्याच्या मनामध्ये आत्मविश्वास प्रचंड आहे. तो कोणत्याच गोष्टीला घाबरत नाही. तो अत्यंत निडर आहे म्हणून तर कोणतीही साक्ष नसताना स्वतःहून हा पोलीस चौकीत जाऊन, आपण स्वतः केलेले कृत्य सांगतो. वीरभूषण नक्षलवादी म्हणून तर परिणामकारक आहेच पण सत्य बोलणे, सदाचार आणि ज्या कामाला झोकून घेतले त्याच्याशी एकनिष्ठता हा यांचा स्वभाव आहे. वीरभूषणमुळे या कादंबरीत खूप काही घडून जाते. राजमहेंद्री जेलचा जेलर मिस्टर ग्लाडमध्ये होणाऱ्या परिवर्तनाला नक्षलवादी वीरभूषण कारणीभूत आहे. मात्र बदल व्हावं असं मनापासून ग्लाडला वाटत असते. तशी कधी संधी आली नव्हती आणि ती संधी वीर भूषणच्या येण्याने ग्लाडला मिळते. वीरभूषणच्या रक्तात कम्युनिस्ट, मार्क्स, लेलिन आणि माओ यांच्या शिकवणुकीवर त्याची दृढ श्रद्धा आहे. वीरभूषणवर मार्क्सवादाचा प्रभाव असल्यामुळेच तो नक्षलवादी, क्रांतिकारक ठरतो. या जेलमध्ये नक्षलवादी बंदिस्त असला तरी तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. वीरभूषण पटनाईक या जेलमध्ये बंदिवान असूनही स्वतंत्र पद्धतीने राहतो. त्याच्या स्वातंत्र्याच्या

उपभोग घेतो. यामुळे ग्लाडला आपण जेलमध्ये शिक्षा भोगत असल्यासारखे वाटते. वीरभूषण पटनाईक हा दिसायला सामान्य मात्र धैर्य आणि आत्मविश्वास त्याच्यामध्ये तसा असामान्य आहे. या जेलमध्ये मिस्टर ग्लाडला सर्वांसमोर 'तू' एकेरी उल्लेख करतो. त्यामुळेही तो अस्वस्थ होतो. वीरभूषण पटनाईक यांच्या आवाजात अस्वस्थता, आश्वासकता आहे. त्याच्या विचारात परिपक्वता आहे, जेलमधील सर्व कैदी थोड्याच काळामध्ये वीरभूषणला हिरो आपला मानतात. त्यामुळे त्याच्या आवाजाने तुरुंगाला हादरे बसतात. नक्षलवादी वीरभूषण पटनायक आपल्या जीवावर उदार होऊन जेलमध्ये आलेला आहे. त्याला मरणाची भीती नाही. फाशीची शिक्षा होऊनही तीन महिन्यात त्याचे वजन चार पौंडानी वाढले आहे. तो कधीच मृत्यूची पर्वा करत नाही. तुरुंगातील इतर वरिष्ठ जेलरबरोबर तो गप्पा मारत असतो. हा तरुण नक्षलवादी आणि क्रांती करत असल्याने या कादंबरीचा नायक ठरतो. वीरभूषणमध्ये प्रचंड अशी शक्ती आहे. मार्क्स, लेलिन आणि माओ यांच्या विचारसरणीवर त्यांची प्रचंड श्रद्धा आहे. आत्मविश्वास आहे. त्याला अस वाटतं की, एक ना एक दिवस आपल्या विचाराचे राज्य संपूर्ण जगात येईल.

वीरभूषण उच्च शिक्षित आहे. तो व्यवसायाने डॉक्टर आहे. कवीसुद्धा आहे. साहित्याबद्दल त्याला अभिरुची वाटते. तो सामाजिक क्रांतीच्या कविता वाचतो. मायकोवस्की हा त्याचा आवडीचा कवी आहे. त्याच्या उच्च विचारामुळे त्याच्यात वेगळेपणा जाणवतो. परिणामकारक बोलणे, विचारपूर्वक बोलणे, कृतिशील स्वभाव आणि स्त्रीदाक्षिण्य त्याच्या रोमारोमात भिनलेले आहे. ज्यावेळी जेनी आणि त्याची जेलमध्ये भेट होते तेव्हा त्याला जेनीने आपण लिहिलेल्या कविता दाखवते. जेनीच्या कविता अतिशय मोहक, निळसर कागदावर सेंट शिंपडलेला, रेखीव वळणदार अक्षरात खूप कविता लिहिल्या होत्या. या कविता चंद्र, ताऱ्यांच्या, फुला-फळांच्या, झिजून झिजून गुळगुळीत होऊन अमर राहिलेल्या प्रेमाच्या आणि इत्यादी कविता होत्या. (पृ. ५६)

वीरभूषण प्रामाणिकपणे जेनीने लिहिलेल्या कविता पाहून त्यावर टिपणी करून पहिली कविता कोणती आहे? ती कशी आहे किंवा कविता कशी असावी या संदर्भात जेनीबरोबर मनमोकळी चर्चा करतो. ही चर्चा जेनीला आवडते. वीरभूषण मधील क्रांतिकारकत्व, शौर्य जेनीला आवडते. त्याबद्दल त्याला ती सांगते सुद्धा. त्याला ती आवडल्याच तो प्रामाणिकपणे सांगतो. यातून त्याचा स्त्री याबद्दलचा आदरभाव सूचित होतो. कर्मकांड, थोतांड, धार्मिक पुस्तकांचे वाचन, मंत्र पाठांतर या गोष्टी त्याला हास्यास्पद वाटतात. यावर तो टीका करतो. वीरभूषणचा प्रत्यक्ष संघर्ष हा प्रचलित सत्ता आणि व्यवस्थेशी आहे. कुणाही व्यक्तिविरुद्ध त्याचा संघर्ष नाही. कोणत्याही व्यक्ती विरुद्ध राग, द्वेष, मत्सर, तिरस्कार न बाळगता कवी मनाने आपल्या भावना तो व्यक्त करतो. माणुसकीची उंची सतत वाढत रहावी, माणुसकी जपली जावी असे त्याला वाटते. नक्षलवादी चळवळीला आवश्यक असणाऱ्या नायकत्वाच्या सर्व गोष्टी धीरोदात्तपणा आणि कार्यकर्ता त्याच्यामध्ये ठासून भरलेला आहे.

या कादंबरीमध्ये एक गोष्ट खटकते आणि ती म्हणजे या कादंबरीत नक्षलवादी चळवळीचे चित्रण नाही तर चळवळीची विचारधारा केंद्रवर्ती आहे. एक सुशिक्षित शिकलेला आणि व्यवसायाने डॉक्टर असलेला वीरभूषण पटनाईक नक्षलवादी चळवळीत कसा सामील झाला याचे चित्रण ही कादंबरी मांडत नाही. दुसरे असे की, मिस्टर ग्लाड हा धाडसी असून तो अँग्लो इंडियन आहे. त्याचे मराठीतील संभाषण देखील अनावश्यक वाटते. कदाचित त्यांनी तोडके

मोडके मराठी जर बोलला असता तर कादंबरीने अधिक उंची गाठली असती आणि सत्यता अधिक वाटली असती.

### वीरभूषणचे मृत्युपत्र :

वीरभूषण हा प्रामाणिक आहे. स्वतःच्या मतावर ठाम आहे. तो आपले कोणतेही निर्णय खोडून काढत नाही किंवा परत घेत नाही. मिस्टर ग्लाड कितीतरी मागे लागले तरी दयेच्या अर्जावर सही करत नाही. यासाठी प्रचंड मारही खातो पण शब्द बदलत नाही. वीरभूषण सरकारकडे दयेची भीक मागत नाही. मात्र आपली वेगळीच भूमिका तो मांडतो. मुळात तो मार्क्सवादी विचारांचा आहे. आपल्या मृत्युपत्रात ही विचारधारा तो मांडतो. उदाहरणार्थ 'मी कम्युनिस्ट आहे आणि कम्युनिस्ट तत्त्वाप्रमाणे फक्त श्रमातूनच संपत्ती निर्माण होते, यावर माझा विश्वास आहे. म्हणूनच श्रम करण्याचे साधन जे शरीर आहे ते ही माणसाच्या संपत्तीचा भाग आहे असे तो मानतो. ही शरीरसंपदा माणसाची वैयक्तिक संपत्ती आहे. या संपत्तीचा वारसा आपल्या वारसदारांना देणे हा तुमचा कायद्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो आणि तेवढाच अधिकार तुम्ही मला द्यावा अशी मी मागणी करतो.....'

प्रत्यक्षपणे मृत्युपत्र सादर करताना तो असे म्हणतो की, आपल्या मृत्युनंतर त्याच्या शरीरातील रक्त, डोळे, ह्रदय, किडनी आदी अवयव संदर्भातील केलेले विवेचन फारच मौलिक आहे. वीरभूषण पुढे म्हणतो, मला फाशी देऊन व नंतर माझ्या मृत्यूची पोस्टमार्टम करून माझे शरीर निकामी करू नये. मी जिवंत असतानाच वैद्यकीय सल्लागार यांच्या सल्ल्याप्रमाणे माझ्या शरीरातून जास्तीत जास्त रक्त काढून घ्यावे व नंतर डोळे काढून घ्यावेत व प्रत्येक अवयव काढून  घ्यावा. माझ्या जिवंत शरीरातून अवयव काढला असतानाच कामी येऊ शकेल. माझ्या शरीरातून काढलेला कोणताही अवयव अथवा रक्त सत्ताधाऱ्यांना, जुलमी अधिकाऱ्यांना किंवा पक्षपात करणाऱ्यांना न देण्याचेही तो बजावतो. यातून त्याची आपल्या लोकांविषयीची तळमळ आणि निष्ठा दिसून येते. आपल्या शरीरातील प्रत्येक गोष्टीचा आपल्या शत्रूला कोणत्याही प्रकारचा उपयोग करता आला नाही पाहिजे याची दक्षता घेतो.

आपण काय करतो आहोत हे त्याला पूर्ण माहीत आहे. म्हणूनच तो असे म्हणतो की, 'तुमचे सरकार माझ्या इच्छेचा आणि मागणीचा गांभीर्याने विचार करेल आणि मला फासावर टांगून व पोस्टमार्टम करून माझ्या शरीर संपत्तीचा नाश न करता ती मला माझ्या देशबांधवांच्या उपयोगासाठी आणून देता येईल याची मी अपेक्षा करतो'. खरंतर हे आणि अशा प्रकारचे मृत्युपत्र कोणतेही सरकार मंजूर करणार नाही. वीरभूषणच्या मनाची धमक आणि करारीपण ग्लाडला अस्वस्थ करून नमवते. (पृ. २८ आणि २९)

वीरभूषणचं मृत्युपत्राला राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. यांच्या मृत्युपत्रातून काव्य तयार होते. आपल्या मृत्युनंतरही आपल्या शरीराचे अवयव लोकांच्या उपयोगी पडावे. ही त्याची इच्छा आहे. तो स्त्रियांचा आदर करतो, शत्रूंना साहाय्य करतो. त्याचे सगळ्यांशी मित्रत्वाचे नाते आहे. त्यांच्या आचार विचारातून मनामधील माणुसकीचे आणि आपुलकीचे दर्शन होते. त्याचे वागणे क्रांतिकारकाचे आहे, दृष्टी संतांची आहे तर कृती जगाच्या कल्याणासाठी देह कामी यावा या प्रकारची आहे.

शत्रूंनी तारीफ करावी असे साहस, स्वाभिमान आणि स्वीकारलेल्या कामाशी इमान ही वीरभूषण पटनाईक याची जमेची बाजू आहे.

मिस्टर ग्लाड यांनी आपल्या लेकीच्या (जेनिफर) बाळंतपणाची सुसज्ज सोय करून ठेवली होती. मात्र प्रचंड पाऊस सर्वत्र पूरजन्य परिस्थिती व निसर्गाच्या आक्राळ-विक्राळ रूपाने सर्व यंत्रणा ठप्प होतात. त्यात रविवार असल्याने आणि आर.एम.ओ. सुट्टीवर गेल्याने ग्लाडचे सर्व मनसुबे नेस्तनाबूत होतात. जेनीला प्रसववेदना सुरू झाल्या. दाई आणि नर्स यांनी प्रयत्नांची शिकस्त केली मात्र यश आले नाही. परिस्थिती हाताबाहेर गेली. आता जेनीला मृत्यूशिवाय तिला कोणी सोडवू शकणार नाही. एका बाजूला जेनीची अवघडलेली स्थिती आणि दुसऱ्या बाजूला ४ ते ५ तासात वीरभूषणला फासावर चढवायचे या पेचात ग्लाड होता. त्याला काही कळत नव्हते.

नर्सच्या सांगण्यावरून सर्व नियम धाब्यावर बसवून मिस्टर ग्लाड वीरभूषणला कोठडीतून काढून जेनीला त्याच्या ताब्यात द्यायचे ठरवतो. कैदी आणि फासावर जाणारा वीरभूषण अत्यंत उत्तम रीतीने व अत्यंत कमी साधनांच्या साहाय्याने तो लीलया पार पडतो. यात त्याचे धारिष्ट्य, हिम्मत आणि स्वतःवर विश्वास असल्याने, जेनीचे ऑपरेशन करून तिला मृत्यूच्या दाढेतून सोडवून तिच्या बाळासह सुखरुप सुटका करतो. ही गोष्ट भल्याभल्यांची ह्रदय हेलावून सोडते. ही गोष्ट वीरभूषणला आहे त्यापेक्षा कितीतरी पट्टीने महान करून सोडते.

कादंबरीच्या शेवटी शेवटी ग्लाडमधील माणुसकी जागृत होऊन तो वीरभूषणचे मरण मात्र टाळू शकत नाही. मात्र त्याला वीराचे मरण देतो. त्याच्या छातीवर ग्लाड आपल्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून दोन गोळ्या झाडून फाशीचा दोर स्वतःच्या गळ्यात अडकून घेतो. आपल्या लाडक्या मुलीला दिलेले वचन पार पाडतो. आपल्याला वीर मरण दिल्याने नक्षलवादी आनंदी होतो आणि 'थँक यू मिस्टर ग्लाड' असे शब्द वीरभूषणच्या तोंडून बाहेर निघतात. इथे खरे तर कादंबरी संपते.

या कादंबरीमध्ये वीरभूषणला कुत्र्याप्रमाणे फासावर लटकवावे लागत नाही तर निडर आणि लढवय्ये क्रांतीकाराला लाभणारे अनपेक्षित, छातीवर गोळ्या झेलून वीराचे मरण येते. कादंबरीतील ग्लाडच्या त्याच्या मनातील चाललेला संघर्ष हा कादंबरीचा शेवट करते. वीरभूषणला हौतात्म्य मिळते. ग्लाड जो जेलर असतो तो कैदी बनतो.

**२) मिस्टर ग्लाड :**

मिस्टर ग्लाड हा अँग्लो इंडियन आहे. तो क्रौर्याचा प्रतीक आहे. ही विकासी (कादंबरीतील काही पात्रांमधील बदल घडून येत असतो. त्यांना विकासी पात्र असे म्हणतात. कादंबरीच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत असे पात्र सतत आपल्यामध्ये जानवेल एवढा बदल दाखवत असते) अशी व्यक्तिरेखा आहे.

तसं पाहायला गेल्यास मिस्टर ग्लाड हा या कादंबरीचा नायक नाही. मात्र मिस्टर ग्लाड पासून ही कादंबरी सुरु होते आणि संपते देखील. ग्लाडमुळेच 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी ग्लाडच्या अवतीभोवती फिरत असताना दिसते. ग्लाडच्या नावावरुनच या कादंबरीच्या शीर्षकाची सार्थकता पटते.

दराऱ्याचे दुसरं नाव मिस्टर ग्लाड. मिस्टर ग्लाड हा राजमहेंद्री जेलचा मुख्य जेलर होता. अत्यंत कठोर, करडा, पाषाणह्रदयी म्हणून सुप्रसिद्ध आहे. तो राजनिष्ठ आहे. देशभक्ती वगैरे तो नेमकी जाणत नाही पण आदेशाचे तंतोतंत पालन करणे, हे त्याच्या रक्तात आहे. माणसाला फासावर देताना त्याला मजा वाटते. इतरांवर दरारा निर्माण केल्याने आपल्याला कैदी घाबरतात असा त्याचा समज आहे. त्याच्या दहशतीखाली सर्वजण वावरतात. आपला दरारा कुणीच बंद करू शकत नाही यामुळे त्याच्यामध्ये एक नवीनच मस्ती निर्माण झाली आहे. ही मस्ती अधिकाराची, ही मस्ती बळाची आणि जुलमाचीही आहे.

ग्लाड असा क्रूरकर्मा होण्यामागे त्याच्या आयुष्यातील काही अघटित घटना कारणीभूत असताना दिसतात. ज्या काळात ग्लाड जर्मनीमध्ये आपल्या पत्नी सोबत राहत होता, त्यावेळी जर्मन देशात हिटलरची तानाशाही चालू होती. ज्यू लोकांना नष्ट करणे त्याने ठरवले होते. हिटलरने आणि त्याच्या नाझीवादाने लोकांचा जो अमानुष छळ केला, त्याला सर्व जगात तोड नाही. मरियमच्या केसाला धरुन अत्यंत क्रूरपणे नेताना गेस्टापो दिसतात. मरियमच्या झिंज्या उपटत, फरपटत नेताना ग्लाड त्यांचा प्रतिकार करू शकत नाही. तो फक्त हिटलरच्या गेस्टोपोच्या पाया पडून गयावया करतो. त्याची स्वाभिमानी पत्नी कुणापुढेही शरणागती न पत्करता निक्षून सांगते की कुणापुढे शरण जायचे नाही. तो यावेळी ह्रदयशून्य झाल्याचे कादंबरीत कळते. म्हणून मारा ग्लाडला उद्देशून म्हणते की, "पुरुषासारखा पुरुष असून षंढासारखा या अत्याचाऱ्याच्या पुढे लोळण का घेतो आहेस?" (पृ. १८, ६ वी आवृत्ती २०१७) स्वाभिमानी स्त्री असह्य होऊन त्याच्या मुस्कटात देते. या भयंकर घटनेने ग्लाडला प्रचंड हादरा बसतो. त्याचा माणुसकीवरील, चांगुलपणावरील विश्वास उडतो. त्याला झालेल्या जखमा याचा बदला तो गरीब, चोर, दरोडेखोर, जेलमध्ये आलेले जे कैदी आहेत त्यांना प्रचंड मारुन घेतो. एखादा शिकारी जसं आपलं सावज शोधत असतो त्या पद्धतीने ग्लाड माणसाला प्रचंड बडवून काढण्याकरिता सावज म्हणून शोधतो. याची दहशत कादंबरीच्या पानापानात आपल्याला दिसून येते. उदाहरणार्थ 'साहेबांची पावले डांबरी रस्त्यावर खाडखाड वाजू लागली तशी अस्वस्थ झाडावरल्या पाखरांची किलबिलही शांत झाली.' (पृ. १) ग्लाड साहेबांचे आगमन ही कुणाच्याही उरात धडकी भरवते. दहशत आणि दराऱ्याने राजमहेंद्री जेलमध्ये मिस्टर ग्लाडची एकहाती सत्ता आणि साम्राज्य आहे. हळूहळू या ग्लाडमध्ये ह्रदय परिवर्तन होऊ लागते. तो कठोर नाही याची जाणीव आपल्याला वीरभूषणची बायको उमा त्याला भेटण्यासाठी येते त्यावेळी कळते. ग्लाडला उमाच्या पायातील भेगा पाहून त्याला स्वतःचे वाईट दिवस आठवतात. नक्षलवाद्याच्या बायकोकडे पैसा नसल्याने ती जवळपास अनवाणी पायाने भर उन्हाळ्यात दीडशे मैलाचे अंतर पार करून आलेली आहे. दिवसभर ती आपल्या मुलाला कडेवर घेऊन जेलच्या बाहेर उभी असते. खरे तर ग्लाडला नक्षलवाद्याचा सूड घ्यायचा असतो. नक्षलवादाची बायको नक्षलवादी सारखीच स्वाभिमानी आहे. ती दयेचा अर्ज नाकारते. नक्षलवाद्याच्या बायकोचा कणखरपणा पाहून ग्लाड हवालदिल होतो. अशावेळी उन्हाचे चटके बसून तिची करपलेली त्वचा या संदर्भात त्याला तिच्या सौंदर्याची कल्पना येते. तिच्याबद्दलचा आदर भाव त्याच्या मनात जागृत होतो. उमाला तो पैसे पाठवतो. पण ती स्वाभिमानी असल्यामुळे घेणार नाही हे जाणून तो आपले नाव सांगू नकोस अशी सूचना सांगून जेलमध्ये कैद्यांसाठी असे पैसे सुरु झाल्याचे तो सांगतो. त्यातून त्याचे थोडे ह्रदय परिवर्तन झाल्याचे, त्याच्यात माणुसकी जागी असल्याचे तसेच त्याचा चांगुलपणाही दिसून येतो.

ग्लाड हा एका बाजूला क्रूरकर्मा होता असे जाणवते. जेलमध्ये आलेल्या प्रत्येक कैद्याची आपल्या नालबंद बुटाखाली कैद्याची पावले बेदरकारपणे तुडवणारा असा आहे. या दरम्यान

त्याच्या तोंडी असे वाक्य आले आहे की, (वीरभूषण पटनाईक साल्याला सोल फाटेपर्यंत बुटाने तुडवून काढल्याशिवाय मला सुखाने झोप यायची नाही) एकेका फाशीच्या कैद्याला फाशीवर चढताना एखादे धार्मिक कृत्य केल्याचे सात्त्विक तेज ग्लाडच्या चेहऱ्यावर उमटते. एका बाजूला हे चित्र आहे तर दुसऱ्या बाजूला तो हळवासुद्धा आहे. मातृछत्र हरवलेल्या जेनिफरवर तो मनापासून प्रेम करतो. पित्याचे वात्सल्य, आपुलकी याचा वर्षाव तिच्यावर करतो. ग्लाडच्या मनात मरियम आणि तिच्या न विसरल्या जाणाऱ्या स्मृती यांना या कादंबरीत खूप महत्त्वाचे स्थान आहे. ग्लाड जेनीवर मनापासून प्रेम करतो. त्याच्या जीवनात त्यांच्याशिवाय त्याला असे कोणी नातेवाईक नाही, कधी तो प्रचंड दारू ढोसतो. अभद्र शिव्या देतो आणि त्याच्या प्रिय पत्नीबद्दलची गाणे...

हे प्रिया तुझ्यासाठी सैतानाला ही...
आव्हान दिले मी पण तुझ्याचमुळे
का ईश्वरालाही विसरलो मी

असे म्हणतो. आपल्या एकमेव लाडक्या लेकीची बाळंतपण आपल्या घरी व्हावे अशी त्याची खूप इच्छा आहे. त्यासाठी खूप तो तयारीही करतो. पण ज्या काळात जेनीच्या बाळंतपणात अडचणी येतात, त्या काळात डॉक्टर असलेल्या वीरभूषण या नक्षलवाद्याकडे आपल्या मुलीला सोपवताना बापाच्या मनातली उलघाल आपल्याला स्पष्ट जाणवते. ग्लाडच्या मनातील वडील या काळात प्रभावी ठरतात.

लाडकी लेक जेनिफर घरी येण्याअगोदर ग्लाड वेगळा आणि आल्यानंतर वेगळा वाटतो. लेक घरी आल्यानंतर त्याच्यामध्ये हळूहळू बदल व्हायला लागतात. हिंस्त्र वाघासारखा असणारा ग्लाड हळूहळू माणसामध्ये वावरायला लागतो. भटार खाण्यातील जेलर शिपायाच्या घरी माणुसकी म्हणून दुर्गा पुजेला जाणे, शिपायाची चार-पाच मुलं त्याच्या बंगल्यात खेळू लागतात. हा ग्लाडमध्ये बदल आहे. कैद्यांना चांगल्या प्रकारचे जेवण देणे, चांगले इस्त्रीचे कपडे, लॉन्ड्रीचा बिछाना देणे, त्यांच्याशी सौजन्याने वागणे, भटार खाण्यात गोड जेवण करण्यास सांगणे, चांगल्या वस्तू वापरा, भाकरी जाळू नका, हे सर्व त्यांच्यातील माणुसकी दाखवून देते. जेनी सुखरूप घरी परत आल्याने तो वेडा होऊन जातो. वीरभूषणला फाशी न देता गोळ्या घालून त्याला ठार करतो. त्याला वीरमरण देतो. अशावेळी जेनीच्या आग्रह त्याला आठवतो. आपल्या लाडक्या लेकीसाठी स्वतःच्या गळ्यामध्ये फाशीचा दोर अर्थात अपराधी बनतो. ग्लाडची मध्यवर्ती आणि महत्त्वाची भूमिका, त्यातील गुंतागुंतीच्या च्छटा रंगवून निर्माण केली पण यामुळे वाचकाला प्रचंड आनंद मिळतो.

### ३) मिस्टर ग्लाडची पत्नी मरियम उर्फ मारा :

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही अत्यंत प्रवाही असलेली कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये जास्त पात्रे नाही परंतु जी पात्रे आहेत त्यांचा अत्यंत कौशल्याने वापर या कादंबरीत दिसतो. ग्लाडची पत्नी प्रत्यक्ष या कादंबरीमध्ये नाही. ती ग्लाडच्या आठवणीमध्ये सतत आहे. तिच्याबद्दलच ग्लाडच्या मनामध्ये एक प्रकारचा नॉस्टेल्जिया आहे. आपल्या पूर्वस्मृतीमधून टप्प्याटप्प्याने माराचे व्यक्तिमत्त्व प्रकट होताना दिसते.

मरियम अत्यंत सुंदर कापरासारखी गोरी गोरी आणि मृदू स्वभावाची आहे. तशी ती कणखर आणि स्वाभिमानी आहे. ती धर्माने ज्यू होती. ती जर्मन मध्ये राहत असते. जर्मनी मधील

एका शाळेत ती शिक्षिका होती. या कादंबरीमध्ये हिटलर आणि त्याचा ज्यू द्वेषाची बळी पडलेली माराही एक दुर्दैवी स्त्री आहे. या कादंबरीत अत्यंत दुर्दैवी रीतीने तिचा मृत्यू होतो.

हिटलरचा ज्यू द्वेष जगजाहीर आहे. हिटलरचा नाझी गेस्टापोला माराला तिच्या केसाला धरुन फरपटत नेतो. त्यांची क्रूरता इतकी भयानक होती की त्यांच्या कृतीपुढे ग्लाड नमते घेतो. या गेस्टापो समोर लाचार होतो. तिच्यासाठी तो दयेची भीक मागतो. अशावेळी मारा ताडकन उद्गारते "पुरुषासारखा पुरुष असून षंढासारखा या अत्याचाऱ्यांच्या पुढे लोळण का घेतो आहेस?" असे म्हणून ती ग्लाडच्या मुस्काटात लगावते. अशी बाणेदार स्त्री लेखकाच्या हातून चित्रित झाली आहे. लेखकाने स्त्रीचा सातत्याने संदर्भ वापरुन वाचकांच्या मनाला हेलावून टाकले आहे. मरियमच्या आठवणी, त्यावेळच्या घटना ग्लाडच्या मनावर आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वावर याचा गंभीर ठसा उमटला आहे. या भयंकर घटनेमुळे ग्लाडला प्रचंड हादरा बसला आहे. वीरभूषण एका ठिकाणी यासंदर्भात म्हणतो, "जुलमी, अत्याचाऱ्याच्या पुढे गुडघे टेकवणारे कधीच मदत करु शकणार नाही, मरियमला तुम्ही मदत करु शकला नाही. इत्यादी." या घटनेचा ग्लाडच्या मनावर परिणाम होतो. नक्षलवाद्यांच्या बाणेदारपणापुढे त्याच पद्धतीने न घाबरणाऱ्या वृत्तीपुढे ग्लाड स्तब्ध होतो. आपल्या बायकोमधील कुणाही पुढे शरण न जाणे, ही बाणेदारवृत्ती नक्षलवादी आणि त्याची बायको उमा यांच्यामध्ये त्याला दिसते. म्हणून तर वीरभूषण पटनाईक यास ग्लाड थोड्या सोई-सवलती पुरवण्याचा प्रयत्न करतो.

मरियम ही व्यक्तिरेखा स्वाभिमानी आणि ताठ कण्याची आहे. अन्याय करायचा नाही आणि अन्याय करण्याराला शरण जायचे नाही. अशा ठाम विचारांची असल्यामुळे मरायला सुद्धा तयार होते. ग्लाडची अगतिकता, लाचारी तिला भित्रेपणा वाटतो. अशी करारी, स्वाभिमानी, धाडसी, बेधडक मारा, ग्लाड शेवटपर्यंत तिच्याच आठवणी काढतो.

### ४) वीरभूषण ची पत्नी उमा :

अनिल बर्वे यांनी या कादंबरीमध्ये मोजक्याच स्त्रियांची वर्णने केली आहेत. त्यापैकी उमा ही एक स्वाभिमानी स्त्री. उमा ही वीरभूषण पटनाई याची पत्नी आहे. ग्लाडला मरियमच्या म्हणजेच माराच्या आठवणी तिच्यामुळेच आल्या आहेत. कदाचित असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, माराच्या आठवणी ताज्या करण्यासाठी या स्त्रीचे व्यक्तिचित्र कादंबरीमध्ये येते. उमा ही तरुण तडफदार आणि करारी बाण्याची स्त्री प्रतिमा आहे. कादंबरीमध्ये लेखकाने दोन ते तीन वेळाच उमा या पात्राचा उपयोग करून घेतला आहे. तीसुद्धा स्वाभिमानी आहे. शरणागती पत्करणे तिला मान्य नाही. जुलूम करणाऱ्यांच्या पुढे नतमस्तक होणे तिला मान्य नाही.

कादंबरीत उमाचे चित्रण पुढीलप्रमाणे येते. कधीकाळी जीचा चेहरा अतिशय गोड असावा अशी पंचविशीची तरुणी, नजरेत भिजलेली दु:ख आणि चेहऱ्यावर उमटलेली उदासीनता घेऊन, कडेवर तान्ह्या पोराला सांभाळत भर उन्हात अनवानी पायाने चालते येते. (पृ. १६) उमा सव्वाशे ते दीडशे मैलवरुन भर उन्हाळ्या दिवसात, अनवाणी पायाने आपल्या मुलाला घेऊन चालत येते ती आपल्या नवऱ्याला भेटण्यासाठी. आपल्या नवऱ्याचा आत्मविश्वास तर डगमगला नाही ना? याची आठवण करून देण्यासाठी ती आलेली आहे. या भेटीदरम्यान वीरभूषण पटनाईक याला जाड दोरखंडाने आवळले जाते. अशावेळी ही बाणेदार उमा आपल्या करारी बाण्याने धाडकन बोलते, "मर्सी पेटिशनवर सही करणार नाही, कधीही नाही, जीव गेला तरी हरकत नाही. जुलम्या पुढे गुडघे का म्हणून टाकायचे?...." (पृ.१८) तिचा निर्भयपणा,

बाणेदारपणा, निडरपणा यामुळे खरतर मिस्टर ग्लाड खाली कोलमडायचा बाकी राहतो. त्याला प्रचंड धक्का बसतो. वेळ कशी आहे या बाईने प्रत्यक्षात काय करायला पाहिजे ? आणि ती काय करते ? यामुळे तो चकित होतो.

उमा मिस्टर ग्लाड ने देऊ केलेले आर्थिक साहाय्य नाकारते. त्यांच्या पत्नीने उच्चारलेल्या बाणेदार आणि तेजस्वी उच्चाराने ग्लाडच्या मनात अधिक अंधार होत जातो.

उमाच्या तडफदार स्वभावामुळे ग्लाडच्या मनात पत्नीच्या (मारा) आठवणी जागृत होतात. त्यामुळे जखम हळूहळू भरत येणारी आणखी कुरतडली जाते. आपल्या नोस्टॅल्जियामध्ये नेहमीप्रमाणे ग्लाड आणखी आत शिरत जातो.

उमा ही बाणेदार, कर्तव्यदक्ष पतीची खरोखर अर्धांगिनी शोभते. पतीला त्याच्या इच्छेप्रमाणे उत्तेजन देण्याचा प्रयत्न करते. ती याचा विचारही करत नाही की, तू गेल्यानंतर आमचे काय होईल ? ती स्वाभिमानी, स्वावलंबी आणि प्रचंड कष्टाची तयारी करण्याची क्षमता तिच्यात आहे. स्त्री असली म्हणून काय झालं प्रचंड हिम्मत आणि जगण्याची उमेद तिच्यात आहे. एवढे सर्व होऊन ही आपला नवरा फाशी जाणार हे माहीत असूनही, ती बिलकुल डगमगत नाही. तर जाता जाता नवऱ्याला असे आश्वासन देते की, तुम्ही गेल्यानंतर ही तुमची क्रांती अशी चालू राहील. या मुलाला मी असे वाढवेल की, तो तुमच्यापेक्षा अधिक मोठा क्रांतिकारक झाला पाहिजे. कारण तिला माहीत होते एका क्रांतिकारकाच्या रक्ताने, त्याच्या बलिदानाने, अनेक क्रांतिकारक तयार होतात. आपण नक्कीच यशस्वी होऊ असा तिचा ठाम विश्वास आहे.

**५) जेनिफर :**

'जेनिफर' ही मिस्टर ग्लाड आणि मरियम यांची एकमेव मुलगी आहे. निसर्गाने भरभरुन सौंदर्य तिला दिले आहे. आईची छबी घेऊनच ती आले आहे. एखादी परी शोभावी अशा पद्धतीचे तिचे सौंदर्य आहे. या कादंबरीतील जेनी एक लक्षवेधी पात्र आहे. ती स्वतंत्र विचारांची एक मुलगी आहे. जी लहानपणापासून जर्मनमध्ये राहते. तिची आई ज्या शाळेत शिक्षिका होती त्याच शाळेत आणि त्या शाळेच्या होस्टेलमध्ये तिचे बालपण गेले. याच शाळेमध्ये तिचे शिक्षण पूर्ण झाले. ग्लाडने आपल्या मुलींना कुठल्याही त्रास होऊ नये याची पुरेपुर दक्षता घेतलेली आहे. तिला अत्यंत लाडात त्याने वाढवलेली आहे. तिला आई नाही याची कधीही त्यांनी जाणीव सुद्धा होऊ दिली नाही.

जेनीने वडिलांना न विचारता आपला जोडीदार निवडला. त्याच्या बरोबर लग्न केलं. काही दिवसांनी, वर्षांनी त्याच्याबरोबर पटलं नाही म्हणून काडीमोड (डिव्होर्स) घेऊन आता बाळंतपणासाठी आपल्या वडिलांकडे आलेली आहे. खरेतर मिस्टर ग्लाडला आपल्या मुलीने मला न विचारता लग्न केलं. त्याचा खूप राग आला होता. जवळपास वर्षभर त्यांनी तिच्याबरोबरचे सर्व संबंध तोडले होते. पण आज ती स्वतःहून भारतात येत असल्याने तिला मोठ्या मनाने ग्लाड माफ केले. तिचे सर्व अपराध ग्लाडने आपल्या पोटात घातलेले आहे. आपण आजोबा होणार याचा त्याला सर्वात जास्त आनंद झालेला आहे. म्हणून आपल्या लेकीची सर्व प्रकारची सोय करण्याचा तो प्रयत्न करतो.

जेनी अत्यंत धाडसी आहे. पत्रकारितेमध्ये काहीतरी नवीन कराव अशी तिची मोकळ्या स्वभावाची जेणे म्हणजे वडिलांचा जणू स्र्वगच. जेनी ही पारंपरिक रोमँटिक नायिकेसारखी आहे. ती मुळात हळुवारता आणि कवी मनाची आहे. लहानपणापासूनच जेनीला आपल्या पित्याचे प्रेम मिळालेले नाही. तिचे सर्व पालन-पोषण शिक्षण जर्मनीत जरी झाले तरी ती वडिलांप्रमाणेच अँग्लो इंडियन आहे. भारतीयत्वाचे सर्व संस्कार तिच्यावर झालेले आहे. भारतातील हिंदू लोकांबद्दल तिला बरीच माहिती आहे. हिंदूंचे धर्म आणि देवळासंबंधी सुद्धा तिला खूप माहिती आहे. हिंदू तत्त्वज्ञान आणि हिंदूच्या धर्मग्रंथांची तिला बरीच माहिती आहे. तिथं पुनर्जन्मावर विश्वास आहे.

जेनी आपल्या वडिलांकडून वीरभूषणची कथा ऐकते. त्यावेळी ती आपल्या वडिलांना उत्साहाने म्हणते, की पप्पा मला त्या क्रांतिकारकला भेटायला आवडेल. ग्लाडच्या परवानगीन जेनी नक्षलवादाला भेटते. नक्षलवाद्यांना पाहिल्याबरोबर तिच्या मनात येते की, दोन वर्ष पूर्वी भेटला असतात तर खूप काही वेगळा असतो. वीरभूषण ती सांगते की, तू मला मनापासून आवडला आहेस. कदाचित पती म्हणून तू माझा झाला नाही तरी चालेल मात्र तुझ्या सारखा मुलगा मला होऊ दे. माझ्या पोटी तू जन्म घे. अशी त्याला विनंती करते. या अगोदर वीरभूषण बरोबर कितीतरी गोष्टी ती बोलते. एकमेकांच्या आवडी-निवडी विचारल्या जातात. तत्त्ववेत्ता, रसिक, कलाकार, सर्जन, भला माणूस, कवी आणि अशी कितीतरी रूपे जेनीला वीरभूषणमध्ये दिसतात. स्वतंत्र्यता, समता, सामाजिकता, संघर्ष, नक्षलवाद, क्रांती करणे हे काय आहे हे जेनीला वीरभूषणकडून समजते. कविता कशी लिहावी, कविता कशी असते, कवितेचा आस्वाद कसा घ्यावा, उत्तम कविता कशी ओळखावी, हे जेनी ज्यावेळी आपली कवितेची वही वीरभूषणला दाखवते तेव्हा या सर्वांची माहिती जेनीला मिळते. आपले लग्न झाले आहे. असे तो तिला सांगतो. वीरभूषण ही तिचा आदर करतो.

जेनी आपल्या वडिलांना सांगते की, वीरभूषण अत्यंत उत्तम व्यक्ती आहे. बोलता-बोलता आपल्या वडिलांकडून ती अशी वचन घेत की, वीरभूषणला कुत्र्याप्रमाणे फासावर लटकवले जाऊ नये. कारण तिला तो योद्धा, क्रांतिकारक वाटतो. जेनी वीरभूषणची सर्व कहानी शांतपणे ऐकून घेते. त्याला कित्येक वेळेला भेटायला जाते. त्याच्याबरोबर मनमोकळे बोलते. वीरभूषणच्या शेवटच्या कालखंडामध्ये भगवत गीता, तसेच हिंदू फिलॉसॉफीचे ग्रंथ खास त्याच्यासाठी विकत घेते. ती भावनिक आहे.

मिस्टर ग्लाड आपल्या मुलीच्या बाळंतपणाची सर्व तयारी करत असतो. तिचे बाळंतपण आणि वीरभूषणची फाशी एका वेळेला येता कामा नये. असच ग्लाडला खूप वाटतं. मात्र जे होऊ नये तेच होते. सकाळी सहाला वीरभूषणला फाशी द्यायचे असते. त्या अगोदरच्या रात्री म्हणजेच फाशी द्यायच्या चार सहा तास अगोदर जेनी अत्यंत अवघडलेल्या स्थितीत अडते. वादळ वाऱ्यामुळे कुठे संपर्क करता येत नाही. जेलमधील डॉक्टर, आर.एम.ओ. हे सुट्टीवर असतात. अशावेळी ग्लाड आपल्या फुलासारख्या नाजुक मुलीला वीरभूषणच्या ताब्यात ऑपरेशन करण्यासाठी देतो. वीरभूषणही अत्यंत शांतचित्ताने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जेनीची आणि तिच्या बाळाची अतिशय कौशल्याने आणि लीलया सुटका करतो. डॉक्टरकीच्या पेशाला वीरभूषण जागला आणि शत्रूच्या मुलीला जेनीला प्रसुतीच्या वेदनेतून मुक्त करतो. शेवटी जेनीमुळेच ग्लाड वीरभूषणला छातीवर गोळ्या मारुन त्याला वीरमरण देतो. या कादंबरीत वीरभूषण 'थँक्यू' म्हणताच कादंबरी संपते.

## ६) वेंधळा जमादार

थँक यू मिस्टर ग्लाड या कादंबरीमध्ये एक सर्वसामान्यांचं प्रतिनिधीत्व करणारे पात्र म्हणजे वेंधळा जमादार. वेंधळा जमादार याच्याकडे पाहिल्यावर आपल्याला असं वाटतं की, ही रंगढंग करणारी व्यक्ती आहे. पान खाणे, डोक्याच्या केसांना आणि मिशाना मेहंदी लावणे, सतत बडबड करणे, हिंदी मधून बोलणे, सर्वांशी लगट करणे आणि सर्वांना बरोबर गप्पा मारणारा असा हा वेंधळा जमादार आहे.

थँक यू मिस्टर ग्लाड या कादंबरीत वेंधळा जमादार याच्यावर खरंतर अन्याय झालेला आहे. तो मिस्टर ग्लाड पेक्षा सीनियर आहे. तो या जेलचा मुख्य जेलर असायला हवा. मात्र त्याच्या बडबडीमुळे आणि बढाईखोरपणामुळे त्याला मागे टाकून, ग्लाडला या जेलचा मुख्य जेलर बनवले आहे. हे दु:ख तो विसरु शकत नाही. तरीही आहे त्या पदावर काम करून तो समाधान मानतो. वेंधळा जमादार हा नेहमी दिवा स्वप्नात रमणारा आहे. थोडा बढाईखोरही आहे. प्रत्येक नवीन व्यक्तीला भेटल्याबरोबर आपण किती शूर होतो, आपण जर्मनीच्या सैनिकांशी कसे युद्ध लढलो, जर्मन सेनापतीशी (रीमोलो) आपण दोन हात केलेले आहेत. तो घाबरुन पळून गेला. तो नेहमी आपण युद्ध कसे खेळलो इत्यादी समोरच्याला सांगायचा व त्यातच आनंदी राहायचा.

वेंधळा जमादार परिस्थितीने गरीब आहे. समंजस आहे. कधीकधी एक वेळचं जेवण तो जेलमध्येच करतो. तेवढेच घरादाराला वाचेल म्हणून. जमादाराला एक अत्यंत वाईट सवय आहे. ती म्हणजे कैद्यांची पत्रे चोरुन वाचणे. जे कैदी अडाणी आहेत त्यांची पत्र लिहून देणे, ती पोस्ट करणे हे त्याचे काम आहे. कित्येक लिहिलेले पत्र तर तो पोस्ट सुद्धा करत नाही. कैद्याच्या बायकोला पत्र लिहिताना तो फार खुषीत असतो... 'जन्म एकदाच मिळतो, या जन्मावर प्रेम करायला पाहिजे' हे तत्त्वज्ञान तो सांगतो. 'आपल्या मेहबूबा वर प्रेम करा' उर्दू शेर शायरी तो ओबड धोबड हिंदीत सांगतो. वेगवेगळ्या प्रकारचे शेर, चुटकुले आणि विनोद सांगण्यात तो तरबेज आहे. विनोदाच्या माध्यमातून तो स्वतः खूप हसून घेतो. हे त्याचं हसणं त्याच्या मनातील मळभ काढून टाकण्याचा प्रयत्न करतो.

वेंधळा जमादार कुणालाही आपण १९७२ ची पाकिस्तान बरोबर लढाई कसे लढलो ? हे वारंवार सांगतो. आपण कुठल्या तुकडीचे नेतृत्व करत होतो, त्यात नवीनच लग्न झालेल्या मुलाला आपण एका रात्रीसाठी त्याच्या घरी कस सोडलं, त्याला परत घेऊन कसा आलो, त्याची पत्र आपण कशी लिहीत होतो, हा तरुण खरंतर शिपाई नव्हता जेवण बनवणारा होता. त्याच्या दुर्दैवाने ज्या काळात लढाई चालू होती त्याकाळात बॉम्बचा एक सेल त्याच्या छातीवर येऊन आदळला. तो जबर जखमी झाला. प्रत्येक वेळी आपल्या बायकोला पत्रामध्ये काही लिहिताना तो त्याच्या आई-वडिलांना घाबरत असतो. मात्र या दिवशी तो आपल्या बायकोला पत्र लिहून घेताना खूप मोकळेपणाने डायरेक्ट बायकोलाच तिच्या नावाने पत्र लिहितो. आपण दागिने कुठे ठेवले आहेत? तुला भेटण्यासाठी लवकरच येणार आहोत वगैरे वगैरे सांगून तो गतप्राण होतो. ही कहाणी सांगायला तो कधी विसरत नाही.

सरळ साधा असणारा वेंधळा जमादार हा नेहमी गोंधळल्यासारखे राहतो. त्याच्यावर वेगवेगळ्या पद्धतीने अन्याय झालेले आहेत. त्यामुळे दबून राहणं त्याला भाग पडते. मिस्टर ग्लाड हा त्याच्यापेक्षा वयाने लहान असून त्याला नाही तसा बोलतो. वारंवार त्याचा अपमान करतो. मात्र हसून टाळून पुन्हा सर सर करण्याची त्याची तयारी असते.

**इतर पात्रे :**

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये वीरभूषण पटनाईक, मिस्टर ग्लाड मरियम, उमा आणि जेनी ही मुख्य पात्रे या कादंबरीत आहेत, यांच्याबरोबरच जमादार हे एक मनोरंजक पात्र आहे. या सर्वांच्या जोडीला या कादंबरीत एक वास्तू स्वरूपात पात्र आहे. या वास्तूचे नाव राजमहेंद्री जेल. कादंबरीचा खुपसा कथाभाग या जेलवर अवलंबून आहे. या जेलचे वर्णन पुढीलप्रमाणे येते. राजमहेंद्री जेलचा करकर करकर करणारा जुना दरवाजा भितीदायक वातावरण निर्माण करतो. जेलची मजबूत तटबंदी, बांधलेल्या उंच उंच भिंती आहेत. ज्या कैद्याच्या मनातील पळून जाण्याचे मनसुबे धुळीला मिळवतात. भटार खाना, लोहार, सुतार, कार्यशाळा, पाण्याचा हौद, नळ, कैद्यांची अंघोळीची जागा, कैद्याच्या बरँक, तिचा लोखंडी सळ्यांचा दरवाजा, बेडी, दंडा बेडी, कैद्याना दिल्या जाणाऱ्या शिक्षेच्या अघोरी पद्धती, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वांचा काळजाचा ठोका चुकवणारे फासी गेट, त्याचे आक्राळ विक्राळ रूप. या जेलने, त्याच्या भिंतीने १५० च्या वर फाशी पाहिलेल्या आहेत. जेलकडे जाणारा आणि येणारा डांबरी निर्मनुष्य रस्ता, उंचच उंच वाढलेली झाडे. असे या जेलचे कितीतरी भाग आहेत. गेली २८ वर्षापासून मिस्टर ग्लाडची दहशत तो सहन करतो आहे. तो सर्व गोष्टीचा साक्षीदार आहे. पात्र निर्जीव असले तरी या कादंबरीचा जवळपास ७५ टक्के भाग या जेलवर पार्श्वभूमी म्हणून अवलंबून आहे. त्यामुळे ते एक पात्र होऊ शकते.

याशिवाय सुईन, नर्स, सेंट्री, फाशी गेटचा जेलर, वेडा कैदी, आर.एम.ओ. बाळंतपणासाठी येणारी महिला कैदी अशी दुय्यम पात्रेही या कादंबरीचा आधार तोलून धरण्यासाठी आणि कार्यकारण संबंधाने सर्व गोष्टी जुळून याव्या म्हणून या कादंबरीमध्ये आलेली आहेत.

**सारांश :**

थँक यू मिस्टर ग्लाड ही ठाशीव आकारबद्ध आणि गोळीबंद कादंबरी आहे. अत्यंत प्रभावी असलेली ही कादंबरी प्रवाही कादंबरी आहे. कादंबरी छोटी आहे. मात्र या कादंबरीने खूप मोठा विषय आणि आवाका लक्षात घेतला आहे. ही कादंबरी परिणामकारक होण्यासाठी लेखकाने या कादंबरीमध्ये पात्रांचे चित्रण अत्यंत उत्तम आणि रेखीवपणे केलेले आहे. ठसठशीत डोळ्यात मनात भरेल असे.

वीरभूषण पटनाईक हा पारंपरिक पद्धतीचा नायक आहे. तो धीरोदात्त, एक वचनी एक पत्नी आहे. तसेच तो सत्यवचनी व मार्क्सवादी विचारांचा आहे. तो तज्ज्ञ डॉक्टर आहे. साधारणपणे ३० वर्षाचा तरुण, ज्याच्या अंगात सळसळते रक्त आहे, जो समानता मानतो, असा वीरभूषण या कादंबरीमध्ये शौर्याचे प्रतीक म्हणून दिसतो. ही कादंबरी त्याच्याभोवती केंद्रभूत झालेली आहे. मिस्टर ग्लाड क्रूरकर्मा व वत्सल पिता आहे. वीरभूषणला कुत्र्याप्रमाणे फासावर लटकून मरण न देता त्याला, वीराचे मरण देणारा आहे. यासाठी स्वतः अपराधी होतो. आणि सर्व माहीत असूनही स्वतःच्या हातात बेड्या ठोकून घेतो. या जेलमध्ये २८ वर्षे त्याचा दरारा आहे, त्याच्या रिटायरमेंटला काहीच वर्षे शिल्लक असताना याच जेलमध्ये कदाचित कैदी म्हणून त्याला रहावे लागते. असा नराचा नारायण झालेला ग्लाड आहे.

मिस्टर ग्लाड आयुष्यभर साथ देण्याचे वचन देऊनही, हिटलरच्या ज्यू द्वेषीपणामुळे अर्धवट साथ सोडून जिला जावे लागते ती मारा. तिचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या मनाला चटका

देऊन जाते. कादंबरीमध्ये मारा नाही तरीसुद्धा ग्लाडच्या मनात ती दुखरी सल आठवणीच्या रूपाने येते. त्याच्या आठवणी मध्ये ती साठवलेली आहे. जिच्या झिंज्या धरुन तिचे अत्यंत हाल-हाल करून तिला हिटलरचे नाझी गेस्टापो गॅस चेंबर मध्ये डांबून मारण्यासाठी मिस्टर ग्लाड जवळून फरफटत नेतात. जी मरणाला न घाबरणारी, स्वाभिमानी जुल्म्यांच्या पुढे शरण न जाणारी बाणेदारपणे बोलणारी एक लढवय्या स्त्री म्हणून मरियम अर्थात माराकडे पाहावे लागते.

उमा ही खऱ्या अर्थाने नक्षलवाद्याची अर्धांगिनी. आपल्या नवऱ्याला नक्षलवादी क्रांतिकारक म्हणून पूर्णपणे मोकळा सोडणारी. एक पंचवीस वर्षांची तरुणी. कणखर बाण्याची, ताकदवान, विचार करणारी आणि ज्या पद्धतीने वीरभूषण वागतो त्याचं प्रतिरूप असलेली उमा. दुःख, यातना, कष्ट उपासनेसाठी तिचा जन्म झाला आहे असे मानणारी. आपली क्रांती चिरायु होईल असा आशावाद असणारी. नक्षलवादाचा शेवट फाशी आहे असे समजूनही आपल्या एकुलत्या एक बाळाला नवऱ्यापेक्षा अधिक चांगला क्रांतिकारक बनवण्याची वचनही देते.

जेनी ही ग्लाड आणि मरियमची गोरी गोरी पान फुलासारखी छान, परीचा रूपाने उतरणारी, सुंदरशी मुलगी या कादंबरीतील अद्भुत रसायनचा गोडवा जपणारी. स्वतंत्र विचारांची, हेकेखोरपणा हे तिच्या रक्तात आहे. वडिलांना न सांगता लग्न करणे, नवऱ्याबरोबर काडीमोड घेणे आणि होणाऱ्या बाळाला जन्म देण्यासाठी वडिलांकडे भारतात येणे. धाडशीपणा जो उपजत तिच्याकडे आहे. स्वच्छंद विचाराची, आधुनिकतेकडे झेपावणारी, नव्या विचारांची आणि वीर भूषणला फासावर चढू नये असं वडिलांकडून वचन घेणारी जेनी या कादंबरीमध्ये दिसते.

वेंधळा जमादार यांच्या निमित्ताने चमत्कारिक, विनोदबुद्धी, सर्वसामान्य व्यक्ती आणि हास्याचे रंग या कादंबरीमध्ये भरलेले आहेत.

याशिवाय नर्स, दाई फाशी गेटचा जेलर, सुपरिटेंडेंट, सेंट्री, इतर जमादार वेगवेगळ्या प्रकारचे कैदी अशा लोकांच्या माध्यमातून या कादंबरीला सजीवतेचे रूप देण्यासाठी अनेक माणसं अनेकांची चित्रण या कादंबरीमध्ये दिसून येतात.

## २.७ 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचे वातावरण

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही परिपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. दिसायला ही छोटीशी आहे मात्र या कादंबरीने भारतातील एक मोठा प्रश्न मांडला आहे.

लेखकाने या कादंबरीमधील चित्रदर्शन शैलीचा उपयोग केला आहे. जसे आपण एखादा चलचित्रपट पाहत आहोत, अशा पद्धतीची या कादंबरीची रचना आहे. घटना, प्रसंग इतके बेमालूम एकमेकांत गुंतले आहे की, आपल्याला प्रत्यक्ष त्या ठिकाणी काय घडले आहे हे डोळ्यासमोर दिसायला मदत होते.

कादंबरीतील वातावरण हे कादंबरीतील घटना, प्रसंगांना, पात्रांना वास्तवता किंवा सजीवता प्राप्त करून देण्यासाठी लेखकाने निर्माण केली ही एक क्लुप्ती असते. कादंबरीतील पात्रांच्या अवस्था काय आहेत? रंगरूप काय आहे? त्यांची भाषा काय आहे? आजूबाजूच्या

वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम काय होतो ? या सगळ्या घटनांची वातावरणामध्ये नोंद घेतलेली असते. कादंबरीतील वातावरणामुळे वाचकाला काही वेळा प्रसंग दृश्य स्वरुपात दिसू लागतात. कारण वाचकाच्या मनात दडलेल्या काही गोष्टी याचे लेखक सूचन करतो. त्या गोष्टी, विशिष्ट घटनेच्या धाग्याप्रमाणे उलगडत जातात. आपल्या आजूबाजूला सकाळ, दुपार, संध्याकाळ, थंडी, वारा, पाऊस ह्या गोष्टी असतात अशाच प्रकारच्या संवेदना लेखक त्याच्या कादंबरीमध्ये पात्रांना आणि वाचकांना देण्यासाठी वापरत असतो.

कादंबरीतील वातावरणाला स्थल कालावकाश असे म्हणतात. स्थळ ठिकाण दाखवणे आणि ठिकाणाची तीव्रता किंवा त्यातील जडण-घडण व्यक्तीच्या मनाशी किंवा भावनेशी लेखक जोडून दाखवत असतो आणि त्याचे वातावरण करून लेखक पात्रांच्या मनातील भय, घाई, निर्भय, आनंद इत्यादी गोष्टी सुचवत असतो.

'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरी आकाराने छोटी असल्याने या कादंबरीत स्थळ कालावकाश हे कमी प्रमाणात आहे. या कादंबरीमधून ज्या ठिकाणाहून या प्रकारची वातावरण निर्मिती होते असे भाग पुढीलप्रमाणे.

कादंबरीत चित्रित झालेला राजमहेंद्री जेल, याचे अजस्त्र आणि किरकिरणारे दरवाजे, कचकन ब्रेक लावून गाडी थांबणे. तिच्या टायरचे रस्त्याबरोबर झालेले घर्षण यातून आलेला आवाज, निर्मनुष्य रस्ता, ग्लाडचा बंगला, बंगल्याचा व्हरांडा, मेन गेट, फाशी गेट, यार्ड, दवाखाना, भटारखाना, पाण्याचा हौद, नळ, नळावर चाललेली कुजबूज, मारहाण करताना निघणाऱ्या किंकाळ्या, बेरेक्सच्या लोखंडी गजावर ग्लाडची आपटणारी काठी, बुटांच्या टापांचा आवाज, प्रत्यक्ष निसर्गातील ढगांचा गडगडाट, लखलखणारी वीज, धो धो पडणारा पाऊस, जेनीच्या प्रसूती कळाच्या किंकाळ्या, राजमहेंद्री जेलच्या आसपास असलेला निर्जन टापू, चहूबाजूंनी वेढलेला समुद्र, वादळ वारा, एक प्रकारचे तुफान, भीतीची जाणीव निर्माण करते इत्यादी सर्व गोष्टी या कादंबरीतील वातावरण निर्माण करण्यासाठी उपयोग केला जातो.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीची सुरुवात जर आपण पाहिली तर ग्लाडचा प्रचंड दरारा सूचित करण्यासाठी लेखकाने पुढीलप्रमाणे वातावरण तयार केले आहे.

"ग्लाड साहेब रस्त्यावर आला नि त्याची पावले काळ्याशार डांबरी रस्त्यावर खाड खाड वाजू लागली. तशी आसपासच्या झाडावरच्या पाखरांची किलबिलही शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. गार्ड ड्युटी वाले हवालदार अटेंशनमध्ये उभे राहिले. मेन गेटचे दरवाजे करकरले." (पृ. १३) म्हणजे वाचकाला कळत ग्लाडला माणसंच नाही पशु पक्षी आणि निसर्ग सुद्धा घाबरतो आणि तो एका जागेवर स्तब्ध राहतो. यातून दरारा दहशत याचे आवर्तन तयार होते. राजमहेंद्री जेलमध्ये मध्ये सकाळपासून काय काय घडते याचे चलचित्र लेखक पुढीलप्रमाणे मांडतो.

ठण ठण ठण ठण
वरील आवाजातून सर्व कैद्यांच्या लक्षात येते की, सकाळचे सहा वाजले.
बंद्यांची काळजे कुरतडत आणखी एक दिवस उजाडला.
बराकींचे टाळे खुलू लागले,

वॉर्डर येऊन कांजी वाटू लागला.

कॅन्टीनची गाडी चहा घेऊन आली. पण चर्चा संपेना.

नळावर, हौदावर, नक्षलवाद्याचीच चर्चा सुरु झाली. सुतार खात्यात, लोहार खात्यात गप्पा सुरू झाल्या. (पृ. ६)

मिस्टर ग्लाड आणि वीरभूषण पटनाईक यांच्यातील संघर्ष पुढे रंगणार त्याची एक झलक ग्लाड आपला आक्रमकपणा इतर कायद्याप्रमाणे नक्षलवाद्यांना दाखवतो त्यावेळी घडलेला प्रसंग पुढीलप्रमाणे :

नि मेन गेट चे दरवाजे करकरले. दरवाज्यापाशी उभ्या असलेल्या पोलिस व्हॅनला हातातल्या दांड्याने फटकावीत साहेब मेन गेटमध्ये शिरला, ग्लाडसाहेबांचे पाउल मेन गेटमध्ये पडले, तत्क्षणी सारे जेलर नि सब इन्स्पेक्टर अटेन्शनमध्ये उभे राहिले.

"कुठेय तो हारामखोर ?"

सातव्यावर आठवा सूर लावीत ग्लाडसाहेब गरजला.

सीनियर जेलर अदबीने पुढे येत उतरला,

"इन चेकिंग रूम सर"

गर्रकन राईटला वळून तडातडा चेकिंग रूमच्या पायऱ्या चढता चढता ग्लाडसाहेब ओरडला, "व्हेअर इज दॅट बास्टर्ड नक्सलाईट ?"

"आय डोन्ट नो हू इज दट बास्टर्ड बट दॅट इज हिअर नक्सलाईट" डाव्या कोपऱ्यातून आवाज आला. ग्लाडसाहेबाची करडी नजर तिकडे वळली मात्र, नि निमिषमात्र कोरडीच पडली. क्षणभर ग्लाड साहेब पाहतच राहिला. वीरभूषणचा आवाज (पृ. ३) एकदम टेन्समध्ये वातावरण.

मिस्टर ग्लाडची लाडकी लेक भारतात येत असल्याचा टेलिग्राम आल्यानंतर ग्लाडच्या मनात प्रचंड आनंदाच्या उकळ्या फुटल्या. तसेच ग्लाड चार दिवसासाठी रजेवर जातो आहे हे रेखाटताना लेखक पुढील वातावरण तयार करतात.

"सर"

सीनियर च्या आवाजाने साहेब भानावर आला.

"सन, सकाळचा टेलिग्राम अजून पाहिला नाही तुम्ही!" सीनियरने आठवण करून दिली. साहेबांनी यंत्रवत टेलिग्राम फोडला आणि त्यावर नजर टाकली.

"आय ॲम कमिंग पप्पा... फॉरएव्हर युवर्स जेनी"

टेलिग्राम वाचून साहेब देहभान विसरला आणि ओरडला "जेनी ओ माय लिटिल, जीन, स्वीट जीन, जेनी"

साहेबांच्या बंदुकीसारखे कडाडण्याने झाडांवरील पाखरे एकदम चिवचिवाट करीत सैरभैर उडाली. ग्लाडसाहेब चार दिवसांच्या रजेवर जातोय हे पाहून तुरुंगातल्या वडापिंपळाच्या झाडांनाही एकदम मुक्त झाल्यासारखे वाटू लागले आणि ग्लाडसाहेबांची पावले मोठ्या खुषीत खाड खाड बंगल्याकडे चालू लागली! (पृ. ४८)

पहिल्यांदाच मुलगी जेनी घरी आल्याने सगळे वातावरण आनंदाने बदलून गेले. त्यातल्या त्यात ग्लाडही बदलला. याचे चित्रण लेखक पुढील प्रमाणे करतात.

मनामध्ये प्रचंड आनंद झाला आहे आणि आनंदाच्या भरात त्याच्या स्वभावात अतिशय गोडवा दिसतो. साहेब आज असा विक्षिप्त सारखा वाटतोय हे कुणाला समजेना. सीनियर जेलरच्या आठवणीप्रमाणे २८ वर्षांच्या सर्विसमध्ये ग्लाडसाहेब असा कधीच वागला नव्हता. तुरुंगाच्या बागेत आला नि हळुवारपणे त्यांने जाईच्या चार सहा कळ्या खुडल्या आणि एकदम चांदण्यारात्री ओढ्याकाठच्या खडकावर बसून चंद्राकडे पहात लट्ठ बेडकाने खर्ज लावावा तसा सूर लावला. कळ्यांना कुरवाळत ग्लाडसाहेब गाऊ लागला.

“हे प्रिये तुझ्याच साठी सैतानाला ही आव्हान दिले मी पण तुझ्याच मुळे का ईश्वराला विसरलो मी?”

साहेबांची पावले आज तालात होती... हातातली छडी नाचत होती... नजर प्रसन्न होती... साहेब भिशीला चालला होता.

वर्तुळाकार भिशीमध्ये साहेब शिरला तशी सर्वत्र सामसूम झाली. ग्लाडसाहेब धगधगणाऱ्या चुलाणापाशी आला नि भाकऱ्यांच्या थप्पीतील दोन करपून खाक झालेल्या भाकऱ्या उचलीत भिशिच्या जेलरवर खेकसला.

हु इज देअर? जल कमी करा. कैद्यांना भाकऱ्या काय करपलेल्या खायला घालणार? आणि मग ग्लाड ने रेशनची तपासणी केली. रवा, साखर शिल्लक पाहून कैद्यांना गोड रवा करून वाढण्याचा हुकूम केला. भिशीचा जेलर बावचळून पाहतच राहिला. अचानक सुतार खात्यात आलेला पाहून पण दोन पोरसवदा पोरांना उडालेल्या गोंधळाची कल्पना नव्हती. सागवानी ओंडक्या आड ती पुस्तक वाचत बसली होती. परीक्षेला बसलेल्या मुलांची चूक मान्य करून त्यांना अभ्यासासाठी सेपरेट जागा द्या. कोठडीत मोठे बल्ब लावा. परीक्षेला बसलेल्या मुलांना असे आश्वासनही दिले की “पास झाला तर पंधरा दिवसाची शिक्षा माफ करेल.” (पृ. ५०, ५१)

वीरभूषणला फाशी द्यायचे होते त्याच्या अगोदरच्या संध्याकाळचे चित्र फार बोलके आणि निसर्गाच्या माध्यमातून खूप काही सांगून जाते. याचे सूचन लेखक पुढीलप्रमाणे करतो. “उन्हे उतरणीला लागली होती. सावल्या लांबू लागल्या होत्या. बंदीची वेळ आली होती. एकदा बंदी होऊन सहाचे टोल पडले की ग्लाड साहेबाला निघायला हवे होते. फाशीची पूर्वतयारी तपासायला पाहिजे होती... सूर्य अस्ताला चालला होता. आकाश शेंद्री झाले होते. संपूर्ण तुरुंगावर मृत्यूचे सावट पसरु लागले होते. तुरुंगाच्या दगडी भिंती नुसत्या अंधाराचे रूप धारण करु लागल्या होत्या.”

पाखरांची किलबिल एकदम शांत झाली. रस्ता निर्मनुष्य झाला. काळ्याशार डांबरी रस्त्यावर खाड खाड वाजू लागली. गार्ड ड्युटी वाले हवालदार अटेंशनमध्ये उभे राहिले. (पृ. ७१, ७२)

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये वीरभूषण पटनाईक याला फाशी देण्याची वेळ आणि जेनीला प्रसव वेदना, यांच्यात पाऊस, ढगाळ आभाळ, गडगडाट यांच्या साहाय्याने निसर्ग त्रेधातिरपीट उडवून देतो. वीरभूषण पटनाईक जेनीची सुखरूप सुटका करतो. हा प्रसंग तर वाचकांच्या अंगावर काटा उभा करतो. श्वास रोखून धरेल अशा प्रकारची स्थिती लेखकाने मुद्दाम दोन प्रसंग एकत्र करून वातावरण पुढीलप्रमाणे उभे केले आहे.

फाशीच्या कोठडीत गळफास लोंबत होता.
बाहेर वादळाने आणि पावसाने अकांडतांडव घातले होते.
क्षणाक्षणाला घड्याळाचा काटा सहाच्या दिशेने सरकत होता.

पण नक्षलवादी मात्र आपल्या कोठडीत कोणतीही चिंता न करता शांतचित्ताने झोपी गेला होता आणि मायक्रोवस्कीच्या पोएम्स त्याच्या ह्रदयाचे ठोके मोजत त्याच्या छातीवर उपड्या पडल्या होत्या. (पृ. ७६)

पावसाचा जोर कमी झाला नव्हता.
आकाश फाटल्या सारखा धो धो पाऊस पडत होता.
रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले होते.
इतकेच काय पण मेन गेट मध्ये गेटभर पाणी साचले होते.
फाशी गेटच्या कोठडीत पाणी जाते की काय याची फासी गेटच्या जेलरला चिंता लागून राहिली होती.

नक्षलवादाला उठवले गेले, नक्षलवादी जागा झाला आणि त्यांनी सीनियर साहेबाला विचारले "निघायची वेळ झाली"
सीनियर जेलरने नुसती नकारार्थी मान हलवली.
"देन व्हाय डू यू डिस्टर्ब मी" नक्षलवाद्यांनी प्रश्न केला.
सिनियर जेलर गप्प राहिला मग पुटपुटला.
"ग्लाड साहेब तुमची वाट पाहत आहेत. जेनी अडलीय!"
सिनियर जेलरच्या बोलण्याने नक्षलवादी स्तंभित झाला.
कोणी डॉक्टर अॅव्हेलेबल नाही? त्याने विचारले

क्षणाचाही विचार न करता वीरभूषण उठला आणि जेलर बरोबर मिस्टर ग्लाडच्या बंगल्यावर गेला. येथील सर्व गंभीर परिस्थिती पाहिल्यानंतर तो थोडा वेळ थांबला आणि पटापट नर्सला वेगवेगळ्या गोष्टींची तयारी करायला सांगितली. तासा दीड तासातच आपल्या कौशल्याने दीड दिवसाची अडलेली जेनिला आणि तिच्या बाळाला त्यांनी सुखरूप सोडवले. त्याने सुखरूप सोडवले. तोपर्यंत सकाळचे सहा वाजत आले होते. (पृ. ८९)

कैद्यांसाठी कर्दनकाळ असलेला क्रूरतेचा मुकूटमणी ग्लाड याचा आपल्या मुलीमध्ये किती जीव होता हे पुढील निवेदनातून दिसून येते. प्रसंग जेनीच्या बाळंतपणाचा आहे.

जेनीचा जीव वाचवण्यासाठी कायदा हातात घेऊन ग्लाड नक्षलवाद्याला जेलच्या बाहेर आणतो. ग्लाडसाहेब आणि पाठोपाठ सीनियर जेलर मुसळधार पावसात बंगल्याकडे चालू लागले. ग्लाड बंगल्याच्या फाटकापाशी आला नि जेनीच्या जीवघेण्या किंकाळीने मटकन फाटकाला टेकला. त्याच्याच्याने पाऊल उचलेना. जेनीच्या जीवघेण्या किंकाळ्यांनी त्याच्या काळजाचे पाणी पाणी होऊन गेले. (पृ. ७९)

या कादंबरीच्या निवेदनाच्या संदर्भात सर्वात महत्त्वाचा आणि सर्वात सर्वोत्तम असा कादंबरीचा शेवट कलाटणी तंत्राने लेखकाने कसा केला पहा :

वीरभूषण पटनाईकने जेनीला सुखरुप सोडवले. तोपर्यंत जवळपास फाशीची वेळ झाली होती. काही मिनिटे बाकी होती. अगोदर ग्लाडची आणि वीरभूषणची भेट झाली. नक्षलवाद्यांचे बेड्या घातलेले हात हात घेत त्याचे ग्लाडने मुके घेतले आणि नाक्षालवाद्यास विचारले, "पोरा तू, माझ्या मुलीला जीवदान दिलंस. मी काय देऊ तुला, सांग? वाटेल ते माग... मी देईल" यावर वीरभूषण तुच्छतेने म्हणाला, "यू लिटिल पुअर बेगर! तू काय देऊ शकतोस मला? तू फक्त मला फाशी देऊ शकतोस!" साहेबाने वीरभूषण तोंडावर हात ठेवत गदागदा मान हलवली आणि साहेब म्हणाला, "अस नको बोलू पोरा, मी इतका भिकारी नाही मी देईल... काहीतरी देईल"

क्षणभर ग्लाड साहेब दिगमुढ झाला. मग काहीतरी विचार करून करारी नजरेने खणखणीत शब्दात तो म्हणाला, "यू ब्रेव यंग चँप! स्टील यू डोन्ट नो मी. तुला बरचं काही देऊन शकतो मी. अस काही देऊ शकतो की पुढे सात जन्म माझे उपकार तू विसरणार नाहीस."

ग्लाड ने आपल्या सिनियर जेलरला पुढे जाण्याची सूचना दिली. नि नाकासमोर पाहात नक्षलवादी चालू लागला. फाटकापाशी जीपमध्ये चढले. नक्षलवाद्यांनेही जीपमध्ये चढण्यासाठी पाऊल उचलले, तोच उंच आवाजातील हाक त्याला ऐकू आली....

"कॉम्रेड कॉम्रेड!"

वर व्हरांड्यात उभे राहून हात हलवत ग्लाडसाहेब त्याला हाका मारीत होता...

"कॉम्रेड कॉम्रेड!

सदोदित कैदी नंबर पुकारुन हिणवणाऱ्या ग्लाड साहेबांच्या तोंडून ती हाक ऐकून नक्षलवादी समाधानाने हसला नि हात हलवून साहेबांचा निरोप घेऊ लागला. काय होतेय हे समजायच्या आत फायर केले.

कडाड काड काड का ड

सर्विस रिव्हाल्वर मधून दोन गोळ्यानी वीरभूषणची छाती भेदली.

वीरभूषणने रक्ताने भरलेल्या जळजळीत नजरेने साहेबांकडे पाहिले... वीरभूषणला असे वाटले की, ग्लाडने विश्वासघाताने असे केले असावे. मात्र यावेळी ग्लाड साहेबांच्या नजरेत करुण याचना होती आणि तो पुन्हा पुन्हा ओरडत होता, कॉम्रेड, तुम्हारे सीनेपे गोली चलायी है मैंने, पीठपे नहीं! तुम्हारे सीनेपे गोली चलायी है मैने, पीठपे नहीं...

ग्लाडच्या उत्तराने वीरभूषण संतोषला आणि खाली पडता पडता हात उंचावून त्याने साहेबाला बाय केले आणि सर्व शक्ती एकवटून तो ओरडला, "थँक यू ... थँक यू मिस्टर ग्लाड!" (पृ. ९१)

काळ्याशार डांबरी रस्त्यावर पावले  खाडखाड वाजू लागली. रस्ता निर्मनुष्य झाला. पण आसपाच्या झाडावरल्या पाखरांची किलबिल शांत झाली नाही. ती किलबिल वाढत होती.

थँक्यू थँक यू मिस्टर ग्लाड. तोच राजमहेंद्री सेंट्रल जेल. जेलच्या भिंती वाकल्या आणि म्हणाल्या, "थँक्यू थँक यू मिस्टर ग्लाड" (पृ. ९२)

यापेक्षा उत्तम शेवट कादंबरीचा काय असू शकतो आपल्या डोळ्यासमोर हे सर्व प्रसंग लेखकाने वातावरणाच्या माध्यमातून उत्तम टिपले आहेत.

**सारांश :**

लेखक कादंबरीमध्ये वातावरण अथवा स्थलकाल अवकाश हा यासाठी टाकत असतो की, कादंबरीतील पात्र आणि या पात्रांच्या संदर्भातील घटना प्रसंग या पार्श्वभूमीवर होतात. ही पार्श्वभूमी वातावरण असते. स्थळ, काळ असतो, वेळ असते. यामुळे कथानकाला आणि कादंबरीला वास्तवता प्राप्त होते. कादंबरीतील पात्रे प्रत्यक्ष... जिवंत माणसासारखीच जगत आहेत त्यांनाही सुखदु:खे आहेत. याची वाचकांना जाणीव होते. त्यामुळे कादंबरीतील वातावरण हाही खूप महत्त्वाचा घटक आहे.

## २.८ "थँक यू मिस्टर ग्लाड" कादंबरीची भाषा आणि निवेदन

कादंबरी हा निवेदनप्रदान साहित्यप्रकार असतो. कादंबरीमध्ये सांगण्यासारखा भरपूर मजकूर असतो. कादंबरीमध्ये एका नंतर दुसरी आणि दुसऱ्या नंतर पुढील घटना, प्रसंग घडत असतात. घटना प्रसंग हे व्यक्तीशी जोडलेली असतात. कादंबरीतील व्यक्ती आणि त्यांच्या मनातील मनस्थितीचा अंदाज, स्थिती गतीचा अंदाज वाचकांना यावा म्हणून लेखक वर्णन या घटकाचा निवेदनाच्या पद्धतीने उपयोग करतो. निवेदनाचे प्रमुख दोन प्रकार असतात. एक प्रथमपुरुषी निवेदन आणि दुसरा तृतीय पुरुषी निवेदन. प्रथमपुरुषी निवेदन हा वाचकांवर कथा उलगडून दाखवत असतो. तर तृतीयपुरुषी निवेदन कर्त्याला सर्व कथा माहिती असते. तो हकीकतीच्या माध्यमातून घडलेली गोष्ट, कथा, कहानी, प्रसंग आपल्यासमोर हुबेहुब सांगत असतो. उदाहरणार्थ जर आपण महाभारत ही सिरीयल पाहिली असेल तर त्या सिरीयल मध्ये सुरुवातीलाच एक चक्र हळुवार फिरताना दिसते आणि 'मै काल बोल रहा हु' या पद्धतीने संपूर्ण महाभारताचे निवेदन करतो. कादंबरीमध्ये निवेदनाला खूप महत्त्वाचे स्थान असते.

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी तृतीयपुरुषी निवेदन या प्रकारात मोडते. वेगवेगळ्या पात्रांच्या मनातील मनस्थिती निवेदनाच्या माध्यमातून लेखक मांडतो आणि कादंबरीला आणखी पुढे घेऊन जातो. उदाहरणार्थ नक्षलवाद्याची बायको उमा हिच्याबद्दल निवेदन पुढीलप्रमाणे निवेदक करतो.

कधीकाळी तिचा चेहरा अतिशय गोड असावा, अशी पंचविशीची तरुणी नजरेत भरलेले दु:ख आणि चेहऱ्यावर आलेली उदासीनता घेऊन उभी होती.... (पृ. १६)

ग्लाडच्या अंगात प्रचंड मस्ती होती. ही मस्ती तो प्रत्येक कैद्यावर उतरवत असे. त्याची मिजास त्याच्या कृतीतून स्पष्ट दिसते. नक्षलवादी वीरभूषण पटनाईक हा मर्सी पेटिशनवर सही करत नाही आणि ग्लाडला त्याच्या बायकोचे दु:ख पाहवत नाही. म्हणून तो चवताळून नक्षलवाद्याच्या अंगावर चालून जातो. याचे चित्रण लेखक पुढीलप्रमाणे करतो. हे निवेदन किंवा वर्णन पुढीलप्रमाणे दिसते.

तो ताडताड पावले फेकीत येतो.
तो खाडखाड चालू लागतो.
नक्षलवाद्याला तुडवून काढतो.
व्हिस्कीचा पॉईट तोंडाला लावून गटागटा पितो.
तो तिरस्कार करतो.
तो कचकचित थोबाडीत भडकवतो.
वस्तू दन दन आपटतो.
तो गचांडी धरतो.
थयथय नाचतो.
कडाडतो
फर्मावतो इत्यादी.

ग्लाडची जेनी बाळंतपणासाठी घरी आल्याने बापाला जो आनंद झाला तो वर्णनातीत आहे. हे निवेदन ग्लाडच्या स्वभावाबाद्दल, बदललेल्या स्वभावाबद्दल खूप काही सांगून जातो.

गार्ड ड्युटीवरच्या जमादाराने कपाळावर आठ्या चढवल्या आणि सभोवार नजर फेकली. आश्चर्याच्या धक्क्याने त्याचे तोंड उघडले. डोळे फाडफाडून तो समोर पहातच राहिला.

ग्लाड साहेबांची पावले तालात घडत होती. हातातील छडी नाचत होती. साहेबांची नजर आज करडी नव्हे तर प्रसन्न होती आणि ग्लाडसाहेब स्वत:च शिळेवर गाणे गुणगुणत होता... "हे प्रिय तुझ्यासाठी सैतानालाही आव्हान दिले मी पण तुझ्याच मुळे का ईश्वराला विसरलो मी ?" (पृ. ४९)

कादंबरीच्या कथानकामधून व्यक्तिचित्राची मनस्थिती, भाव जे सूचित झालेले असतात हे निवेदन पद्धतीच्या माध्यमातून टिपता येतात.

कादंबरीचा निवेदक म्हणजेच लेखकाने वाचक आणि कादंबरीमधील महत्त्वाचा दुवा असतो. कादंबरीतील किंवा कथानकातील काही अडचण असेल तर ते समजून सांगण्यासाठी स्वत: काही गृहीत धरुन निवेदकाच्या भूमिकेतून तो कादंबरीमध्ये स्वत: लिहीत असतो. कधी कधी एखादा निवेदक कथानकाबद्दल प्रसंग, व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्याची प्रतिक्रिया, त्याचे चिंतन त्याला समजलेले जीवनाचे सत्य तो व्यक्त करीत असतो. याला भाष्य असे मानले जाते. ते भाष्य लेखक स्वत: करतो अथवा निवेदन करणाऱ्या पात्राच्या तोंडून तो करत असतो.

या कादंबरीतील निवेदक हा तृतीय पद्धतीचा वापर करत असल्यामुळे लेखकाला कथानकाच्या चौकटीबाहेर राहून भाष्य करता येते. थोडक्यात भाषण लेखकच करतो मात्र ते अप्रत्यक्षपणे. कधीकधी निवेदन पद्धतीबरोबर संवादाच्या माध्यमातूनही निवेदन करता येते. संवादाच्या माध्यमातून जर निवेदन केलं तर कादंबरीमध्ये नाट्य निर्माण होते. नाट्यामुळे चित्रदर्शी शैली होऊन वाचकास आकलन लवकर होते म्हणून नाटय, संवाद महत्त्वाचे असतात. आपण एक उदाहरण पाहू :

संवादाच्या माध्यमातून चित्रण

ग्लाड साहेब : चेकिंग उरकून दांडबेडी ठोका साल्याला; मंग चांगला हात दाखवतो.

नक्षलवादी : मिस्टर ग्लाड, चढत्या धारदार आवाजात नक्षलवादी ओरडला, मिस्टर ग्लाड बिहेव लाईक अ जेंटलमॅन और ए वॉरियर. हातच दाखवायचा असेल तर दंडा बेडी न ठोकता पटांगणात या, बघू या तुमच्या मनगटात जास्त जोरय की माझ्या छातीत जास्त दम आहे. (पृ. ४)

ज्या काळात ग्लाड जर्मनीमध्ये आपल्या पत्नी सोबत राहत होता, त्यावेळी जर्मन देशात हिटलरची तानाशाही चालू होती. ज्यू लोकांना नष्ट करणे त्याने ठरवले होते. हिटलरने आणि त्याच्या नाझीवादाने लोकांचा जो अमानुष छळ केला, त्याला सर्व जगात तोड नाही. मरियमच्या केसाला धरुन अत्यंत क्रूरपणे नेताना गेस्टापो दिसतात. माराच्या झिंजी उपटत, फरपटत नेताना ग्लाड त्यांचा प्रतिकार करू शकत नाही. तो फक्त हिटलरच्या गेस्टापोच्या पाया पडून गयावया करतो. त्याची स्वाभिमानी पत्नी कुणापुढेही शरणागती न पत्करता निक्षून सांगते की कुणापुढे शरण जायचे नाही. तो यावेळी हृदयशून्य झाल्याचे कादंबरीत कळते. म्हणून मारा ग्लाडला उद्देशून म्हणजे की, "पुरुषासारखा पुरुष असून षंढासारखा या अत्याचारांच्या पुढे लोळण का घेतो आहेस?" (पृ.१८, ६ वी आवृत्ती २०१७) स्वाभिमानी स्त्री असह्य होऊन ग्लाडच्या मुस्कटात देते. या भयंकर घटनेने ग्लाडला प्रचंड हादरा बसतो.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये जी जी पात्रे आली आहेत त्यांचे संवाद अतिशय तीक्ष्ण बनवून लेखकाने त्या पात्रांना अधिक उठाव दिला आहे. उदाहरण द्यायचं झालं तर नक्षलवादीची बायको उमा हिचा बाणेदारपणा त्याच्या माध्यमातून आपल्याला पाहता येईल. मिस्टर ग्लाडच्या समोर नक्षलवादी आणि त्याच्या बायकोचे जी संवाद चालू आहेत त्या संवादातून हा तीक्ष्णपणा आपल्या लक्षात येतो.

नक्षलवादी : माझ्यासाठी मर्सी पिटीशन करणार आहेस?

या प्रश्नावर बाणेदार, कणखर असलेली उमा उत्तर देते. त्या उत्तरामुळे ग्लाड चकित होतो.

उमा : कधीही नाही. जीव गेला तरी हरकत नाही. जुलम्यापुढे गुडघे का म्हणून टेकायचे? (पृ. १८)

### 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचे भाषा विशेष :

कोणत्याही साहित्य प्रकारात भाषा हा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. कादंबरी तसं पाहिलं तर विशाल पट असलेला एक गद्य वाङ्मयप्रकार आहे. यामध्ये सांगण्यासारखा मचकुर खूप काही असतो आणि तो कथनकाच्या माध्यमातून लेखक सांगत असतो. लेखकाने आपलीच

भाषा पात्रांना दिलेली असते आणि त्या भाषेद्वारे पात्रे कादंबरीमध्ये प्रकट होत असतात. ते काम ती पात्र निमूटपणे करताना दिसतात. त्यातून कादंबरी आकाराला येत असते. भाषेमुळे कादंबरीतील जी पात्रे, ज्या वातावरणामध्ये, ज्या अवस्थेमध्ये जगतात त्याला जिवंतपणाचे माध्यम म्हणून भाषा ही दिली जाते.

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही अनिल बर्वे यांची कादंबरी आहे. अत्यंत प्रभावी आणि चित्रमय शैली हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. लेखकाने आपल्या कादंबरीमधून आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर ही कादंबरी वेगळेपणा उठावदार करते. मुळातच अनिल बर्वे हे पत्रकार आहेत. पत्रकार सरकारला धारेवर धरुन काही प्रश्न मांडून त्यातून सरकारकडून अपेक्षित उत्तरे घेऊन लोकांना दाखवत असतो. दिशादर्शन करत असतो. ही कादंबरी नक्षलवादी चळवळींची विचारधारा राज्यसंस्थेचा किंवा ज्यांचे सरकार या देशात आहे त्यांनी निर्माण केलेली दमनकारी यंत्रणा या विरोधात लेखक काही दिवस जेलची हवा खाऊन आलेले आहे (१९७१). मुळातच लेखकाचा पिंड हा त्या वेळच्या काँग्रेस सरकारच्या विरोधात असल्यामुळे ही कादंबरी मुखपृष्ठावर खूप काही सुचवून जाते. पाशवी अत्याचाराचे प्रतीक असलेली वज्रमूठ तिही काळ्या रंगाने चित्रकारांनी रंगवलेली आहे. त्यातून लेखकाला शोषण व्यवस्था दाखवली आहे. लाल हातामधून कम्युनिस्ट या लोकांचे तत्त्वज्ञान सांगायचे आहे. त्याचबरोबर रोखून पाहणाऱ्या डोळ्यातून दमन यंत्रणेच्या विरोधात लढा उभा करण्याचे सूचन त्यातून होते. ही कादंबरी तसं पाहायला गेलं तर काव्यमय वाटते. ही कादंबरी पूर्वस्मृती निवेदनाने म्हणजेच फ्लॅशबॅक तंत्राने आपल्या नजरेसमोर उभी राहते.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीला काळाचा संदर्भ आहे. ही कादंबरी त्या काळातील राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी मांडते. भारतामध्ये १९७० च्या आसपास पश्चिम बंगालमधून नक्षलवादी चळवळीची सुरुवात होऊन नक्षलवादी चळवळ भारतामध्ये मूळ धरू लागली होती. या चळवळीत चांगली चांगली माणसं, प्रतिष्ठित माणसं, डॉक्टर, वकील किंवा उच्चशिक्षित माणसं या चळवळीकडे आकर्षित झालेली दिसून येते. कधी कधी तर या कादंबरीमध्ये चळवळीला प्रचंड विरोध करणारा ग्लाड हा सुद्धा कादंबरीच्या शेवटी या चळवळीचे समर्थन करताना दिसतो. नक्षलवादी चळवळीचे नेमके स्वरूप आणि भूमिका काय आहे हे अनिल बर्वे या कादंबरीतून उत्तमपणे चित्रित करताना दिसतात.

ही कादंबरी पूर्वस्मृती निवेदनाने चित्रित होते. कादंबरीमध्ये विविध स्मृतीचे आवर्तन होत असतात. ग्लाडची पत्नी मारा ही ग्लाडला प्रत्येक वेळी आठवणीच्या रूपाने कोणत्या प्रकारचे दु:ख देऊन त्याला त्याच्या मनात अपराधीपणाची जाणीव निर्माण करून देते. आपल्या पत्नीला आपल्या समोर हिटलरचा गेस्टापो घेऊन गेला. तिला हाल करून मारले. मात्र आपण या दरम्यानच्या काळात काही करू शकलो नाही. असा हरलेला दीगमूढ़ झालेला ग्लाड या कादंबरीमध्ये आपल्याला दिसतो. आपलं शैल्य, दु:ख, लपवण्यासाठी अक्राळ विक्राळरूप धारण करून तो कौर्याचा प्रतिनिधी होतो.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये वीरभूषण अत्यंत कणखर नक्षलवादी म्हणून आपल्याला दिसतो. वीरभूषण याच्यावर नक्षलवादाचे संस्कार झालेले आहेत. अत्यंत मूलगामी झालेले आहे. कोणत्याही परिस्थितीत हे संस्कार तो विसरायला तयार नाही. तो विचार अधिक गडद या कादंबरीमध्ये करताना दिसतो. त्याची समानतेची दृष्टी, मार्क्सवादी भूमिका, लेलिन,

मार्क्स आणि मावो यांच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार तो करतो. खरंतर यावरील तत्त्वज्ञानाने तो प्रचंड झपाटलेला आहे. त्याची अशी विचारधारा आहे की, एक क्रांतिकारक जर मेला अथवा मारला गेला तर त्याच्या रक्ताच्या थेंबातून हजारो क्रांतिकारक जन्म घेतात आणि बघता बघता क्रांतीची ही पायवाट असते, तिचा हमरस्ता होऊन या क्रांतीचे इप्सित साध्य करण्यासाठी खूप कमी वेळ लागेल. म्हणजेच जवळपास लढाई जिंकल्यातच जमा आहे.

या कादंबरीतील वीरभूषणचे मृत्यूपत्र हे तर 'तरल काव्य' आहे. मृत्यू पत्राच्या निवेदनातून नक्षलवादाचा विचार प्रकट होतो. नक्षलवादी वीरभूषण पटनाईक मिस्टर ग्लाडने कित्येकदा सांगूनही दयेचा अर्ज नाकारतो. दयेचा अर्ज न करण्यामागे त्याची भूमिका आहे. म्हणजे जर मी दयेचा अर्ज केला तर चळवळीचा अपमान होईल असे त्याला जाणवते. तो साम्यवादी विचारसरणीने पछाडलेला आहे.

लेखक 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये निवेदनाच्या साहाय्याने कथन, वर्णन, संवाद, भाषण, भाष्य याचा अवलंब करतात.

आपल्या निवेदनातून लेखक हळूवारता आणि काव्यात्मकता चित्रित करतात. उदाहरणार्थ जेनीच्या कविता किंवा जेनी वीरभूषणला सकाळच्या वेळेस फुले वगैरे आणून देणे. याचबरोबर या कादंबरीत संपूर्ण पसारा, कैद्यांचे विश्व, भटारखाना, आंघोळीची जागा, पाण्याची जागा, चहा, कॅन्टीन अशा कितीतरी गोष्टी लेखकाने चित्रपटाच्या माध्यमातून उत्तम साकारल्या आहेत.

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही तशी परिपूर्ण कादंबरी आहे. प्रवाही कादंबरी आहे. छोटीशी व आटोपशीर कादंबरी आहे. केवळ ९२ पानामध्ये कादंबरीकाराने कादंबरीची सर्व व्यवस्था पूर्ण केली आहे. म्हणून अल्पाक्षर रमणीयता आणि आशयघनता या कादंबरीतून सूचित होते. ही या कादंबरीची ठळक वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. ही कादंबरी लिहिताना लेखकाने कादंबरी या विषयाचा अनेक अंगाने विचार केला आहे. कादंबरीतील लहानात लहान घटना, प्रसंग काही उपकथानके या कादंबरीतून चित्रित होताना दिसतात. 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतून लेखकाची लयबद्ध गद्यलेखन शैलीही दिसून येते.

उदाहरणार्थ,

१) ग्लाड साहेबांचे बुट निर्मनुष्य काळाशार डांबरी रस्त्यावर खाड खाड वाजू लागली.

२) मेन गेट करकरत उघडले आणि ग्लाड साहेबाने जेलमध्ये पाऊल टाकले.

३) अतिशय मोहक भारी निळसर कागदावर सेंड शिंपडलेला होता. रेखीव आणि वळणदार अक्षरात बऱ्याच कविता (जेनीच्या कविता) लिहिलेल्या होत्या.

४) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये काही सुभाषित वजा वाक्य आपल्याला दिसतात.

उदाहरणार्थ,

"ज्या वेदना वांझ असतात त्यांचे दुःख करायचे नाही."

थँक यू मिस्टर ग्लाड या कादंबरीत आलेले अर्थवाही प्रतीके -

१) सुवास पसरवणारी आणि टेचात उभी राहणारी रातराणी.

२) खोलीत जळणारा दुबळा दिवा
३) गर्भारशा मुलीला पाहून ग्लाडला खुलू घातलेल्या मोगऱ्याची टपोरी कळी आठवते.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील गुन्हेगारी क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा या कादंबरीत होणारा वापर झालेला दिसतो. उदाहरणार्थ स्मगलर, सॅल्यूट, चिंधीचोर, दंडा बेडी, पंटर, कैदी नंबर आठशे बयालीस, थ्री नोट, थ्रीची गोळी, थाली, पॉट, बिस्तरा, वर्दी असे काही शब्द येतात. यांच्या बरोबरीने डेथ सेन्टेन्स, मर्सी पेटिशन इत्यादी.

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमध्ये ग्लाडची उन्मत, शिवराळ इंग्लिश मराठी मिश्रित बोली ही अँग्लो-इंडियनला शोभणारी आहे. गाणे येत नसलेला ग्लाड, त्याच्या भसड्या आवाजात गाणं गातो हे हास्यास्पद वाटतं. कणखरपणा, वक्तशीरपणा आणि उत्तम गणवेश यामुळे शिस्तीचा पालन करणारा असा ग्लाड आपल्या समोर उभा राहतो. याच्या विपरीत वेंधळा जमादार त्याचे विनोद सांगणे, त्याची उर्दू-हिंदी-मराठी मिश्रित शेर सांगणे. या गोष्टी कादंबरीमध्ये तणाव थोडासा कमी करण्यासाठी लेखकाची योजना दिसते. उमाचा निर्धार, कडक बाणेदारपणा तिच्या गोळीबंद शब्दातून व्यक्त होतो तर नक्षलवाद्याची साम्यवादी विचारसरणी, 'टू टेक अँड तू गिव्ह रिस्पेक्ट' अशा प्रकारची धारणा मराठी हिंदी आणि इंग्रजीमधील प्रभावशाली वक्तृत्व या कादंबरीचे संवाद आकर्षक करतात.

**आपली प्रगती तपासा :**

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीच्या शीर्षकाची सार्थकता स्पष्ट करा.

## २.९ सारांश

'थँक यू मिस्टर ग्लाड' ही एक परिपूर्ण कादंबरी आहे. प्रवाही कादंबरी आहे. छोटी तरी परिपूर्ण असणारी कादंबरी आहे. या कादंबरीला वेगळे वेगवान कथानक लाभलेले आहे. लेखकाने वापरलेली चित्रदर्शी शैली वाचकाला हातातून पुस्तक खाली ठेवू देत नाही. एखाद्या घटना प्रसंग पुढे एक प्रसंग आणि घटना या वेगाने येतात. त्यामुळे कथानक अतिशय बंदिस्त, आटोपशीर पाहायला मिळते.

गोळीबंद कादंबरी, आटोपशीर कथा, ठसठशीत व्यक्तिरेखा, आशय आणि विषयांची योग्य मांडणी तुरूगांशी निगडित भाषा आणि मिताक्षरी शैली या गोष्टी लेखकाच्या लघु कादंबरीची वैशिष्ट्ये दर्शवितात. त्यांच्या काळातील लेखकांपेक्षा वेगळेपणा जपल्याने 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी अधिक वेधक होताना दिसते.

## २.१० संदर्भग्रंथ सूची


१) 'थँक यू मिस्टर ग्लाड', बर्वे अनिल, ६ वी आवृत्ती २०१७
२) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ७ वा भाग ३ रा मसाप पुणे
३) एका वाङ्मय प्रकारचा अभ्यास : कादंबरी दूर शिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४) विशिष्ट लेखकाचा अभ्यास : अभ्यासपत्र क्रमांक ८, दूर शिक्षण मुंबई, विद्यापीठ, मुंबई
५) कादंबरी एक साहित्यप्रकार, देवरे अरुण, teach max, 2017
६) लोकसत्ता सप्टेंबर, दैनिक वृत्तपत्र २९, २०१९, पृ. १२
७) नेटवरील साहित्य
८) Twitter Linked in Whats App
९) sankalp.gurjar@gmail.com


## २.११ संभाव्य प्रश्न

### दीर्घोत्तरी प्रश्न

१) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचे कथानक सविस्तर आणि सोदाहरण स्पष्ट करा.
२) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.
३) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील पुरुष प्रतिमा आणि स्त्री प्रतिमा यांचा सोदाहरण स्पष्ट करा.
४) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील व्यक्तिरेखांचे ठळक विशेष सविस्तर आणि सोदाहरण स्पष्ट करा.
५) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचा नायक म्हणून वीरभूषण पटनाईक यांचे स्वभाव वैशिष्ट्य तुमच्या शब्दात मांडा.

### टीपासाठी प्रश्न :

१) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीच कथानक
२) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील जेलची वातावरण
३) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील राजमहेंद्री जेल
४) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील विविध प्रकारचे कैदी
५) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील भाषा

### एका वाक्यातील प्रश्न :

१) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील नक्षलवादाचा जाहीरनामा कोणता ?
२) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील वीरभूषणची कोणत्या विचारांवर श्रद्धा आहे ?
३) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील वीरभूषण दयेचा अर्ज का नाकारतो ?
४) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील वीरभूषणची कोणती धारणा आहे ?
५) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील ग्लाड नक्षलवाद्याला काय करायला प्रवृत्त करतो ?

❖❖❖❖

# ३

# 'दिवे गेलेले दिवस' - रंगनाथ पठारे

**घटक रचना :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ लेखक परिचय

३.३ विषय विवेचन

 ३.३.१ कथानक

 ३.३.२ प्रमुख घटना प्रसंग

 ३.३.३ व्यक्तिरेखा

 ३.३.४ आशयसूत्रे

 ३.३.५ आविष्कार विशेष : निवेदन व्यवस्था आणि भाषाशैली

३.४ सारांश

३.५ संदर्भग्रंथ सूची

३.६ संभाव्य प्रश्न


## ३.० उद्दिष्टे

- कादंबरी या साहित्यप्रकाराची ओळख होईल.
- कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या लेखनविश्वाचे स्वरूप ध्यानात येईल.
- 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील आशयसूत्रे आणि आविष्कार विशेष स्पष्ट होतील.
- 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचे सामाजिक - राजकीय संदर्भ उलगडता येतील.
- 'दिवे गेलेले दिवस' मधील कल्पित जगाचा अन्वयार्थ लावताना समकालीन जग विश्लेषणाच्या कक्षेत आणता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

रंगनाथ पाठारे यांची 'दिवे गेलेले दिवस' ही संहिता कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये मोडते. या संदर्भातून आपल्याला कादंबरी हा साहित्यप्रकार ध्यानात घेता येईल. या साहित्यप्रकाराच्या उदयाचा संबंध हा आधुनिक जगाच्या निर्मितीशी, जीवन व्यवहाराशी आणि

अर्थातच आधुनिकतेच्या मूलव्यवस्थेशी आहे. आधुनिकतेच्या स्वातंत्र्य, समता, विवेक, बुद्धिप्रामाण्यतेच्या अवकाशातच कादंबरी लिहिली जाऊ शकते. याचे कारण कादंबरी, "या साहित्यप्रकाराला श्रद्धेय मत मानवत नाही."[१] अर्थात चाकोरीबद्ध दृष्टिकोणांचे सार्वभौमत्व कादंबरी सातत्याने मोडण्याचा प्रयत्न करते. तिच्यामध्ये सातत्याने विरोधी मतांना-भूमिकांना आवाहन करण्याची क्षमता असते. त्यातून कादंबरीमध्ये एकाच एक नाही तर विविध आवाजाना अवकाश निर्माण होतो. कादंबरीमध्ये असणाऱ्या बहुस्वरीय क्षमतेमुळे ती भोवतालच्या जगातील कोणतीही गोष्ट, कोणत्याही स्वरूपाच्या आशयसूत्रांना, तंत्रांना आणि भाषेतील विविध भेदांना आपल्यात सामावून घेते. अन्य साहित्यप्रकाराशी तुलना करता कादंबरी ही मानवी जीवन व्यवहारातील गुंतागुंत व्यापक पटावर आणि तितक्याच सूक्ष्मपणे टिपण्यास अधिक पूरक आहे. ह्या सगळ्या गोष्टी कादंबरीला शक्य होतात, याचे कारण कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये अनेकविध स्वरूपाची उसनवारी असते आणि त्या उसनवारीला सामावून घेण्याची पुरेपूर क्षमता तिच्या खुल्या संकेतव्यवस्थेत आणि विस्तृत भाषिक अवकाशामध्ये असते. या जोरावर ती अनेक परस्परविरोधी गोष्टी स्वतःत सामावून घेत एक स्वतंत्र रूप सिद्ध करते. परिणामी कादंबरी आजपर्यंत कोणतेही आदर्श रूप पुढे न आणता तिच्या उदय काळापासून सातत्याने ती गतिशील राहिलेली आहे. या पार्श्वभूमीवर 'दिवे गेलेले दिवस' या रंगनाथ पठारे यांच्या पहिल्याच कादंबरीचा विस्ताराने विचार करता येईल. तत्पूर्वी रंगनाथ पठारे यांच्या एकूण लेखन विश्वाचा परिचय पुढीलप्रमाणे घेता येईल.

## ३.२ लेखक परिचय

रंगनाथ पठारे यांनी आपल्या लेखनाची सुरुवात कथालेखनाने केली. त्यांनी लिहिलेली 'रिस्ट्रेचमेंट' ही पहिली कथा १९७७ साली सत्यकथेमधून प्रकाशित झाली. तेव्हापासून आजच्या 'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९) या कादंबरीपर्यंत गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे पठारे सातत्यपूर्ण आणि विविध रचनाप्रकारातून लेखन करत आहेत. यामध्ये कथालेखन, कादंबरीलेखन, समीक्षालेखन, अनुवादलेखन आणि वैचारिकलेखन यांचा समावेश होईल. 'अनुभव विकणे आहे' (१९८३), 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' (१९९२), 'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो' (१९९६), 'गाभ्यातील प्रकाश' (१९९८), 'चित्रमय चतकोर' (२०००), 'तीव्र कोमल दुःखाचे प्रकरण' (२०००), 'शंखातील माणूस' (२००८) असे एकूण सात कथासंग्रह आज पठारे यांच्या नावावर आहेत. कथालेखनाने आपल्या लेखन प्रपंच सुरू केलेले पठारे नंतर कादंबरी लेखनामध्ये स्थिरावले. 'दिवे गेलेले दिवस' (१९८२), 'रथ' (१९८४), 'चक्रव्यूह' (१९८९), 'हारण' (१९९०), 'टोकदार सावलीचे वर्तमान' (१९९१), 'ताम्रपट' (१९९४), 'दुःखाचे श्वापद' (१९९५), 'नामुष्कीचे स्वगत' (१९९९), 'त्रिधा' (२००४), 'कुंठेचा लोलक' (२००६), 'भर चौकातील अरुण्य रुदन' (२००८), 'एका आरंभाचे प्रास्ताविक' (२०१३), 'चोषक फलोद्यान' (२०१४) आणि 'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९) अशा एकूण चौदा कादंबऱ्यांचे त्यांनी लेखन केले आहे. याच दरम्यान पठारे यांनी समीक्षा आणि वैचारिक स्वरूपाचे लेखन देखील केले आहे. यातून आतापर्यंत त्यांचे समीक्षात्मक आणि वैचारिक वळणाचे पाच महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. उदा. 'सत्त्वाची भाषा' (१९९७), 'आस्थेचे प्रश्न' (२०००), 'छत्तीसगड, नियोगींचे आंदोलन आणि सद्यस्थिती' (२००३), 'जागतिकीकरण आणि देशीवाद' (१९९१), 'प्रश्नांकित विशेष' (२००८). याच काळात पठारे यांनी इंग्रजी आणि हिंदी भाषेतून काही अनुवाद प्रकाशित केले आहेत. उदा. 'कवीचे अखेरचे दिवस आणि निरागस इरेंदिरा' (२०००) आणि 'कादंबरी आणि लोकशाही' (२०१०). अर्थात

मागील चाळीस-पंचेचाळीस वर्षात पठारे यांनी आपल्या सातत्यपूर्ण लेखनातून एकाचवेळी कथाकार, कादंबरीकार, टीकालेखक, अनुवादक अशा वेगवेगळ्या आणि तितक्याच दमदार ओळखी विकसित केल्या आहेत. या सगळ्यामध्ये त्यांचे कादंबरीकार असणे अधिक ठळक आहे. एक-दोन कादंबऱ्या लिहून थांबणाऱ्यांची गर्दी झालेल्या आजच्या काळात एकसलग गंभीरपणे कादंबरीलेखन करणारे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांचे विशेष महत्त्वही आहे.

## ३.३ विषय विवेचन

रंगनाथ पठारे आपल्या कादंबरीमध्ये रचलेल्या कल्पित जगाच्या माध्यमातून सभोवतालच्या सामाजिक-राजकीय बदलांचे समकालीन व्यक्ती आणि समाजावरील परिणामांचे, त्याविषयीच्या आकलनाचे स्वरूप शब्दबद्ध करतात. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून पुढे आणलेल्या चित्रणाने समकाळातील काही मूलभूत पेच-प्रश्नांचे, किंबहुना चक्रव्यूह सदृश्य वस्तुस्थितीचे दर्शन घडते. स्वतःच्या एकूण कादंबरीलेखनाने कादंबरी या साहित्यप्रकारातील काही शक्यता आणि क्षमतांचा त्यांनी घेतलेला शोध, विशेष अधोरेखित करता येईल. 'दिवे गेलेले दिवस' (१९८२) ही पठारे यांची पहिलीच कादंबरी. ही कादंबरी इ.स. १९७५ ते ७८ या काळातील राजकीय आणीबाणी (शिस्तपर्व) आणि आणीबाणी नंतरची प्रांतिक निवडणूक प्रक्रिया याच्याशी निगडित आहे. अर्थात या काळातील राजकीय घटना-प्रसंग आणि त्यातील विविध कंगोऱ्यांना कादंबरी उजागर करते. आणीबाणी जाहीर होऊन तिच्या अंमलबजावणीच्या काळात प्रशासनाच्या दाबातून व्यक्ती-समाजाच्या वर्तन व्यवहारावर लादलेल्या बंधनांनी जे पेचप्रसंग निर्माण झाले, त्यांना पठारे यांनी कादंबरीच्या केंद्रस्थानी आणले आहे. आणीबाणी आणि आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीचा अवकाश कादंबरीमधून रेखाटत त्यांनी या काळातील मतलबी राजकीय व्यवहार उघड केले आहेत. आणीबाणीच्या काळाला लेखक कादंबरीमध्ये 'शिस्तपर्व' असा शब्द वापरतात.

### ३.३.१ कथानक :

'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचे कथानक प्रामुख्याने दोन भागात विभागले गेले आहे. त्यातील पहिला भाग शिस्तपर्वाची अंमलबजावणी आणि कादंबरीतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखेसह अन्य मंडळींना शिस्तपर्वात भोगाव्या लागलेल्या विविध दाबांच्या तपशिलांनी व्यापलेला आहे. तर दुसऱ्या भागामध्ये शिस्तपर्व संपल्यानंतर प्रांतिक निवडणुका जाहीर होऊन त्याचा निकाल लागेपर्यंतचा घटनांचा तपशील आलेला आहे. या कादंबरीचे कथानक हे एका तालुक्याच्या ठिकाणी घडते. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या एका महाविद्यालयामध्ये कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. त्याच्या राहण्याचे ठिकाण देखील महाविद्यालयाच्या आवारात असते. प्राध्यापक स्वतः कादंबरीचा निवेदक आहे. प्राध्यापक निवेदक बहुतेक मोकळ्यावेळी सातत्याने काहीतरी चांगल्या ग्रंथांच्या वाचनात गुंतलेला असतो. निवेदक असाच एकेदिवशी गॅब्रियल गार्सिया मार्केझ या जगप्रसिद्ध स्पॅनिश कादंबरीकाराची कादंबरी वाचीत होता आणि त्याच दरम्यान दिवे जातात. नंतर दिवे येतात आणि त्याचवेळी "तुमच्यावर लक्ष आहे"[२] अशा आशयाचा निवेदकाला फोन येतो. प्राध्यापक निवेदकाला नंतरच्या काळात देखील अशा अर्थाचा फोन वेळी-अवेळी काही दिवस येत राहतो. मुळात हे दिवस शिस्तपर्वाचे आणि त्याच्या दहशतपूर्ण अंमलबजावणीचे असतात. याच काळात 'प्रगतीला निर्वेध दाही दिशा', 'जोरदार आगेकूच चालू आहे', 'बोलणे कमी : जास्त काम : दृढ निर्धार', 'पंतप्रधान चिरायू होवोत' अशा

घोषणांची वर्दळ वातावरणात असते. स्वाभाविकच या काळात बरेच लोक तुरुंगात अडकलेले होते. जे बाहेर होते त्यांच्यात बरेच निरुपद्रवी, भेकड आणि राज्यकर्त्या पक्षाचे सगे-सोयरे यांचा भरणा होता. अशा वातावरणात निवेदकाला 'तुमच्यावर लक्ष आहे' अशा संवादाचे फोन येऊ लागल्याने भयाने त्याची गाळण उडते. आणि तिथून पुढे काही दिवस प्राध्यापकाचे जगणे विविध चिंता आणि संशयाने व्यापून जाते. निवेदकाचे अस्वस्थ होणे वाढत जाते. आपल्यावर कोणाचे, काय म्हणून लक्ष असेल? आपल्यावर लक्ष असण्याचे कारणच काय मुळी? हा असा दम देणारा माणूस कोण? असे अनेक प्रश्न निवेदकाच्या मनात गर्दी करून राहतात. आपण कुठल्या, कसल्याच भानगडीत नसतो तर आपल्यावर लक्ष ठेवणारे कोण, आपल्यालाच फोन का करत असतील अशा तर्क वितर्कांनी निवेदक त्रस्त होतो. पुढे फोन करणाऱ्याचे नाव बुराटे असे कळल्यानंतर निवेदक महाविद्यालयातील बुराटे नामक विद्यार्थ्याला गोडीत घरी बोलावतो. अशा तऱ्हेच्या नानाविध प्रयत्नाद्वारे निवेदक फोन करणाऱ्या अनोळख्याचा शोध घेऊ लागतो. मात्र त्याचा कोणताही थांगपत्ता लागत नाही. आणि निवेदकाची अस्वस्थता अधिकच वाढत राहते. एकूणच फोन प्रकरणापूर्वी असलेल्या निवेदकाच्या शांत-लयबद्ध जीवनक्रमाला शिस्त पर्वातील फोन प्रकरणाने नख लागते. तिथून पुढे निवेदकाचा जीवनक्रम काही दिवसांपर्यंत तरी भय, संशय, दहशत, अस्वस्थतेने व्यापून राहतो.

पुढे याच दरम्यान एक अनोळखी देखणी आणि प्रशस्त स्त्री निवेदकाच्या घरी येते. निवेदकांप्रमाणेच शहराच्या आजूबाजूच्या अनेक लोकांना ती भ्रमिष्टासारखी भेटत असते. ती भेटेल त्यांना शिस्तपर्वाविरोधात व्यक्त होण्यासाठी विनवत असते. निवेदकाला देखील ती शिस्तपर्वाच्या विरोधात उघडपणे लिहिण्याचा आग्रह करते. शिस्तपर्वाचे वातावरण प्रतिभावंताला आव्हान आहे, त्यातूनच निर्मिती होते, पराकोटीचा भयाण अनुभव तेवढ्याच श्रेष्ठ निर्मितीला जन्म देतो, तर तुम्ही लिहा, तुम्ही शांत बसू नका, असे ती निवेदकाला ठासून सांगत असते. त्या अनोळख्या स्त्रीच्या अशा अर्थाने वागण्याचा निवेदकाला काहीच अर्थ लागत नाही. पुढे मात्र प्रा. देवकरकडून तिच्या कौटुंबिक वाताहतीची हकिकत निवेदकाला कळते. तीही शिस्तपर्वातील दहशतीची एका अर्थाने बळी असते. कादंबरी कथानकातील निवेदकाचे फोन प्रकरण एका बिंदूवर आणि दुसरा बिंदू त्या देखण्या बाईच्या दोन दिरांच्या आणि नवऱ्याचा सरकारी यंत्रणेकडून होणारा छळ, यातून कादंबरी कथानकातील शिस्तपर्वाच्या दाबाची, छळाची तीव्रता स्पष्ट होण्यास मदत होते. कादंबरीमध्ये असाच एक संदर्भ निवेदकाच्या महाविद्यालयातील स्टाफ रूममधील गप्पासंबंधी आहे. या काळात स्टाफरूममध्ये विविध प्राध्यापक शिस्तपर्वाबद्दल दबक्या आवाजात चर्चा करीत, पण तो आवाज तिसऱ्याला ऐकू येईल इतका तगडा नसे. दरम्यान राज्यकर्ता जातीचा वारसा सांगणारा माणूस तिथे आलाच तर ती दबक्या आवाजातील चर्चाही बंद व्हायची आणि नरम चेहेऱ्याने हवा-पाण्याच्या गप्पा सुरू व्हायच्या. एकूणच कथानकातील या भागाने सर्वसामान्यांमध्ये शिस्तपर्वातून निर्माण झालेल्या दहशतीचा एक अंदाज पुढे येतो.

एका टप्प्यावर निवेदक शिस्तपर्वाच्या विरोधामध्ये काम सुरू करतो. याला कारणीभूत ठरणारे खरेतर दोन पुशर असतात. त्यातील एक म्हणजे ज्याला ऋषी वगैरे म्हणता येईल असा एक समाजवादी म्हातारा आणि दुसरा निवेदकाचा मित्र दिवेकर हा होय. एकेदिवशी गावात एका व्याख्यानातून निवेदक समाजवादी म्हाताऱ्याला ऐकतो. आजूबाजूलाच असणाऱ्या शिस्तपर्वाच्या एजंटांचा कोणताही दाब म्हाताऱ्याच्या बोलण्यावर नव्हता. म्हातारा अत्यंत तर्कनिष्ठ पद्धतीने शिस्तपर्वाला प्रश्नांकित करत होता. त्या दिवशी म्हाताऱ्याच्या शिस्तपर्वाविषयीच्या निर्भीड बोलण्याने निवेदक प्रभावित होतो. एकूणच म्हाताऱ्याच्या त्यावेळच्या व्याख्यान सदृश्य मांडणीतून

निवेदकाला एका स्वरूपाची ऊर्जा मिळते. यातूनच आपल्या मर्यादेत राहून शिस्तपर्वाच्या विरोधात काहीतरी करण्याची निवेदकाची मानसिकता तयार होते. याला पुन्हा दिवेकरमुळे अधिक पाठबळ मिळते. सगळे मिळून मग जगातील सगळी सत्तांतरे ज्या मध्यमवर्गात झाली, त्यांच्यात स्वतःचे कार्यक्षेत्र शोधतात आणि मध्यमवर्गापुरते काम मर्यादित करतात. गुप्त संघटनेकडून येणारे बुलेटिन्स सायकोस्टाइल करायच्या आणि पोस्ट करायच्या कामाचे नियोजन पक्के होते. आपल्या परिसरातील मध्यमवर्गीयांचे पत्ते गोळा करणे, त्याच्या याद्या करण्याचे देखील काम सुरू करतात. मात्र पुढे देवकरच्या अटकेनंतर निवेदकाचे शिस्तपर्वाच्या विरोधातील काम काही दिवसांपुरेतच मर्यादित राहते.

शिस्तपर्वाच्या काळात एकानंतर एक गोष्टी घडू लागतात. त्यातीलच एक गोष्ट म्हणजे एका राष्ट्रीय युवा नेता लोकसंख्या नियंत्रणासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेची सक्तीची शिबिरे राबविण्याचे आदेश देतो. आदेशाचे इमानेइतबारे पालन करण्याच्या प्रयत्नात अनेक हितसंबंधी मंडळी असतात. नसबंदीची शिबिरे यशस्वी होण्यासाठी अथवा करण्यासाठी राज्यकर्त्या पक्षाचे अनेक स्थानिक कार्यकर्ते-नेते आपली सारी ताकद वापरतात. याद्वारे त्यांना त्या संबंधित युवा नेत्याशी जवळीक वाढवायची असते. शिवाय हे शिबिर मोठ्या प्रमाणात यशस्वी व्हावे यासाठी सरकारी-निमसरकारी यंत्रणांचा वापर तर देशाच्या लष्कारासारखा केला जातो. अशावेळी शिबिरासाठी मटणाच्या जेवणाचे अमिष दाखवून लोकांच्या अज्ञान आणि असाहाय्यतेचा फायदा घेत शस्त्रक्रियेची संख्या वाढविण्यासाठी गर्दी जमवून त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली जाते. त्यानंतरचा कहर म्हणजे शस्त्रक्रिया झाल्यावर त्यांना अक्षरक्षः वाऱ्यावर सोडले जाते. त्यांच्या निवाऱ्याची अथवा परत जाण्याची कोणतीही सोय केली जात नाही. शिबिरस्थळापासून परतताना काहींचा वाटेतच मृत्यू होतो. यातून पुन्हा सर्वसामान्यांमध्ये भयाचीच छाया पसरते. कादंबरी कथानकातील या भागाच्या चित्रणाने सत्तेतील मंडळींनी शिस्तपर्वाच्या काळात घेतलेल्या नसबंदी शिबिरासारख्या असंवेदनशील निर्णयांमागील दाहकता आणि सामान्यांच्या मुस्कटदाबीचे तीव्र स्वरूप स्पष्ट होते.

एका टप्प्यात सरकारकडून शिस्तपर्वाचा निर्णय मागे घेतला जातो. शिस्तपर्वानंतर वर्षभराच्या काळात भारताच्या राजकीय पटलावर विविध स्थित्यंतरे घडतात. सलग तीस वर्षे सत्तेत असणारा आणि शिस्तपर्वाच्या काळात अत्यंत असंवेदनशीलपणे वागणाऱ्या सत्ताधारी पक्षाचा त्यानंतरच्या लोकसभा निवडणुकीमध्ये दारुण पराभव होतो आणि जनता पक्षाचे सरकार सत्तेमध्ये येते. पुढे प्रांतिक पातळीवरील निवडणूक जाहीर होऊन महाराष्ट्रामध्ये रणधुमाळी सुरू होते. याच प्रांतिक निवडणुकीतील सखोल राजकीय घडामोडींच्या चित्रणाने कादंबरी कथानकाचा दुसरा भाग व्यापलेला आहे. यातील बहुतांश गोष्टी ह्या काहीवेळा तपशिलाने तर काहीवेळा सूचकपणे स्पष्ट होतात. अर्थात शिस्तपर्वानंतर राज्यकर्त्या काँग्रेस पक्षाला अत्यंत वाईट दिवस येतात. अशावेळी काँग्रेस पक्षात केंद्रातील पराभवाच्या जबाबदारीचे खापर दुसऱ्यांवर ढकलण्यात नेतेमंडळी मग्न असतात. यातून पक्षात बंडाळी माजून फूट वाढत जाते. या काळात सत्तेला सरावलेल्या आणि पक्षात वर्षानुवर्षे बैठक मारून असलेल्या अनेक सरंजामी मानसिकतेच्या नेत्यांकडून सत्ताकांक्षेपोटी पक्षांतर देखील होतात.

काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर तीन वेळा निवडून आलेल्या भास्करराव बेंडे यांना शिस्तपर्वानंतर काँग्रेसमधूनच तिकीट नाकारले जाते. परिणामी भास्कररावांना आपली ताकद पणाला लावून स्वतःच्याच विरोधी व्यक्तींनी भरलेल्या जनता पक्षाचे तिकीट मिळवावे लागते.

तिकिटासाठी भास्कररावांचा प्रवेश जनता पक्षात होतो. जनता पक्षाची निर्मिती राज्यकर्त्या पक्षाच्या विरोधातील अनेक छोट्यामोठ्या पक्षकार्यकर्त्यांनी एकत्र येऊन बनलेली असते. त्यामध्ये जनसंघाचे नागुअण्णा जोशी, समाजवादी नागरगोजे म्हातारबा अशा परस्परविरोधी विचारांची अनेक मंडळी केवळ सत्ताधारी पक्षाला विरोध करण्यासाठी एकत्र आलेली असतात. जनता पक्षाला देखील केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर राज्यात देखील निवडून येणारे उमेदवार अपेक्षित असतात. यातून स्थापनेपासूनच जनता पक्ष विचारशून्यतेच्या भूमीवर उभा असल्याचे लपत नाही. परिणामी भास्करराव बेंडे यांना जनता पक्षात अत्यंत विनासायास तिकिट मिळून जाते. ह्या निवडणूकीमध्ये भास्कररावांनी आपली ताकद वाढविण्यासाठी, टिकून राहण्यासाठी खूप वेगवेगळ्या गोष्टी केल्या. मात्र शिस्तपर्वाच्या पार्श्वभूमीवर निवडणुकांचे सर्व गणित बदललेले असतात. दुसरीकडे बाबासाहेब राजुळे यांना काँग्रेसकडून तिकीट मिळालेले असते. सहकार क्षेत्रात वकूब ठेवून असलेल्या राजुळे यांना देखील ही निवडणूक तशी सोपी नव्हती. त्यांना सहकार क्षेत्रातील निवडणूक परिचित होती. मात्र विधानसभेच्या निवडणुकीचा अवकाश हा अर्थातच मोठा होता. याचवेळी काँग्रेस आणि जनता पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात असणारा तिसरा उमेदवार केशवराव गव्हाणे यांना पैशाच्या बळावर विकत घेण्याचा प्रयत्नही झाला. गव्हाणे डाव्या पार्टीचे तरुण उमेदवार असतात. गव्हाणे यांना आपल्या विजयाची खात्री नव्हती, ते केवळ पक्षाच्या बांधणीपोटी रिंगणात उभे असतात. चौथा उमेदवार काँग्रेस (इ.) चा असून तो अत्यंत सामान्य म्हणजे किंचितही जनाधार नसलेला असतो.

ह्या निवडणुकीमध्ये भास्कररावांचा पराभव होतो आणि याला निवेदक काम करत असलेल्या महाविद्यालयातील प्राचार्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली असते. मुळात भास्करराव आणि प्राचार्य यांच्यामध्ये तणावपूर्ण वातावरण असते. प्राचार्यांचा प्रामाणिकपणा आणि काटेकोर कारभारामुळे भास्कररावांना महाविद्यालयामध्ये कोणतीही भ्रष्ट हालचाल करण्याची संधी मिळत नसते. परिणामी भास्कररावांच्या मनात प्राचार्यांची उचलबांगडी करण्याचा विचार सुरू असतो आणि त्याच मानसिकतेतून ते सातत्याने त्यांच्याशी व्यवहार करत असतात. पुढे मागे याचा महाविद्यालयाला धोकाच आहे हे ओळखून निवडणुकीमध्ये प्राचार्यांनी आपली सारी ताकद भास्कररावांच्या विरोधात लावलेली असते. प्राचार्यांच्या यशस्वी मध्यस्थीने जनता दलातील महत्त्वपूर्ण नेते रतनलाल शेठ आपल्या लोकांची मते रातोरात भास्कररावांच्या विरोधी म्हणजे बाबासाहेबांच्या बाजुने वळवितात. जनता पक्षातील काही नेते-कार्यकर्ते पक्षाचा उमेदवार म्हणून भास्कररावांच्या बाजूने उभे असले तरी प्रत्यक्ष मतदान बाबासाहेबांना करतात. परिणामी भास्कररावांचा पराभव होऊन बाबासाहेब राजुळे निवडून येतात. कादंबरी कथानकातील शिस्तपर्वानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीचे चित्रण पाहिल्यावर लक्षात येते की, निवडणुकीमध्ये प्रत्येकजण अत्यंत सत्तातूर आकांक्षेने भारलेले असतात. नेते अथवा पक्षाकडून विकास संकल्पनेपेक्षा सत्तास्थान तीव्रतेने सांभाळले जातात.

कादंबरीच्या दुसऱ्या भागातील कथानकामध्ये निवडणूक प्रकिया, तालुक्यातील विधानसभेचे उमेदवार, प्रचार आणि निकाल ह्या सोबत येणाऱ्या आणखी दोन महत्त्वपूर्ण गोष्टी पैकी एक म्हणजे देवगिरीकरांचे सातत्याने बदलत जाणारे संकल्प आणि चमकदार मनसुबे होय. आणि दुसरी म्हणजे निवेदकाचा मित्र देवकरने निवडणुकीच्या निकालांचे पूर्व अंदाज व्यक्त करणाऱ्या संस्थेबाबत सुरू केलेले काम हे होय. देवकरच्या या नव्या प्रकल्पामध्ये रस घेत निवेदक देखील त्याच्यासोबत काम करण्याची तयारी दाखवतो. पुढे संस्थेला अपेक्षित असलेल्या कामाची पूर्तता निवेदकाकडून होत नाही. मात्र त्याच कामाच्या पार्श्वभूमीवर निवेदक

समाजातल्या सर्व स्तरांमध्ये फिरून सूक्ष्म निरिक्षण करून एका स्वतंत्र स्वरूपाच्या गद्यलेखनातून निवडणूक वृत्तांताचा मजकूर पुढे आणतो. या कामाच्या मुळाशी निवेदकाने आधी ठरवून घेतलेल्या काही गोष्टी असतात. प्रकल्पासाठी करत असलेल्या नोंदी-निरीक्षणातून निवेदकाला डायरीसदृश्य लेखनाच्या चौकटी पलीकडे जात सर्जक लेखन करायचे असते. यातून मग निवेदक त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात त्याला जाणवलेल्या-समजलेल्या गोष्टींना डायरीच्या स्वरूपात तर कधी तृतीय पुरुषी निवेदनातून मांडत राहतो. या लेखनात जोंधळेची कविता, मिस मेहता सोबतचे प्रेम प्रकरण, निवडणुकीचे राजकारण, प्रत्यक्ष निवडणुकीत उतरलेले उमेदवार, त्यांनी आखलेले आडाखे, केलेले नियोजन, तयार केलेल्या व्यूहरचना याचे विस्ताराने तपशील येत जातात आणि मग कादंबरीच्या कथानकाला कादंबरी अंतर्गत कादंबरीच्या कथानकाचे रूप प्राप्त होते.

### ३.३.२ प्रमुख घटना - प्रसंग :

प्रस्तुत कादंबरीमध्ये काही महत्त्वपूर्ण घटना–प्रसंग कथानकाच्या केंद्रस्थानी आहेत. संपूर्ण कादंबरी खरेतर काही मोजक्या घटना प्रसंगांधारे पुढे जाते. पैकी त्यातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे केंद्रात दीर्घकाळ सत्तेवर असलेल्या पक्षांनी केलेली शिस्तपर्वाची घोषणा होय. शिस्तपर्वाच्या घोषणेनंतर पुढे सरकारी यंत्रणेने केलेल्या त्याच्या काटेकोर अंमलबजावणीचे परिणाम तालुका-गाव पातळीवर थेटपणे उमटू लागले. याच काळातील एक घटना म्हणजे कादंबरीतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखेला 'तुमच्यावर लक्ष आहे' अशा आशयाचा येत असलेला फोन होय. कादंबरीच्या प्रारंभीच प्राध्यापक निवेदक एक जगप्रसिद्ध कादंबरी वाचत असतो आणि हमखास त्याचवेळी दिवे जाण्याची घटना घडते. काही वेळाने दिवे आल्यानंतर निवेदक पुन्हा वाचण्यात गर्क होत असतानाच महाविद्यालयातील गुरखा त्याच्यासाठी फोन आल्याचे सांगतो. फोन प्रसंगांने निवेदक प्राध्यापकाच्या मनावरील भीतीची सावली वाढत जाते. कादंबरीतील घटनांच्या वर्णनाचे स्वरूप हे एका प्राध्यापक पात्रावर केंद्रित झाल्यासारखे वाटते. मात्र वस्तुस्थिती तशी राहत नाही. फोन प्रकरणाने अत्यंत व्यक्तिगत पातळीवर सुरू होणारी कादंबरी ही हळूहळू शिस्तपर्वाचे देशातील व्यापक रूप वाचकांसमोर उभे करत जाते. अर्थात त्या अनामिक फोन प्रकरणाबाबतच्या विविध तर्कवितर्कांच्या गर्दीमध्ये कादंबरीमधील आणखी काही घटना-प्रसंगांचा प्रवास सुरू राहतो. ह्यामधून एकीकडे केंद्रवर्ती व्यक्तिरेखेच्या कुटुंबातील तक्रारी येऊ लागतात तर दुसरीकडे त्याला त्याच्या जोंधळे, देवकर या मित्रांपासून धीरही मिळतो.

याच काळात कादंबरीमधील आणखी एक घटना म्हणजे निवेदकाच्या घरी एका देखण्या बाईचे येणे होय. संबंधित बाई निवेदकाच्या घरी येऊन निवेदकाला शिस्तपर्वाच्या विरोधात लिहिते होण्यास सुचवित असते. पुढे कादंबरी याही घटनेभोवती काही काळ फिरत राहते. निवेदकाला शिस्तपर्वाच्या विरोधातील कृतिकार्यक्रमामध्ये थेट उतरविण्यास कारणीभूत ठरलेली घटना म्हणजे समाजवादी म्हाताऱ्याचे गावामध्ये झालेले भाषण होय. ऋषीसमान असणाऱ्या त्या धैर्यवान म्हाताऱ्यामुळेच निवेदक दिवेकरसोबत शिस्तपर्व विरोधी कृतिचळवळीमध्ये उतरतो. कादंबरीतील याच घटनेतून मिस मेहताब आणि जोंधळे यांच्या प्रेमसंबंधांची घटना विकसित झालेली आहे. शिस्तपर्वाच्या अंमलबजावणीचे दाब व्यक्त करणारी एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून सत्ताधारी पक्षातील युवा नेत्याच्या डोक्यातून विकसित झालेल्या नियोजनशून्य कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिराकडे पाहता येईल. कादंबरीमध्ये नसबंदी शस्त्रक्रियेच्या शिबिरांच्या घटना-प्रसंगांनी देशात सामान्य व्यक्तीला सत्तालोलूप राज्यकर्त्यांकडून आणि बेजबाबदार प्रशासनाकडून किती निम्न

पातळीवर गृहीत धरले जाते, याचे चित्र स्पष्ट झाले आहे. कादंबरीच्या पहिल्या विभागातील घटना-प्रसंग शिस्तपर्वातील दाबाचे सामान्य स्तरातील व्यक्तींपासून सामाजिक-राजकीय पातळीवर उमटणाऱ्या त्याच्या ठशांच्या वर्णनांनी व्यापले आहेत. शिवाय दुसरीकडे कारखान्यावर मुख्यमंत्र्यांच्या सभेसाठी ठेवलेली जेवणावळ, आमदार भास्करराव बेंडे यांच्या स्विमिंग पुलाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आणि तेथील त्यांचे विचारशून्य भाषण याही प्रसंगाचा विचार करता येईल. साहित्यसंस्कृती व्यवहाराशी निगडित येणारे विविध कार्यक्रम आणि त्यातील मिसेस देवगिरीकरांच्या बोलचालीतून निर्माण होणारे प्रसंग देखील अधोरेखित करता येतील असे आहेत. कादंबरीतील दुसऱ्या भागाच्या प्रारंभीच शिस्तपर्वाचा निर्णय मागे घेतला जाण्याची घटना घडते. त्यानंतर केंद्रातील लोकसभेच्या निवडणुका होऊन दीर्घकाळ सत्तेवर असणाऱ्या काँग्रेसचा पराभव होतो आणि केंद्रात जनता पक्षाची सत्ता स्थापन होते. पुढे प्रांतिक पातळीवरील निवडणुकांची घोषणा होऊन शिस्तपर्वाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात रणधुमाळी माजते. त्यातून दुसऱ्या भागामध्ये निवडणुकीची घोषणा, निवडणूक प्रचार, प्रत्यक्ष निवडणुका आणि त्याच्या निकालापर्यंतच्या घटना विचारशून्य राजकारणाला अधोरेखित करतात.

कादंबरीतील प्रस्तुत घटना-प्रसंगाचा विचार केल्यास आपल्या असे लक्षात येईल की, कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या तालुकास्तरीय महाविद्यालय, महाविद्यालयामध्ये कार्यरत प्राचार्य आणि प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयाचे पदाधिकारी, गाव, शिस्तपर्वाचे दिवस, शिस्तपर्व मागे घेतल्यानंतरचा काळ, सार्वत्रिक निवडणुका, निवडणुकीतील उमेदवार, निवडणुकीतील व्यूहरचना, निवडणूक निकाल आदी काही महत्त्वपूर्ण गोष्टींच्या पार्श्वभूमीवर कादंबरीमध्ये शैक्षणिक, कौटुंबिक, सामाजिक आणि अधिकांशाने राजकीय स्वरूपाच्या घटना-प्रसंगांनी कादंबरी घडते आहे. याच घटना-प्रसंगाचे कधी सूचकपणे तर कधी उपरोधिकपणे, कधी स्थूल तर कधी तपशीलवार - सूक्ष्म अशी वर्णने कादंबरीमध्ये आलेली आहेत. अशा वर्णन स्वरूपातून चित्रित झालेल्या घटना-प्रसंगाने साधलेल्या गोष्टींमधील एक महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे त्यातून एका अर्थाने निमशहरी - तालुकास्तरीय परिसर नक्की झालेला आहे की, जो महाराष्ट्रातील अशा कोणत्याही एखाद्या तालुकास्तराला छेदून जाणारा ठरेल.

प्रामुख्याने पठारे यांच्या कादंबरीमध्ये तालुका अथवा जिल्हा स्तरावरील एखादे मोठे गाव हमखास येते. अर्थात त्यांच्या बहुतेक कादंबरीतील बहुतांश घटना-प्रसंग हे अशाच ठिकाणी घडताना दाखविले जातात. गाव शहराच्या मधोमध नव्याने तयार होत असलेला मध्यमवर्गीय माणूस पठारे यांच्या कादंबरीमध्ये केंद्रस्थानी असतो. किंबहुना यामध्ये तयार होणारा मध्यमवर्गीय समूह हा त्यांच्या कादंबरीच्या एकूण लेखन अवकाशातील महत्त्वपूर्ण घटक असतो. असा हा निमशहरी माणूस अथवा समूहानी व्यापलेला अवकाश पठारे आपल्या कादंबऱ्यातून चित्रित करतात. त्यांच्या 'दिवे गेलेले दिवस' याही कादंबरीमध्ये अशा स्वरूपाचा समूह आणि त्या समूहातील माणूस मध्यवर्ती येतो. परिणामी तालुका स्तरावरील मध्यमवर्गीय ते राजकर्त्यां लोकांपर्यंत, समाजातील सत्तेची धागेदोरे असणाऱ्या एका विशिष्ट बहुसंख्यांकाच्या जातीपासून सर्वसामान्य स्तरावर वावरणाऱ्या मंडळींपर्यंतचे जीवनसंदर्भ पठारे कादंबरीमध्ये जिवंत करतात. कादंबरीतील प्रांतिक निवडणुकीच्या संदर्भातील विविध घटना-प्रसंगांच्या चित्रणाने एकूणच राजकीय व्यवहारांमध्ये घुसू लागलेल्या अनेक अनर्थ प्रथा, मूल्यहीन राजकारणाचे स्वरूप स्पष्ट करतात. या कादंबरीतील घटना-प्रसंगांचा विचार करता त्यातील काही एक भाग हा कौटुंबिक स्वरूपाने, काही भाग सामाजिक तर काही भाग राजकीय व्यवहारांनी व्यापलेला आहे. संपूर्ण कादंबरी अशा घटना-प्रसंगांतून मधल्या काळात आपल्या देशावर लादल्या गेलेल्या आणीबाणीच्या

संदर्भाने वाढली असली तरी केवळ अशा काही विशिष्ट राजकीय कृतीपुरतेच तिचे स्वरूप मर्यादित राहत नाही. तर कादंबरीतील कित्येक घटना-प्रसंगांच्या सूचकपणे येण्याने एखाद्या राजकीय घटनेचे पडसाद समाजातील छोट्या-मोठ्या स्तरातील सामान्य - सामान्य गोष्टींवर किती खोलवर परिणाम करणारे ठरतात, याचे प्रत्यंतर देण्यात प्रस्तुत कादंबरी यशस्वी झाली आहे.

### ३.३.३ व्यक्तिरेखा :

रंगनाथ पठारे यांच्या जवळपास सर्वच कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा ह्या परिणामकारक आणि ठाशीवपणे पुढे येत कादंबरीच्या आशयसूत्रांची व्याप्ती वाढवतात. या संदर्भातून त्यांच्या 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील व्यक्तिरेखांचे स्वरूप उलगडताना पुढील स्वरूपाची मांडणी करता येईल.

### ३.३.३.१ निवेदक :

'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीमधील केंद्रवर्ती व्यक्तिरेखा एका निमशहरी भागातील महाविद्यालयामध्ये प्राध्यापक आहे. शिवाय तो कादंबरीचा कथातंर्गत निवेदकही आहे. निवेदक विवाहित असून महाविद्यालयाच्या परिसरातच राहतो. त्याचा मूळ स्वभाव हा शिकण्या-शिकविण्याशी बांधील राहून एका चौकटीत जगणारा असा आहे. अर्थात तो कुणाच्या अध्यात मध्यात नसतो. त्याने आखून घेतलेल्या एका चौकटी पलीकडे तो कुठल्या, कसल्याच भानगडीत नसतो. सकाळी अभ्यास, लेक्चर्सची तयारी, ठरल्या वेळी ठरल्याप्रमाणे बोलणे, ठरले ते काम करणे, घरी जाऊन मुलाबाळांमध्ये वेळ घालवणे, काहीवेळ बायकोची करमणूक करणे अशा सरळसूत जगण्याचा निवेदकाला वर्षानुवर्षे सराव झालेला होता. अर्थात महाविद्यालय, कुटुंब, आवडीचे वाचन, सहकारी प्राध्यापक मित्र अशा मर्यादित बाजूनी निवेदकाचे जगणे व्यापलेले असते. कामाच्या ठिकाणी आणि गावामध्ये निवेदकाच्या तशा काही ओळखी असतात, मैत्रीही थोडीफार असते; मात्र जिथे न सांगता-सवरता जाऊन बसावे अशी देवकर आणि जोंधळे सोडून त्याच्यासाठी दुसरे घरे नव्हते. अर्थात इतक्या वर्षामध्ये त्याच्या विशिष्ट कामाच्या चौकटी पलीकडे त्याचा विशेष असा कोणाशी संबंध येत नाही अथवा त्याने तसे संबंध विकसित केलेले नसतात.

निवेदक स्वतःला एक सामान्य लिथार्जिक (सुस्तावलेला) माणूस समजतो. निवेदकाला प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या तरी माध्यमाद्वारे पुश लागत असतो. तशा स्वरूपाचे पुश जितके परिणामकारक तितके त्याच्या कामाचे स्वरूप बदलत असते. स्वभावातील ही मर्यादा निवेदक अत्यंत प्राजंळपणे कबूल करत असतो. "माझ्यासारख्या लिथार्जिक माणसाला कुणीतरी 'पुशर' लागतो. स्वभावतःच काही नवे, वेगळे करण्याचा मला कंटाळा आहे. माणसांच्या दुखण्यांनी वेदनांनी आणि आनंदानेही मी सहसा प्रभावित होत नाही."[३] ('दिवे गलेले दिवस', ५८) तो स्वतःला जात्याच रसहीन आणि आळशी समजतो. मात्र समर्थपणे मनाला काही छेदून गेले तर त्याचा परिणाम त्याच्या स्वभाव बदलावर होतो. उदा. समाजवादी वृद्ध नेत्याचे भाषण, देवकरसारख्या मित्राचा निरनिराळ्या कामातील उत्साह हा निवेदकासाठी एखाद्या पुशप्रमाणे वाटत असे. त्यामुळेच एका गुप्त संघटनेबाबत निवेदक शिस्तपर्वाच्या विरोधात काही दिवस काम करतो. शिस्तपर्वानंतर देखील निवेदक देवकरच्या मदतीने इलेक्शन फोरकास्टींगचे काम सुरू करतो. निवडणुकीच्या निमित्ताने पुढे येणाऱ्या विविध गोष्टींच्या निरीक्षणातून देवकरने नेमून दिलेले काम मागे टाकून निवेदक कादंबरीसदृश्य लेखन करतो. याप्रसंगी देखील निवेदक

प्रचलित संकेतांना झुगारत प्रयोगशील मांडणी करण्याचा प्रयत्न करतो. अंतिमतः निवेदकाकडून कादंबरी लिहून होते. याचा अर्थ आपल्या कक्षेत येणाऱ्या गोष्टींना सातत्याने सर्जनशील प्रतिक्रिया देण्याचा निवेदकाचा स्वभाव यातून प्रतीत होतो.

घरी भेटायला येणाऱ्या देखण्या बाईच्या शोकात्म कहाणीने हेलकावणारे निवेदकाचे मन, प्राचार्याच्या कार्यकर्तृत्वाचे वाटणारे आदर, समाजवादी म्हाताऱ्याच्या भाषणाने आणि त्याच्या धैर्याने स्वतःच्याच भित्रेपणाची वाटणारी लाज, एका युवा नेत्याच्या प्रयत्नातून लादलेल्या नसबंदी शस्त्रक्रियेतून लोकांना मिळणाऱ्या पशुवत वागणुकीने येणाऱ्या हतबलतेच्या प्रसंगी स्वतःच्या आत्मकेंद्री स्वभावाचा आणि स्वःच्या पलीकडे जाऊन आपण जगाचा विचार करत नाही, याविषयी वाटणारी खंत इ. गोष्टी निवेदकाच्या व्यक्तिमत्त्वातील चिकित्सक - आत्मटीकायुक्त स्वभावाकडे लक्ष वेधतात. याचा अर्थ निवेदक स्वतःवर विशेष खूश नाही. तो आपल्या स्वभावातील मर्यादांना ओळखण्याचा प्रयत्न करतो. स्वतःचा वर्तनव्यवहार तपासत त्यात बदल करण्यास इच्छूक असतो. तर दुसरीकडे प्रांजळ कबुली देण्याचा त्याचा स्वभाव हा त्याच्या जगण्यातील निर्मळपणा सिद्ध करतो. निवेदक हा स्वतःच्या एका चौकोनी विश्वामध्ये जगत जरी असला तरी तो आपल्या आजूबाजूचे जग संवेदनशीलतेने न्याहाळत असतो. यातून त्याची काही निरीक्षणे तयार होत असतात. त्या गोष्टी तो बहुतेकवेळा स्वतःशीच शेअर करत असतो. तर पुढे जाऊन स्वतःच्या नोंदी-निरक्षणांना सर्जक रूप देत कादंबरीसदृश्य मांडणी पुढे आणतो.

कादंबरीमध्ये चित्रित निवेदक नाकासमोर चालणारा प्राध्यापक असला तरी तो स्वाभिमानशून्य नाही. निवेदक अत्यंत तटस्थ-प्रामाणिक राहातानाच काही अटीतटीच्या प्रसंगावेळी विशिष्ट अशा निर्णायक भूमिकांपर्यंत येत असतो. उदा. निवेदक जेवणाच्या बदल्यात मुख्यमंत्र्यांच्या सभेला जाण्याचे टाळतो. प्राचार्यांच्या विरोधात जेव्हा भास्करराव बेंडे निवेदकाचा वापर एखाद्या प्याद्याप्रमाणे करण्याच्या प्रयत्नात असतात, तेव्हा निवेदक त्याला भीक घालत नाही. शिवाय देवगिरीकर बाईंच्या कोणत्याही भूलथापांना निवेदक बळी पडत नाही. असे असले तरी कादंबरीमध्ये काही ठिकाणी निवेदक स्वतःला आळशी, रसहीन असेही म्हणतो. कादंबरीतील पहिल्या-दुसऱ्या विभागातील अनेक प्रसंगामध्ये निवेदक वैतागताना दिसतो. अनेक प्रसंगांमध्ये निवेदकाची तडजोडवादी भूमिका स्पष्ट होते. स्वतःहून कोणत्या सामाजिक-राजकीय गोष्टींमध्ये गुंतवून न घेण्याची त्याची कातडीबचावू धारणा पुढे येते. एका विशिष्ट चाकोरीमध्ये जगणारा निवेदक शिस्तपर्वाच्या काळामध्ये कुणाकुणाच्या तरी पुश मुळे स्वतःला काही सर्जक क्रियांमध्ये गुंतवून घेत असतो. कादंबरीतील काही प्रसंगातून निवेदक आधुनिकतेच्या विचाराचा पाईक असल्याप्रमाणे प्रतिक्रिया देत असतो. किंबहुना त्याच्या जीवनदृष्टीवर आधुनिकतेच्या विचारदृष्टीचा प्रभाव जाणवतो. एकीकडे निवेदकाची व्यक्तिरेखा ही विचारी, पोक्त, संवेदनशील अशी वाटत असतानाच कादंबरीतील काही प्रसंगातून त्याच्या स्वभावातील भित्रेपणा, निरुपद्रवी असणे अशाही स्वरूपाचे कंगोरे पुढे येतात. याचा अर्थ एकाचवेळी मध्यमवर्गातील एखाद्या मनुष्यामध्ये साधारणपणे कोणकोणत्या गुणावगुणांची सरमिसळ असते, त्या अर्थाचे प्रत्यंतर ‘दिवे गेलेले दिवस’ या कादंबरीतील निवेदक या प्रधान व्यक्तिरेखेमधून घडते.

### ३.३.३.२ निवेदकाचे सहकारी प्राध्यापक :

**अ) प्रा. जोंधळे :** प्रा. जोंधळे आणि प्रा. देवकर हे निवेदकाच्या महाविद्यालयातील सहकारी आणि जवळचे मित्र असतात. कादंबरीतील विविध घटना-प्रसंगांमधून निवेदक, जोंधळे आणि देवकर यांच्यातील मैत्रीचे स्वरूप उलगडते. जोंधळे हा अविवाहित हौशी कवी आहे. जोंधळे

निवेदकाच्या घरी दिवसा-रात्री कधीही येतो आणि काही कविता बिविता असेल ती वाचून दाखवितो. चारसहा म्हणता म्हणता निवेदकाला त्याच्या पंधरावीस कविता ऐकाव्या लागत. शिवाय प्रत्येक कवितेची जात, चाल आणि शब्दकळा यावरचे भाष्य पुन्हा वेगळे असे. बहुतेकवेळा जोंधळेच्या कविता निवेदकाला ऐकताना कंटाळा येत असे. मात्र मैत्रीखातर जोंधळे दुखवायला नको म्हणून निवेदक इमानेइतबारे त्याच्या कविता ऐकत राही. निवेदकाप्रमाणेच जोंधळे देवकरलाही आपल्या कविता वाचून दाखवी. अर्थात निवेदक आणि देवकर हे जोंधळे यांच्या कविता वाचनाचे हक्काचे प्रेक्षक होते.

शिस्तपर्वाच्या काळात एके दिवशी जोंधळे, देवकर आणि निवेदक असे तिघेही समाजवादी म्हाताऱ्याचे भाषण ऐकण्यास जातात आणि त्याच प्रभावातून तिघेही शिस्तपर्वाविरोधी कामात सक्रीय होतात. याच काळात तिथे जोंधळेचा मिस मेहताबशी परिचय होतो. त्यानंतर मेहताबच्या बोलण्याने प्रभावित होऊन, तिच्या प्रेमाखातर जोंधळे प्रेमकविता करू लागतो. शिवाय तिच्या सांगण्याने सरकारविरोधी कारवायांमध्ये देखील गुंतत जातो. शिस्तपर्वानंतर मिस मेहताब आपल्या मूळ ठिकाणी परत जाते, तेव्हा जोंधळे निवेदकाकडे तिच्या परत येण्याविषयीची चर्चा करतो. मिस मेहताबचा पत्ता देवकरकडून मिळवून जोंधळे तिच्याशी इंग्रजीतून पत्रव्यवहार करतो. मिस मेहताबच्याच सांगण्याने जोंधळे प्रांतिक मेहताबचा पत्ता देवकरकडून मिळवून तिच्याशी इंग्रजीतून पत्र व्यवहार करतो. मिस मेहताबच्याच सांगण्याने जोंधळे प्रांतिक निवडणुकांमध्ये जनता पक्षाच्या प्रचारात झोकून देतो. पुढे जोंधळे निवडणुका संपल्यानंतर मिस मेहताबबरोबर विवाह करतो. एकूण कादंबरीमध्ये प्रा. जोंधळे याची व्यक्तिरेखा ही तरुण उत्साही, भावनाप्रधान कवी म्हणून चित्रित होते. निवेदक आणि देवकर यांच्या व्यक्तिमत्त्वाशी तुलना करता अनेक प्रसंगातून जोंधळेची व्यक्तिरेखा ही भूमिकाशून्य आणि थोडी अघळपघळ अशी चित्रित झालेली अनुभवास येते.

**आ) प्रा. देवकर :** निवेदक, जोंधळे कार्यरत असलेल्या महाविद्यालयामध्येच प्रा. देवकर राज्यशास्त्राचा प्राध्यापक असतो. (संपूर्ण कादंबरीमध्ये देवकर हाच केवळ कोणत्या विषयाचा प्राध्यापक आहे हे ओघात स्पष्ट होते. तसे कादंबरीच्या शेवटापर्यंत निवेदक आणि जोंधळे नक्की कोणत्या विषयाचे प्राध्यापक आहेत याबाबत स्पष्टता मिळत नाही.) कादंबरीमध्ये चित्रित झालेले देवकराचे व्यक्तिचित्र हे समाजाप्रती, त्यातही निम्नस्तरातील लोकांप्रती संवेदनशील असल्याचे दाखविले गेले आहे. समाजातील विभिन्न प्रश्नांबाबत त्याची जाणही सूक्ष्म आहे. कादंबरीतील त्याच्या इतर सहकाऱ्यांशी तुलना करता त्याला राजकीय भान असल्याचेही स्पष्ट होते. परिणामी अनेक गोष्टींबाबत त्याची म्हणून काही निरीक्षणं आहेत, तर काहीबाबत स्पष्ट मतं आणि काही प्रश्नही आहेत. शिस्तपर्वाने देवकर अस्वस्थ असतो. शिस्तपर्व म्हणजे त्याला हुकूमशाही, अधिकारशाही, सरंजामशाही ह्या सगळ्याचे मिश्रण वाटते. या एका भयानक महत्त्वाकांक्षी गोष्टी सोबत झुंज देण्यासाठी अत्यंत काटेकोरपणे आपण सज्ज असायला हवे, ही त्याची धारणा असते. देवकरमुळेच निवेदकाला भेटायला येणाऱ्या देखण्या बाईची शोकात्म कहाणी समजते. समाजवादी म्हाताऱ्यामुळे शिस्तपर्वाविरोधी काम करण्यास तयार झालेल्या निवेदक आणि जोंधळे यांना एकत्र घेऊन देवकर शिस्तपर्वाविरोधी कार्यात सक्रिय होतो. मात्र एका टप्प्यावर ही गोष्ट उघड होते आणि भूमिगत झालेल्या देवकरला एक दिवस अटक देखील होते.

शिस्तपर्वानंतर पुढे देवकरची सुटका होते. याच काळात तुरुंगामध्ये देवकरला डाव्या चळवळीतील अनेक थोरामोठ्यांचा सहवास लाभतो. परिणामी देवकर डाव्या विचारसरणीकडे

झुकल्याचे दाखविण्यात आले आहे. कादंबरीतील दुसऱ्या भागामध्ये देवकर शिस्तपर्वानंतरच्या निवडणूक काळामध्ये दिल्लीच्या एका संशोधन संस्थेबाबत इलेक्शन फोरकास्टिंगसाठी काम सुरू करतो. त्यामध्ये शास्त्रीय पद्धतीने निवडणूकपूर्व सर्वेक्षणाच्या आधारे निकालाचे अंदाज वर्तविले जातात. याच कामामध्ये देवकर निवेदकाच्या मागणीमुळे निवेदकालाही सामावून घेतो. एकूणच देवकर ही व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीमध्ये अत्यंत गांभीर्याने वावरते. देवकर यांना मुख्यत्वे सामान्य जनांच्या प्रश्नांविषयी सूक्ष्म जाण आहे आणि त्याच्या सोडवणुकीसाठी तो आपल्यापरीने प्रयत्न करीत असतो. एकुणात देवकराचे कादंबरीमध्ये उभे राहणारे व्यक्तिचित्र हे अभ्यासू, संवेदनशील, भूमिकांबाबत स्पष्टता असलेले, धाडसी अशा स्वभाव विशेषांनी आकारले आहे. याच कारणाने निवेदकाला प्राचार्याप्रमाणेच देवकराबद्दल देखील आदर वाटत राहतो.

**३.३.३.३ भास्करराव बेंडे :**

कादंबरीमध्ये चित्रित भास्करराव बेंडे हे एक प्रस्थापित राजकारणी होते. कुस्तीमध्ये त्यांना विशेष प्रावीण्य होते. त्यातून त्यांनी एका अर्थाचा लौकिकही मिळविलेला होता. त्याच्या आधारे त्यांनी राजकारणामध्ये प्रवेश केला. पुढे ते लागोपाठ तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. निवेदक स्वतः ज्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक आहेत त्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाशी भास्करराव संबंधित आहेत. त्यांचा एकूण राजकीय व्यवहार हा तसाही भ्रष्ट होता. त्यांना महाविद्यालयाचा वापर देखील राजकारणासाठी करून घ्यायचा असतो. मात्र अशा मनसुब्यांना त्यांच्याच महाविद्यालयामध्ये असणाऱ्या कर्तव्यकठोर प्राचार्यांमुळे अडकाठी येत असते. परिणामी प्राचार्यांना सातत्याने त्रास देण्यात भास्करराव विशेष रस घेत असत.

शिस्तपर्वाच्या काळात सत्ताधारी पक्ष आणि त्या पक्षातील खासदार-आमदारांची जनमानसातील प्रतिमा कमालीची खालावली होती. याचे पडसाद सत्ताधारी पक्षातील नेत्यांवर उमटत होते. अर्थात याची झळ भास्कररावांना देखील बसते. काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर तीन वेळा निवडून आलेल्या भास्करराव बेंडे यांना शिस्तपर्वानंतर काँग्रेस मधूनच तिकीट नाकारले जाते. परिणामी भास्कररावांना आपली ताकद पणाला लावून स्वतःच्याच विरोधी व्यक्तींनी भरलेल्या जनता पक्षाचे तिकीट मिळवावे लागते. तिकिटासाठी भास्कररावांचा जनता पक्षात प्रवेश होतो. जनता पक्षाची निर्मिती राज्यकर्त्या पक्षाच्या विरोधातील अनेक छोट्यामोठ्या पक्षकार्यकर्त्यांनी एकत्र येऊन बनलेली असते. त्यामध्ये जनसंघाचे नागुअण्णा जोशी, समाजवादी नागरगोजे म्हातारबा अशा परस्परविरोधी विचारांची मंडळी एकत्र आलेली असतात. जनता पक्षाला देखील केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर राज्यात निवडून येणारे उमेदवार अपेक्षित असतात. परिणामी भास्करराव बेंडेंना जनता पक्षात अत्यंत विनासायास तिकीट मिळून जाते. या निवडणुकीमध्ये भास्कररावांनी आपली ताकद वाढविण्यासाठी, टिकून राहण्यासाठी खूप वेगवेगळ्या गोष्टी केल्या. भास्कररावांनी मागील तीन निवडणुकांमध्ये यश मिळविले असले तरी शिस्तपर्वाच्या पार्श्वभूमीवर होत असणारी निवडणूक त्यांच्यात धाकधूक निर्माण करणारी ठरली. त्यातही भास्करराव आपल्या जुन्या विश्वासू मंडळींच्या मदतीने निवडणुकीची व्यूहरचना आखत अत्यंत हुशारीने लढत असतात. बेरजेचे राजकारण करणे, प्रतिस्पर्ध्यांची बदनामी करणे, स्वतःला न मिळणारी मतं प्रतिस्पर्धी उमेदवाराला मिळणार नाहीत याची व्यवस्था करणे, निम्नस्तरातील आणि अल्पसंख्यांक जातीतील मतं स्वतःला मिळतील म्हणून प्रयत्न करणे अशा विविध गोष्टींच्या पद्धतशीर जुळणीमध्ये भास्करराव व्यस्त असतात. एकूणच त्यांचा निवडणुकींचा अनुभव मोठा असतो. मात्र शिस्तपर्वानंतर आखीव सगळ्याच चौकटी बदलून गेल्या होत्या. किंबहुना भास्कररावांना निवडणुकीबाबत सगळीकडूनच प्रतिकूल परिस्थिती

निर्माण होत असते. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भास्कररावांना त्यांच्या मराठा असण्याचा फायदा निवडणुकींमध्ये व्हायचा. पण ह्यावेळी मराठा मंडळीनी भास्कररावांकडे पाठ फिरवली. याचा अर्थ प्रत्येक वेळी निवडून येताना ते हुकुमी एक्काप्रमाणे जातीचे कार्ड वापरत, मात्र ह्यावेळी तसेही झाले नाही. निवडणुकांच्या शेवटी शेवटी भास्कररावांच्या विरोधामध्ये जनमानस झपाट्याने बदलत गेले आणि त्यांचा निवडणुकीमध्ये पराभव झाला. एकूणच कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या भास्कररावांची व्यक्तिरेखा ही एकीकडे राजकारणाची, धोरणी आणि दुसरीकडे सरंजामी विचाराची अशी दाखविण्यात आलेली आहे.

### ३.३.३.४ भास्करराव बेंडे यांचे (निवडणुकीतील) अन्य प्रतिस्पर्धी :

शिस्तपर्वानंतर केंद्रातील सत्ताधारी पक्षाची सत्ता गेली आणि जनता पक्षाची सत्ता आली. पुढे प्रांतिक निवडणुकांचे राजकारण देखील त्याचप्रमाणे तापत गेले. वरती नमूद केल्याप्रमाणे भास्करराव हे जनता पक्षाच्या तिकिटावर लढतात. त्यांच्या विरोधामध्ये काँग्रेसचे तिकीट बाबासाहेब राजुळे यांना मिळते. तर कम्युनिस्ट पक्षाकडून तिसरा प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणून केशवराव गव्हाणे यांचे नाव पुढे येते. काँग्रेस (इ.) चा देखील एक उमेदवार रिंगणात असतो. मात्र त्याची विशेष ताकद नसते. त्यामुळे भास्कररावांचे निवडणुकीतील मुख्य प्रतिस्पर्धी म्हणून राजुळे आणि गव्हाणे या दोन व्यक्तिरेखांबाबत विचार करता येईल.

#### अ) बाबासाहेब राजुळे :

बाबासाहेब राजुळे यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळते. मुळात राजुळे यांचे सहकार चळवळीतील काम उल्लेखनीय असते. ते स्वतः एका साखर कारखान्याचे चेअरमन असतात. त्यांच्या उमेदवारीमागे त्यांचे सहकार क्षेत्रातील काम महत्त्वाचे मानले जात असते. काँग्रेसचा उमेदवार, त्यातही सहकार क्षेत्रातील चर्चित नाव यामुळे राजुळे तसेही प्रकाश झोतात असतात. भास्कररावांशी तुलना करता राजुळे सर्वसामान्य लोकांमध्ये जाण्यात आणि त्यांच्याशी संपर्क वाढविण्यात अधिक सरस असतात. राजुळे लोकांच्या धर्मभावनेची नस ओळखत, आपण त्यांच्यापैकीच एक असल्याचे चित्र उभे करत जनमानसावर बऱ्यापैकी पकड निर्माण करतात. तळागाळातील मतं खूप सहजगत्या आपल्याला मिळतील याचीही पद्धतशीर व्यवस्था करण्यात राजुळे यशस्वी झाले होते. राजुळे यांच्याकडे पुरेशी प्रचारयंत्रणा होती. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भास्कररावांच्या विरोधात गेलेली मंडळी राजुळे यांना येऊन मिळालेली होती. त्यामुळे राजुळे यांना एकूणच ही निवडणूक सुलभ आणि सहज जाते. प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून राजुळे यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातो, मात्र त्यातून काही निष्पन्न होत नाही. एकूणच निवडणुकीतील त्यांच्या विजयासाठी विविध लोक एकत्र आलेले असतात. त्यामध्ये प्राचार्यांची भूमिका खूप महत्त्वपूर्ण ठरलेली दिसून येते.

#### आ) केशवराव गव्हाणे :

केशवराव गव्हाणे हे तरुण कामगार नेता म्हणून भास्करराव आणि राजुळे यांच्या विरोधात कम्युनिस्ट पक्षाकडून निवडणूक रिंगणात उभे असतात. आपण विरोधात असलेल्या दोन शक्तीशाली उमेदवारांसमोर तग धरू शकणार नाही हे गव्हाणे जाणून असतात. मात्र ह्या निमित्ताने पक्षाला जनाधार मिळवून देणे, सर्वसामान्यांमध्ये पक्ष रुजविणे अशा ठळक कारणांमुळे ते कम्युनिस्ट पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवत असतात. पराभव होणार हे त्यांना स्वतःलाही माहीत असताना देखील केवळ ह्या निमित्ताने पक्ष तळागाळात रुजविणे हा त्यांचा उद्देश असतो. त्यांच्या समोरील भास्करराव बेंडे आणि बाबासाहेब राजुळे हे दोन्ही नेते तगडे असतात. त्यांच्यासारखे आर्थिक असो अथवा सांस्कृतिक अशा दोन्ही स्वरूपाचे भांडवल गव्हाणे

यांच्याकडे नसते. त्यांच्या सायकलने प्रवास करत प्रचार करण्यामध्येच सर्वकाही ध्यानात येते. मुख्यत्वे गव्हाणे यांनी समाजातील निम्नस्तरावरील लोकांना आपल्या प्रचाराच्या केंद्रस्थानी ठेवले होते. कामगार, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर याशिवाय निम्नस्तरावरील गोरगरिबांमध्ये आपला प्रचार करण्याला गव्हाणे यांनी प्राध्यान्य दिले. एकूणच हरण्या-जिंकण्याच्या पलीकडे जात पक्ष आणि पक्षविचारांवर निष्ठा ठेवून लढणाऱ्या उमेदवाराचे प्रतिबिंब गव्हाणे यांच्या पात्रचित्रणामध्ये अधोरेखित झाले आहे.

**३.३.३.५ प्राचार्य :**

या कादंबरीतील प्राचार्य ही व्यक्तिरेखा निवेदक कार्यरत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रारंभापासून कार्यरत असतात. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये केवळ महाविद्यालयाच्या हिताला केंद्रस्थानी ठेवले. एखाद्या कुटुंबप्रमुखाप्रमाणे त्यांच्याकडून महाविद्यालयाचा कारभार पाहिला जात असे. महाविद्यालयाच्या कामाशी निगडित कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला प्राचार्य पाठीशी घालत नसत. याच कारणामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य आणि महाविद्यालयाचे ट्रस्टी आमदार भास्करराव बेंडे यांच्यामध्ये वितुष्ट येते. काटेकोरपणे काम करण्यातून प्राचार्यांनी जसे आपले नावलौकिक वाढविले होते. त्याप्रमाणे त्यांनी भास्कररावांसारख्या अनेक छोट्या-मोठ्या लोकांचे शत्रूत्व देखील स्वीकारले होते. महाविद्यालयामध्ये खूप मोठा काळ त्यांनी हितसंबंधांच्या पलीकडे जात काम केल्यामुळे साधारणपणे काही डाव्या प्रवृत्तीची मंडळी त्यांना पेटिबूर्ज्वा म्हणून ओळखत. कडवे डावे भांडवलदारांचा बगलबच्चा म्हणत. उजवी मंडळी त्याला समाजवादी म्हणून हेटाळत. मध्यमवर्गी त्यांच्यावर सर्वोदयी अशी शिवी-शिक्का मारत. काही लोक त्यांना हुकूमशाही प्रवृत्तीचा म्हणून ओळखत. मात्र खुद्द प्राचार्य असल्या कोणाच्या म्हणण्या-न म्हणण्याचा गांभीर्याने विचार करत नसत.

महाविद्यालयातील कामाच्या पद्धतीबाबत प्राचार्यांची एक भूमिका स्वच्छ होती. महाविद्यालयाकडे ते स्वतः कुटुंब म्हणून पाहत. त्यामुळे इतक्या मोठ्या कुटुंबाची जबाबदारी घेताना येणाऱ्या अडचणी समजावून घेत जर कोणी महाविद्यालयाला मदत करत असतील तर प्राचार्य त्यांचे स्वागत करत. अर्थात होणारी कोणत्याही स्वरूपाची मदत अटींशिवाय असायला हवी असे त्यांना वाटे, किंवा त्याच स्वरूपाची मदत ते स्वीकारत. प्राचार्यांनी स्वतःला, स्वतःच्या कर्तृत्वाला महाविद्यालयाच्या कामकाजामध्ये गाडून घेतले आणि त्याला रसदार फळे देणाऱ्या झाडासारखे उभारले, वाढवले. अर्थात अथक प्रयत्न, अत्यंत प्रामाणिकपणा आणि कमालीच्या काटकसरीने महाविद्यालयाचा व्याप वाढविण्यात प्राचार्यांना यश आले होते. दरम्यान कोणत्याही राजकीय व्यक्ती आणि राजकारणाच्या दबावाखाली त्यांनी कधीच काम केले नाही.

प्राचार्यांचा काटेकोर स्वभाव आणि शिस्तीमुळे संस्थेशी संबंधित असलेल्या भास्करराव बेंडे यांना ही गोष्ट न खुपणारी होती. प्राचार्यांच्या अशा स्वभावामुळे भास्कररावांच्या महाविद्यालयाचा राजकारणात वापर करण्याबाबतच्या अनेक योजना धुळीस मिळत होत्या. परिणामी भास्करराव शक्य तिथे आणि जमेल तेव्हा प्राचार्यांना अपमानास्पद वागणूक देत असत, त्यांच्या विरोधात अन्य सहकारी प्राध्यापकांना भडकवत असत. वेगवेगळ्या तऱ्हेने प्राचार्यांना सातत्याने अडचणीत आणणे या प्रयत्नामध्ये भास्करराव बेंडे रस घेत असत. बेंडे यांनी कादंबरीतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखेला देखील प्राचार्यांच्या विरोधात प्यादा म्हणून वापरण्याचा प्रयत्न केला, मात्र निवेदकांनी वेळीच त्यातून अंग काढून घेतले. भास्करराव प्राचार्यांना सतावत असत.

भविष्यामध्ये पुन्हा भास्करराव आमदार म्हणून जर निवडून आले तर त्यांचे महाविद्यालयावर अनियंत्रित सत्ता निर्माण होईल हे प्राचार्य जाणून होते. महाविद्यालयाच्या विकासासाठी राजकारणात पडायचे नाही असे त्यांनी ठरविलेले, मात्र त्या धोरणेला ते पुन्हा महाविद्यालयासाठीच बदलून घेतात आणि निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यावर आपली सारी ताकद बाबासाहेब राजुळे यांच्या बाजूने लावतात. काही ठिकाणी तर प्राचार्य घरोघरी जाऊन बाबासाहेबांचा प्रचार करतात. काही प्रतिष्ठित लोकांकडून आश्वासन घेतात. आपल्या ऐकण्यातील अनेकांच्या मताचे परिवर्तन करून त्यांना भास्कररावांपासून अलग करून त्यांची ताकद बाबासाहेबांकडे वळवतात. प्राचार्यांच्या ह्या सर्व गोष्टी निर्णायक ठरून भास्कररावांचा जवळपास नऊशे एक्कावन्न मतांनी पराभव होतो. एकूणच कादंबरीमध्ये प्राचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण हे कार्यतत्पर आणि कर्तव्यनिष्ठ अशा स्वरूपाने चित्रित झाले आहे. त्यांच्यामध्ये कामाप्रती निष्ठा आणि सामाजिक भान ह्या दोन्ही गोष्टी एकत्रित असल्याचे दाखविले गेले आहे. कादंबरीमधील चित्रित अनेक प्रसंगातून त्यांच्या स्वभावातील शिस्त, कर्तव्यनिष्ठा, श्रमप्रतिष्ठा आणि बंडखोर राजकीय स्वभाव इ. वैशिष्ट्ये विशेष अधोरेखित होतात.

### ३.३.३.६ समाजवादी म्हातारा :

कादंबरीच्या प्रारंभीच सतत अस्वस्थ असणाऱ्या निवेदकाला काही दिवस गेल्यानंतर 'तुमच्यावर लक्ष आहे' वगैरे धमकी देणाऱ्या फोन प्रकरणाची थोडीशी सवय झालेली असते. अशावेळी ज्याला ऋषी वगैरे म्हणता येईल असा एक समाजवादी म्हातारा, गावात व्याख्यानाला येणार असल्याचे निवेदकाला समजते. देवकर, जोंधळेसह निवेदक त्या व्याख्यानासाठी जातो. तिथे खरेतर व्याख्यान असे झालेच नाही. त्या म्हाताऱ्याने शिस्तपर्वाला विरोध करत, जमलेल्या पन्नाससाठ मंडळीशी विनासंकोच गप्पा मारल्या. शिस्तपर्वाशी निगडित प्रत्येक प्रश्नावर मोकळ्या मनाने बोलला. विविध प्रश्न उपस्थित केले, त्याची उत्तरे दिली. आजूबाजूला शिस्तपर्वाचे एजंट असतील ह्या भीतीने प्रश्न न विचारणाऱ्या अनेकांना प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. शिस्तपर्वाविषयी विचार करायला सांगितले. म्हाताऱ्याच्या निर्भीड बोलण्याने सगळ्यांच्या डोक्यावरचा ताण हलके-हलके सैल झाला. हा म्हातारा निवेदकाला थोर आणि खऱ्या अर्थाने नेता वाटू लागतो. त्या दिवशी रात्रभर समाजवादी म्हाताऱ्याचे विचार निवेदकाचे डोके कुरतडत राहिले. म्हातारा डोक्यापासून अगदी इंचावर असलेल्या डोंगराकडे दुर्लक्ष करतोय आणि आपण क्षुल्लक कुठे कोणी फोन करतो म्हणून अस्वस्थ होऊन जातो, अशा विचारांनी निवेदकाला स्वतःचीच लाज वाटू लागली. म्हाताऱ्याच्या त्यावेळच्या व्याख्यान सदृश्य मांडणीतून निवेदकाला एका स्वरूपाची ऊर्जा मिळते. यातूनच आपल्या मर्यादेत राहून शिस्तपर्वाच्या विरोधात काहीतरी करण्याची निवेदकाची मानसिकता दृढ होते. त्याबाबत निवेदक देवकर, जोंधळेशी चर्चा करतो. सगळे मिळून मग जगातील सगळी सत्तांतरे ज्या मध्यमवर्गात झाली, त्यांच्यात स्वतःचे कार्यक्षेत्र शोधतात आणि मध्यमवर्गापुरते काम मर्यादित करतात. गुप्त संघटनेकडून येणारे बुलेटिन्स सायकोस्टाइल करायच्या आणि पोस्ट करायच्या कामाचे नियोजन पक्के होते. आपल्या परिसरातील मध्यमवर्गीयांचे पत्ते गोळा करणे, त्याच्या याद्या करण्याचे देखील काम सुरू करतात. याच्या मुळाशी समाजवादी म्हाताऱ्याच्या बोलण्याचा परिणाम होतो. एकूणच विचारनिष्ठा आणि धैर्याबाबतचे एक प्रतीक म्हणून कादंबरीमधील समाजवादी म्हाताऱ्याकडे आणि त्याच्या मांडणीकडे पाहता येईल.

### ३.३.३.७ स्त्री व्यक्तिरेखा :

'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीमध्ये स्त्री व्यक्तिरेखा म्हणून देखणी स्त्री, मिसेस देवगिरीकर, मिस मेहताब आणि निवेदकाची पत्नी अशा चार व्यक्तिरेखा विशेष ठळक होतात.

### अ) देखणी स्त्री :

कादंबरीतील देखणी स्त्री या व्यक्तिरेखेच्या चित्रणाने शिस्तपर्वाच्या काळातील अमानुषता ठळक होते. ती स्त्री एका सुशिक्षित कुटुंबातील असते. तिचा नवरा हा मोठ्या पगाराचा आणि चांगल्या श्रीमंत घरातील असतो. शिस्तपर्वाच्या काळात त्या स्त्रीच्या दोन दीरांवर सरकारने राज्यकर्त्यांच्या खुनाचा कट रचल्याचा आरोप ठेवलेला असतो. सरकार विरोधी गुप्तकार्यात सहभागी असणाऱ्या त्या दोन भावांना जेरबंद करण्यासाठी भल्याबुऱ्या विविध मार्गांचा बिनदिक्कत वापर करत असते. यातूनच त्या दोन्ही भावांच्या शोधातून त्या स्त्रीच्या नवऱ्याचा त्याच्याच घरी सरकारी यंत्रणेकडून अमानवी छळ केला जातो. मुख्यत्वे चळवळींमध्ये / सामाजिक चळवळींमध्ये स्वतःला वाहून घेतल्याच्या कारणाने तयार झालेल्या वातावरणामुळे त्या स्त्रीच्या नवऱ्याचे संबंध त्या दोन्ही भावाशी उरलेले नसतात. परंतु ते दोघेही शासनयंत्रणेच्या हाती लागत नसल्याने शासनयंत्रणा निरपराध असणाऱ्या त्या स्त्रीच्या नवऱ्याचा अमानवीय छळ करतात. ह्या सर्व गोष्टी त्या स्त्रीच्या नजरेसमोर होत असतात. हा छळ असह्य झाल्याने त्या स्त्रीचा नवरा आत्महत्या करतो. ह्या घटनेचा त्या स्त्रीच्या मनावर खोल परिणाम होतो आणि तिचे मानसिक संतुलन बिघडते. तिची अवस्था भ्रमिष्टासारखी होते. परिणामी ती बहुतेक लोकांना शिस्तपर्व विरोधात, पाशवी शासन व्यवहाराच्या विरोधात लढायला विनवत राहते. ह्याच कारणाने ती निवेदकाच्या देखील घरी जाते, आणि निवेदकाला शासन विरोधात लिहिण्याचा आग्रह करते. शिस्तपर्वाला पाशवी सामाजिक द्रोह म्हणत याला वाचा फोडण्याची, अशा पाशवी साम्राज्याला उखडून टाकण्याची विनंती निवेदकाला करते. सुरुवाती सुरुवातीला निवेदकाला ही स्त्री थोडी विचित्र वाटते. तिच्या देखणेपणामुळे तिने केलेली स्तुती, आर्जव अथवा त्यातून येणारा कंटाळा निवेदक सहन करत राहतो. नंतर दुर्लक्ष करत निवेदक तिला विशेष गांभीर्याने घेत नाही. पुढे मात्र जेव्हा देवकरकडून तिच्या कौटुंबिक वाताहतीची शोकांतिका कळते तेव्हा निवेदक हेलावून जातो. तिच्या भ्रमिष्ट असण्यामागील शोकांतिका उलगडते. भेटीच्या दरम्यान तिच्याशी असंवेदनशील वागल्याचा निवेदकाला पश्चाताप होत राहतो. कादंबरी कथानकातील निवेदकाचे फोनप्रकरण एकीकडे आणि त्या देखण्या बाईच्या दोन दिरांचा आणि नवऱ्याचा सरकारी यंत्रणेकडून होणारा छळ दुसरीकडे, यातून शिस्तपर्वाच्या दाबाची, छळाची तीव्रता स्पष्ट होण्यास मदत होते.

### आ) मिसेस देवगिरीकर :

कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या मिसेस देवगिरीकर व्यवसायाने प्राध्यापक आहेत. विविध सांस्कृतिक संस्थांमार्फत साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये त्यांना विशेष रस असे. शिवाय सूत्रसंचलनात, काव्यसंमेलनात किंबहुना काही काही समकालीन प्रश्नांवर चर्चा घडवून आणण्यात त्यांचा उत्साही सहभाग असे. त्या स्वतः कविता देखील करत. शिस्तपर्वाच्या काळामध्ये देवगिरीकर बाई भीतीच्या छायेखाली होत्या. याच काळात त्या निवेदकाशी काही कारणाने जवळीक साधण्याचा, त्याचा सल्ला घेण्याचा प्रयत्न करतात. याचे कारण त्या स्वतः ब्राह्मण आहेत आणि निवेदक हा शासनकर्त्या जातीचा असल्यामुळे त्याची ह्या कठीण काळात वेळप्रसंगी मदत होऊ शकेल असा त्यांचा अंदाज असतो. एका टप्प्यावर तर त्यांनी शिस्तपर्वाच्या समर्थनात कविता करून निवेदकाला वाचण्यासाठी देतात. मात्र निवेदक देवगिरीकरबाईंच्या अशा कोणत्याच उथळ गोष्टीला पूरक प्रतिक्रिया देत नाही. शिस्तपर्वानंतरच्या प्रांतिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देखील देवगिरीकर बाईंचा डायरी लिहिण्याचा प्रयत्न असतो, ती गोष्ट न जमल्यामुळे त्या कादंबरी लेखनाकडे वळतात. त्यासाठी पुन्हा त्यांना निवेदकाची मदत लागते. पुढे कादंबरी लिहिण्यातून बाहेर पडून त्या प्रकाशन व्यवसायामध्ये स्थिर होण्याच्या

प्रयत्नात असतात. आपल्या प्रकाशनातून एकीकडे वैचारिक-मौलिक लेखन तर दुसरीकडे गाइडस देखील प्रकाशित करण्याचा त्यांना मानस असतो. यावरून त्यांच्या उथळ स्वभावाचा प्रत्यय येऊ शकेल. एकूणच कोणतीही गोष्ट प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण करण्याचा देवगिरीकरबाईंचा स्वभाव नसतो, त्यांच्या कामातील धरसोडपणा खूप सहजपणे प्रतीत होत राहतो. प्रस्तुत कादंबरीतील एकूण पात्राशी तुलना करता देवगिरीकरबाईंची व्यक्तिरेखा ही सामान्य स्तरावर वावरते. शिस्तपर्वाच्या काळात साहित्यिक, विचारवंतांची लेचीपेची भूमिका अथवा भूमिकाच नसण्याचे प्रतीक म्हणून मिसेस देवगिरीकर यांची व्यक्तिरेखा कादंबरीकार पुढे आणतो.

**इ) मिस मेहताब :**

मिस मेहताब ही मूळची ओरिसा येथील एक सामाजिक कार्यकर्ती असते. समाजवादी म्हाताऱ्याच्या भाषण प्रेरणेने जेव्हा निवेदक देवकर आणि जोंधळे यांच्यासोबत शिस्तपर्वाच्या विरोधात एका संघटनेसाठी काम सुरू करतात, त्या दरम्यान मिस मेहताबची ओळख ह्या तिघांशी होते. मिस मेहताबला स्वतः महाराष्ट्राच्या सांस्कृतिक-राजकीय इतिहासाची ओळख असते. याच पार्श्वभूमीवर तिने येथील शिस्तपर्वाच्या विरोधात होणाऱ्या कामाचा आढावा घेताना महाराष्ट्राच्या पूर्व शौर्याला शोभेल असा विरोध नसल्याच्या मतापर्यंत येते. याउलट ओरिसामधील परिस्थिती तिला इथल्यापेक्षा बरी असल्याचे वाटते. याच काळात तिचा जोंधळेसोबत संवाद वाढतो. शिस्तपर्वानंतर देखील जोंधळे तिच्या संपर्कात राहतो. तिच्याच सांगण्याने जोंधळे प्रांतिक निवडणुकीमध्ये जनता पक्षाचा प्रचार करतो. पुढे जाऊन जोंधळे मिस मेहताबसोबत विवाहबद्ध होतो.

**ई) निवेदकाची पत्नी :**

प्रारंभीच्या निवेदकाच्या स्वभावाप्रमाणेच निवेदकाची पत्नी देखील कुटुंबकेंद्रित स्वभावाची आहे. तसेही कादंबरीमध्ये तिच्या चित्रणाने व्यापलेली जागा तशी कमीच आहे. निवेदकाला जोडूनच प्रारंभी तिच्याविषयीचा मजकूर कादंबरीमध्ये येतो. शिस्तपर्वाच्या काळात नव्याने ओढवलेल्या फोन प्रकरणामुळे निवेदकाच्या स्वभावात झालेल्या बदलाबाबत निवेदकाच्या पत्नीच्या मनात चिंता निर्माण होते. निवेदकाने तिला फोन प्रकरण सांगितलेले नसते. या काळात निवेदकाच्या स्वभावात झालेल्या बदलाबाबत ती खोदून खोदून विचारण्याचा प्रयत्न करते. शिवाय खरे काही सांगितले नाही तर माहेरी जाण्याची धमकी देखील देते. देखणी स्त्री घरी येण्याचा प्रसंग आणि निवेदकाचे तिच्याशी बोलणे याविषयी तिच्या मनामध्ये संशय निर्माण होतो. त्यांच्या संवादामध्ये बलात्कार, अत्याचार, अनुभव असे शब्द येत असल्याने तिची चिंता आणखी वाढते. तिचा आपल्या कुटुंबापलीकडील कोणत्याही सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घडामोडींमध्ये विशेष सहभाग नसतो. तिचे संपूर्ण जग केवळ कुटुंबापुरते मर्यादित असते. अर्थात निवेदकाच्या पत्नीचे कादंबरीतील चित्रण हे एका मध्यमवर्गाच्या चौकोनी कुटुंबातील गृहिणीसारखे आहे.

एकूण या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार करता असे लक्षात येते की, प्रस्तुत कादंबरीमध्ये एकवटलेल्या व्यक्तिरेखा ह्या जिवंत, ठसठशीतपणे पुढे येतात. त्या वेगवेगळ्या वयोगटातील आणि वेगवेगळ्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाच्या प्रभावाने घडविलेल्या अनुभवास येतात. कादंबरीतील प्रधान आणि पूरक व्यक्तिरेखांप्रमाणेच इतर व्यक्तिरेखा देखील कादंबरीला अर्थपूर्णतेच्या दिशेने खेचतात. उदा. गुरखा, बुराटे नामक विद्यार्थी, विविध जाती-

पोटजातीतील अनेक मंडळी इत्यादी. या मंडळींचा कादंबरीमधील वावर खूप सहज राहिलेला आहे. या मंडळींमुळे समाजाच्या विविध स्तरातील माणसांची संभाषणे कादंबरीमध्ये जागा व्यापतात.

### ३.३.४ आशयसूत्रे :

'दिवे गेलेले दिवस' ही कादंबरी १९७५ नंतरच्या काही एका निश्चित काळाला आणि त्यातील राजकीय व्यवहारांना अधोरेखित करत काही महत्त्वपूर्ण स्वरूपाची आशयसूत्रे पुढे आणते. मुख्यत्वे १९७५ ते १९७८ या काळातील भारताच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी आकाराला आली आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान होत्या. याकाळात निर्माण झालेल्या अराजकतेचे कारण पुढे करून २५ जून १९७५ या दिवशी देशाच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी संपूर्ण भारतामध्ये राजकीय आणीबाणी जाहीर केली. भारताचे तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी संविधानातील कलम ३५२(१) अंतर्गत २५ जून १९७५ पासून आणीबाणी जारी केली. याआधारे इंदिरा गांधी यांनी देशातील लोकशाही शासन व्यवस्थेला स्थगिती देत प्रशासनाचे सर्वाधिकार स्वतःच्या हातात घेऊन अनिश्चित काळासाठी भारतातील निवडणुका पुढे ढकलल्या. पुढे २१ मार्च १९७७ रोजी आणीबाणीचा निर्णय मागे घेण्यात आला. जवळपास २१ महिन्यांचा हा आणीबाणीचा कालखंड स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासामध्ये अंधारपर्व म्हणून ओळखला जातो. स्वतंत्र भारतात लोकशाहीची मूल्ये समाज मनात रुजण्याच्या काळामध्येच ही राजकीय आणीबाणी लादली गेली आणि त्याचा परिणाम येथील समाजमनावर आणि राजकारणावर खूप दूरगामी स्वरूपाचा झाला. आणीबाणीच्या काळामध्ये भारतभर हुकूमशाहीचे वातावरण होते. परिणामी व्यक्ती आणि संस्थांच्या सर्वप्रकारच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आपसूकच टाच आलेली होती. आणीबाणीच्या काळात देशातील बंडखोरी, अराजकता मोडीत काढण्याच्या कारणाने सरकारी यंत्रणेचा अत्यंत कठोर आणि जबरदस्तीने वापर करण्यात आला. आणीबाणीला विरोध करणाऱ्यांचा छळ केला गेला, अनेकांना तुरुंगात टाकले गेले. या काळामध्ये खूपसे बंडखोर-चळवळे लोक तुरुगांमध्ये अडकले गेले. पुन्हा सरकारी यंत्रणेला जी मंडळी संशयी वाटत होती, त्यांची धरपकड सुरूच होती. या काळात अभिव्यक्तीसारख्या मूलभूत स्वातंत्र्याला सरकारी यंत्रणेकडूनच धोका निर्माण झालेला होता. याच काळात देशातील लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी अशास्त्रीय, अमानवीय स्वरूपाने कुटुंबनियोजनाचे शिबिर अर्थात नसबंदी शिबिर राबविले गेले. एकवीस महिन्यांच्या आणीबाणीच्या कालखंडानंतर सहाव्या लोकसभेची निवडणूक होऊन पुढे वर्षभरामध्ये प्रांतिक निवडणुका जाहीर झाल्या. हा १९७८ चा कालखंड होता आणि तिथपासून राजकारणामध्ये अनेक अराजकीय गोष्टी वेगाने व्यापत गेल्याचे चित्र स्पष्ट आहे. अर्थात आणीबाणीच्या काळात देशातील एकूण व्यवहारात काही एक स्वरूपाचे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. व्यक्ती आणि संस्थात्मक व्यवहारात असुरक्षितता, भय पसरले होते. सरकारी यंत्रणांचा दडपशाहीवरील जोर वाढला होता. पुढे आणीबाणी हटवल्यानंतर घेतल्या गेलेल्या सार्वत्रिक निवडणुकांनी अविवेकी, अविचारी, सत्तालोलूप राजकारणाची सुरुवात केली होती. स्वातंत्र्य भारतानंतर अत्यंत ध्येयाने आणि प्रखरतेने सुरू झालेला शासन, प्रशासन आणि एकूण राजकीय व्यवहाराचा प्रवास आणीबाणीच्या एकवीस महिन्यांच्या कालखंडात बदलला. त्यानंतर तर आपल्याकडील एकूणच सामाजिक-राजकीय व्यवहारामध्ये एका अर्थाचा कमअस्सलपणा शिरला. आणीबाणी आणि आणीबाणीनंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सगळ्याची नोंद कादंबरी आपल्यासमोर उभी करते.

इ.स. १९७०-७५ पासूनच्या बदलत्या समाजकारण, राजकारणातील ताण्याबाण्यांचा व्यक्ती आणि समष्टीवरील परिणामशोध हा रंगनाथ पठारे यांच्या कादंबरी लेखनातील एक प्रधान आशयसूत्र म्हणून अधोरेखित करता येईल. पठारे यांची पहिली कादंबरी 'दिवे गेलेले दिवस' याला अपवाद नाही. स्वतंत्र भारताच्या बदलत्या राजकारणावर बेतलेल्या काही मोजक्या कादंबरीमध्ये रंगनाथ पठारे यांच्या या कादंबरीचे वर्णन करावे लागेल. ही कादंबरी १९७५ च्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर घडते. आणीबाणी लादली गेल्याने मराठी समाजाच्या व्यक्तिगत आणि राजकीय वर्तन व्यवहारामध्ये जे परिणाम उमटले त्याचे प्रातिनिधिक रूप 'दिवे गेलेले दिवस' मध्ये उतरले आहे. ही कादंबरी आणीबाणीच्या काळात सरकारी यंत्रणेने दडपशाहीतून निर्माण केलेले दशहतीचे चित्र पहिल्या भागातून व्यक्त करते. तर दुसऱ्या भागामध्ये आणीबाणीनंतरच्या काळातील सार्वत्रिक निवडणुकीचे आणि त्यातील अपप्रवृत्तीचे दर्शन घडविते.

१९७५ ते १९७८ या काळातील एकूण केंद्र आणि राज्य पातळीवरील काही छोट्यामोठ्या राजकीय घडामोडींचा कादंबरीतील कथानकाशी संबंध आहे. अर्थात संपूर्ण कादंबरी प्रस्तुत काळातील काही प्रमुख घटना-प्रसंगांवर बेतलेली आहे. उदा. व्यक्ती-समाजाच्या आविष्कार स्वातंत्र्यावर आलेली टाच, जोरजबरदस्तीने देशभर राबविली गेलेली नसबंदीची शिबिरे आणि यातून तयार झालेली दहशत-भीती, आणीबाणी संपल्यानंतर केंद्र आणि प्रांतिक पातळीवर झालेल्या निवडणुका, निवडणूक जिंकण्यासाठी वापरले जाणारे विचारशून्य मार्ग, पक्षांतर, प्रतिस्पर्धी उमेदवारांची बदनामी, विविध स्वरूपाच्या मूल्यहीन व्यूहरचना अशा प्रत्यक्ष वास्तवातील गोष्टींचा संदर्भ कादंबरी घेते. असे असले तरी वास्तवाच्या या संदर्भांना कादंबरी आपल्यामध्ये वाढवताना कादंबरीचे स्वरूप केवळ समस्याप्रधान राहत नाही. तर कादंबरी तत्कालीन घटना-प्रसंगांना छेदत एकूण मानवी जीवनावरच भ्रष्ट सत्ताकारांचा होत गेलेला परिणाम किती अविचारी आणि मूल्यहीन स्वरूपाने वाढला, याचे प्रत्यंतर घडवते. ही कादंबरी व्यक्तीच्या मूलभूत अस्तित्वविषयक संदर्भांना आपल्या कक्षेत घेत स्वतःचे समकालीन असणे सिद्ध करते. परिणामी ही कादंबरी १९७५ मधील घोषित आणीबाणीवर बोलताना कादंबरी आजच्या अघोषित आणीबाणी सदृश्य वातावरणात देखील तितकीच ठळक आणि ताजी वाटते.

या कादंबरीमध्ये आणीबाणीच्या काळाला प्रतीकात्मक स्वरूपात शिस्तपर्वाचा काळ म्हणून संबोधिले गेले आहे. एका तालुका स्तरावर प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या, अथवा संबंधित देखण्या बाईच्या भ्रमिष्टावस्थेला पोहचलेल्या व्यक्तींची उदाहरणे ध्यानात घेतले तर व्यक्तीच्या खाजगी आयुष्यातील घटनेने कादंबरी एका मोठ्या सामाजिक - राजकीय गोष्टींच्या परिणामांच्या भागाला जोडते. याच काळात कुटुंब नियोजनाच्या नावाखाली अत्यंत अमानवीय पद्धतीने सामूहिक नसबंदी शस्त्रक्रिया घडवून आणली जाते. त्यामध्ये लोकांच्या असाहाय्यतेचा, अज्ञानाचा, गरिबीचा देखील फायदा घेतला जातो. यामध्ये राजकीय सत्ताकांक्षाही दडलेली असते. अर्थात शस्त्रक्रिया शिबिरातून एकीकडे समाजातील बड्या धेंडांची आत्मकेंद्रीवृत्ती आणि सरकारी यंत्रणेची माणसांप्रती असणारी संवेदनशून्यता स्पष्ट होते. कादंबरीकाराने देवगिरीकरच्या माध्यमातून आणीबाणीच्या काळातील साहित्यसंस्कृती व्यवहाराचा आढावा घेतला आहे. कादंबरीकाराने देवगिरीकर आणि आणखी काही सहभागी व्यक्तींच्या माध्यमातून हे दाखवून दिले आहे की, अशा कार्यक्रमांमधून सामान्य स्वरूपानेच दर्शन घडत असते. बहुतांशवेळा अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी असणारी मंडळी ही कर्तृत्वाने कमी आणि उत्साहाने दांडगी असतात. खास करून देवगिरीकरच्या चित्रणाने आणीबाणीच्या काळातील सांस्कृतिक व्यवहारात स्थिरावलेल्या प्रतिनिधींच्या कातडीबचावू धोरणाचे स्वरूप अधोरेखित होते.

कादंबरीच्या दुसऱ्या भागात शिस्तपर्वाच्या समाप्तीनंतर होऊ घातलेल्या निवडणुकीचे तपशीलाने चित्रण येते की, ज्यातून शिस्तपर्वाच्या दाबातून ढासळत गेलेल्या राजकारणाचा पोत स्पष्ट होतो. खरेतर ह्याकडे कादंबरीतील एक महत्त्वपूर्ण आशयसूत्र म्हणून पाहावे लागेल. कादंबरी कथानकामध्ये येणाऱ्या पक्षातील अंतर्गत बंडाळी, कलह, आरोप-प्रत्यारोप दाखवत कादंबरीकाराने आणीबाणीनंतर गतिमान झालेल्या गटातटाचे राजकारण, प्रतिस्पर्धी उमेदवार पैशाच्या बळावर विकत घेणे, पक्षाची हलाकीची परिस्थिती पाहून पक्षांतर करणारे, आयुष्यभर एकमेकांच्या विरोधात असणारे दोन भिन्न विचाराची माणसं केवळ सत्तेसाठी एकत्र येणे, निवडून येण्याच्या क्षमतेला महत्त्व देताना पक्षविचार बाजूला ठेवणारे पक्षश्रेष्ठी अशा राजकारणात शिरलेल्या अराजकीय गोष्टींवर कादंबरीकाराने नेमकेपणाने बोट ठेवले आहे. या वातावरणामध्ये उजवा-डावा, पुरोगामी - प्रतिगामी असे संदर्भ विरून गेल्याचे चित्र स्पष्ट आहे. अर्थात केवळ सत्ताकांक्षांनी भारलेलीच नेतेमंडळी आजूबाजूला दिसू लागतात. शिवाय कादंबरीतील कथानकाला, त्यातील निवडणुकांना आपल्याकडील जातिव्यवस्थेच्या छटा आहेत. जाती आधारित मतदानाचा अंदाज उमेदवार किंबहुना पक्षाला देखील असते. जातीच्या आधारे जिंकण्या-हरविण्याची खेळी खेळली जाते. भारताच्या राजकारणाला जातीचे घट्ट संदर्भ आहेत, कादंबरीकाराने हे संदर्भ ध्यानात घेत विचार, तत्त्व यांना तिलांजली देत केवळ सत्ताकांक्षेला केंद्रस्थानी ठेवत वाढलेल्या समकालीन पक्षीय राजकारणाचे रूप उलगडले आहे. खरेतर आणीबाणीच्या टप्प्यावर सुरू झालेल्या ह्या गोष्टी देशाच्या, राज्याच्या राजकारणामध्ये नंतरच्या काळात अधिकच गतिमान झाल्या आहेत. पक्ष कोणताही असो, विचार काहीही असो मात्र कोणत्याही तडजोडीवर स्वतःच्या अस्तित्वाची पोळी भाजून घेण्याची मानसिकता एकूण राजकारणामध्ये दृढ झालेली दिसते. त्यामुळे आजतर पक्ष, पक्षनिष्ठा, विचार ह्या गोष्टी कमअस्सल ठरविल्या जात आहेत. परिणामी कोणताही नेता कोणत्याही पक्षामध्ये अत्यंत अलगद प्रवेश करतो. अथवा प्रवेश केलेला पक्ष कधीही सोडतात. पक्षांतरालाच एका अर्थाने बाजारू स्वरूप आल्याचे आजचे चित्र ठळक आहे. आपल्या कादंबरी रचनेतून "एक लेखक म्हणून पठारेंना राजकारणाचा आणि नीतिमत्तेचा काही संबंध असतो की नाही? असा प्रश्न निर्माण करावासा वाटतो आणि त्यातूनच ते नीतिभ्रष्ट राजकीय वर्तनाचे जळजळीत दर्शन घडवतात."[४] जी त्यानंतरच्या काळात देखील उत्तरोत्तर विवेकवादी राजकारणाकडे सरकली अशी नाही. अर्थात आणीबाणीच्या काळानंतर भारतीय राजकारणामध्ये शिरलेल्या तत्त्वहीन राजकारणाचे प्रत्यंतर प्रस्तुत कादंबरीमध्ये अनुभवास देते. या सगळ्यातून आपसूकच व्यापक जनहीत आणि लोकशाही मूल्यांना तडे जाताना दिसतात. आणीबाणीच्या उत्तर काळात ही परिस्थिती अधिकच गडद झालेली अनुभवास येते. अर्थात भारतीय राजकारणात अराजकीय वाटाव्यात अशा गोष्टींच्या घुसण्याचा काळबिंदू कादंबरीकार आपल्या कादंबरी लेखनाने अधोरेखित केला आहे.

आणीबाणीसारखे अंधारे पर्व भारतावर लादले गेल्यानंतर त्याचे पडसाद महाराष्ट्रातील एका प्रातिनिधिक तालुका पातळीवरील जनमनावर किंबहुना सामान्य व्यक्ती आणि व्यक्ती-व्यक्तींमधील, व्यक्ती-संस्थांमधील वर्तन व्यवहारांवर कसा झाला, याचा वस्तुपाठ ही कादंबरी वाचकांसमोर उभी करते. नव्याने आलेली व्यवस्था, व्यवस्थेतील विसंगती आणि माणसांचे या साऱ्यात अडकत जाणे पठारे या कादंबरीमधून मांडतात. माणसांची होणारी घुसमट, त्याची आगतिकता आणि या बाबींना थोपवण्याची हाताबाहेर गेलेली परिस्थिती या कादंबरीमधून व्यक्त होते. एका राष्ट्रीय घटनेचा एका तालुका स्तरावरील व्यक्ती आणि व्यक्तींच्या अन्य संबंधांवर होणारे परिणाम कादंबरी पुढे आणते. अर्थात एका तालुका स्तरावरील व्यक्ती-समाज आणि राजकारणावर एका राष्ट्रीय राजकीय घटनेचा होणारा परिणाम हा केवळ राजकीयच नाही तर

माणसाच्या अस्तित्वविषयक गोष्टींना देखील भिडणारा आहे. ही कादंबरी भोवतालच्या सामाजिक वास्तवाला आणि त्याचवेळी समाजाचा एकक असणाऱ्या व्यक्तीच्या आंतरिक-मानसिक पातळीवरील वास्तवाला चित्रणाचे केंद्र बनवते. माणसाच्या जगण्यातील हतबलतेचे अधोरेखन करतानाच ही कादंबरी आजूबाजूच्या पर्यावरणाचे उपहासात्मक चित्रण करते. यातून व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर येणाऱ्या मर्यादा, व्यक्तीच्या व्यक्ती आणि संस्थासंबंधांवर असणारे सामाजिक-राजकीय दाब, व्यक्तीचे एकाकी-एकटे होणे, सरकारी यंत्रणा- प्रशासनाला हाताशी धरून सर्वसामान्यांमध्ये निर्माण केलेले भीतीचे-संशयाचे - दहशतीचे वातावरण इ. गोष्टी कादंबरीच्या पहिल्या भागातील ठळक आशयसूत्रे म्हणून पुढे येतात. तर कादंबरीच्या दुसऱ्या भागात कल्याणकारी राजकारणाचे स्वरूप बदलत स्वार्थकेंद्री, सत्ताकांक्षी राजकारणाचे वाढते स्वरूप / नेते, उमेदवारांच्या वर्तनातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती आणि लोकांसमोर उभी केली जाणारी प्रतिमा ह्यामध्ये असणारे अंतर अशा अर्थाची आशयसूत्रे ठळक होतात. अर्थात व्यक्तीचे मर्यादशील स्वातंत्र्य आणि त्या स्वातंत्र्यावरील नियंत्रणे, व्यक्तीचे वर्तन व्यवहार निश्चित करणारे सत्तेचे राजकारण इ. गोष्टी पठारे यांच्या प्रस्तुत कादंबरीतील महत्त्वपूर्ण आशयसूत्रे म्हणून पुढे येतात. म्हणता येईल. तर दुसरीकडे संपूर्ण कादंबरीमधून तूटकपणे का असेना पण संबंधित अपप्रवृत्ती विरोधातील बंडखोरीचे देखील आशयसूत्र पुढे येते.

### ३.३.५ आविष्कार विशेष : निवेदन व्यवस्था आणि भाषाशैली :

कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये अगणित विषय, घटना, प्रसंग मोठ्या कालावकाशांसह स्वतःमध्ये सामावून घेण्याची क्षमता असते. एका अर्थाने नव्या जगाची उभारणी करत कादंबरी कल्पित आणि वास्तवाच्या असंख्य खुणा बुजवत अनेक खुणा नव्याने उलगडत वाढत असते. मुख्यत्वे कादंबरीकाराला जे सांगायचे, सुचवायचे, दाखवून द्यायचे असते ते तो आपल्या कादंबरीमध्ये मांडत घडवत असताना त्याला प्रत्यक्ष वास्तवाला समांतर नेत असतो. ही मांडणी जेव्हा आशयानुरूप उतरते तेव्हा संबंधित कादंबरीचे स्वतःचे रूपही सिद्ध होत असते. या अर्थाने रंगनाथ पठारे यांच्या पहिल्याच 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचा विचार करताना आपल्याला काही विधान करता येणे शक्य आहे.

'दिवे गेलेले दिवस' ही कादंबरी तशी दोन भागांमध्ये विभागली आहे. त्यातील पहिला भाग हा शिस्तपर्वाचा कालखंड आणि त्या एकवीस महिन्यातील काळात येणारे सरकारी यंत्रणेकडूनच्या मुस्कटदाबीच्या तपशिलांनी व्यापले आहे. तर दुसरा भाग हा शिस्तपर्वानंतरचा वर्षभराचा कालखंड त्यामध्ये चित्रित होतो, ज्यामध्ये केंद्रातील लोकसभेची निवडणूक झालेली आहे आणि प्रांतिक निवडणुकीतील गडबडी सुरू होऊन निवडणूक निकाल लागण्यापर्यंतचा काळ चित्रित झालेला आहे. यामध्ये पुन्हा कादंबरीमध्ये कादंबरी असे प्रस्तुत कादंबरीच्या आविष्काराचे रूप प्राप्त झालेले आहे. दिवेकरसोबत काम करताना निवेदकाने लिहिलेले बाड वाचल्यानंतर, जोंधळेनी दिलेली प्रतिक्रिया ध्यानात घेतल्यानंतर कादंबरी अंतर्गत लिहिल्या गेलेल्या कादंबरीचे स्वरूप खूप सहजपणे स्पष्ट होते. उदा. जोंधळे निवेदकाला म्हणतो, "छानच जमलंय तुला! शिवाय माझं आणि मिस मेहताबचं प्रकरण छानच खेळवलंयस. निवडणुकीचं राजकारण आहेच. आमच्या कवितेची फारच बदनामी केली आहेस बुवा!"[५] यावरून लक्षात येते की, कादंबरीमध्ये कादंबरी अशा अर्थाने कादंबरी शेवटाकडे वळते. अर्थात कादंबरीच्या आविष्काराचे स्वरूप ध्यानात येते, जे नियमित / पारंपरिक नसून प्रयोगशील वळणाचे आहे. ज्यामध्ये प्रारंभीच्या भागापासून निवेदकाने शिस्तपर्वानंतर ज्या प्रांतिक निवडणुका जाहीर होणे आणि निवडणूक निकाल लागेपर्यंतच्या काळामध्ये निवडणूक प्रक्रियेतील बारीकसारीक तपशील,

घटना-प्रसंग, एकीकडे स्वतःचे अनुभव तर दुसरीकडे समाजातील वेगवेगळ्या स्तरातील, जातीतील मंडळींनी दिलेल्या प्रतिक्रियांचा समावेश कादंबरीतील कादंबरीमध्ये झालेला आहे. परिणामी आणीबाणीनंतरच्या परिस्थितीचे निवेदकांनी केलेले वास्तवदर्शी निरीक्षण हे एकीकडे उपहासात्मक तर दुसरीकडे रूपकात्मक असे उतरले आहे. एकूणात निवेदकाच्या अशा लेखनातून कादंबरीला एका अर्थाने प्रयोगशीलतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

एका तालुका स्तरावरील महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या संवेदनशील व्यक्तिरेखेच्या खाजगी आयुष्यातील एका घटनेने कादंबरी सुरू होते. कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा जो कादंबरीचा निवेदक देखील आहे. निवेदकाच्या एका फोन प्रकरणाला कादंबरीकार १९७५ च्या देशातील आणीबाणीच्या घटनेला जोडतात. तसेच स्वरूप त्याला जोडून येणाऱ्या दुसऱ्या देखण्या स्त्रीची खाजगी आयुष्यातील एक व्यक्तिगत घटना आहे. ज्याचा संबंध पुन्हा देशातील आणीबाणीच्या घटनेशीच आहे. अर्थात व्यक्तीच्या खाजगी आयुष्यातील घटनांना एका मोठ्या राष्ट्रीय स्वरूपाच्या राजकीय घटनेचा भाग म्हणून कादंबरीतून पुढे आणले जाते. अर्थात निवेदक (फोन प्रकरण), देखणी बाई (निरापराध नवऱ्याचा छळ, पर्यायाने त्यांनी केलेली आत्महत्या आणि परिणामी संबंधित देखण्याबाईची भ्रमिष्टावस्था), देवकर (सरकारी यंत्रणेकडून झालेली अटक) यासारख्या कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून देशस्तरीय व्यापक स्तरावर घडणाऱ्या दहशतीच्या गोष्टी कादंबरीकार आपल्या कादंबरीमधून उमटवितो. यातून शिस्तपर्वाच्या काळामध्ये सरकारी यंत्रणेकडून होणाऱ्या दडपणाचे स्वरूप आणि त्यातील तीव्रता कादंबरीकाराने सहजपणे सूचविली आहे. एकूणच रंगनाथ पठारे यांना या कादंबरीमध्ये आणीबाणीतील दहशत, मुस्कटदाबी, सरकारी यंत्रणेचा आततायीपणा, हुकूमीवृत्ती, निवडणुकीतील मूल्यलोप, विवेकशून्यता, सत्ताकांक्षा या गोष्टी व्यक्ती या एककाच्या अंगाने दाखवता आले आहेत. कादंबरीमध्ये सातत्याने व्यक्ती आणि व्यक्तिकेंद्रित घटना अधोरेखित झाल्यामुळे कादंबरीला दुसरीकडे व्यक्तीच्या अस्तित्वाच्या शोधाचे देखील स्वरूप प्राप्त झाले आहे. कादंबरीच्या अशा विशेषांचा विचार करताना पठारे यांनी कादंबरीमध्ये वापरलेली निवेदनव्यवस्था आणि उपयोजिलेली भाषा विशेष अधोरेखित होताना दिसते. मुळात रंगनाथ पठारे यांच्या बहुतांश कादंबऱ्यांमध्ये कादंबरीची क्षमता वाढविणाऱ्या घटकांमध्ये निवेदनाचे स्वरूप आणि कादंबरीतील भाषेचे उपयोजन याला विशेष महत्त्व आहे. त्यांच्या कादंबरीतील निवेदनव्यवस्था आणि त्यासाठी त्यांनी घडविलेली भाषा या दोन्ही गोष्टी कादंबरीमध्ये चपखल रूप घेताना दिसतात. या पार्श्वभूमीवर 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीच्या आविष्काराचे विशेष ध्यानात घेताना त्यातील निवेदनव्यवस्था आणि भाषा उपयोजन या गोष्टींविषयीची चर्चा पुढीलप्रमाणे वाढवता येईल.

### ३.३.५.१ निवेदन व्यवस्था :

रंगनाथ पठारे आपल्या बहुतांश कादंबऱ्यांमध्ये मुख्यत्वे हुशार, सूक्ष्म निरीक्षणाची क्षमता असलेला संवेदनशील अशा स्वरूपाचा निवेदक निर्माण करतात. बहुतेकदा त्यांच्या कादंबरीतील केंद्रवर्ती व्यक्तिरेखाच कादंबरी निवेदक असल्याचे चित्र स्पष्ट आहे. त्यांच्या कादंबरीतील निवेदक संवादी असतो, किंबहुना संवादासाठी उत्सुक असतो. त्याच्या संवादांचे मुख्यत्वे दोन रूप असतात. म्हणजे तो स्वतःशी बोलता बोलता इतरांशी आणि इतरांशी बोलता बोलता स्वतःशी बोलत असतो. यातील बहुतांश गोष्टी 'दिवे गेलेले दिवस' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीतील निवेदकाला छेदून जाणाऱ्या आहेत. त्यांच्या कादंबरीतील निवेदनामध्ये सामाजिक जाणीव आणि वास्तवाचे नेमके भान असते. त्यांच्या निवेदनामध्ये व्यक्तीकेंद्रित विवेचनातून प्रारंभ

करून संदर्भ व्यापक करत त्याला सामाजिक-राजकीय करण्याची क्षमता असते. त्यामुळेच 'दिवे गेलेले दिवस' मधील व्यक्तीनिष्ठ अनुभव विस्तारत व्यापक होत १९७५ च्या राजकीय आणीबाणीशी जोडले जातात. या कादंबरीतील एक प्राध्यापक व्यक्तिरेखा, तोच कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. आणि कादंबरीचा निवेदकही आहे. हा निवेदक उच्चशिक्षित, संवेदनशील, उत्तम वाचन असणारा आणि सूक्ष्म निरीक्षण शक्ती असलेला आहे. राजकीयदृष्ट्या तटस्थ असणारा हा निवेदक हळूहळू शिस्तपर्वाच्या विरोधात काम करू लागतो. कादंबरीच्या पहिल्या भागामध्ये हा निवेदक कुणाच्या अध्यातमध्यात नसलेल्या स्वभावाचा असतो तर उत्तरोत्तर याच विभागामध्ये तो आमूलाग्र बदलत सामाजिक होत, शिस्तपर्वांच्या विरोधामध्ये कार्यरत होतो. यातून त्याच्या निवेदनातील गुंतागुंत वाढत, त्याच्या निवेदनाला महत्त्व येत कादंबरी त्याच्या आयुष्यातील घटना-प्रसंगांनी आकारताना राष्ट्रीय घटनांशी संबंध प्रस्थापित करते. या प्रक्रियेत कादंबरीमध्ये प्रथमपुरुषी निवेदन आले आहे. कादंबरीच्या दुसऱ्या भागात निवेदक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतःची काही निरीक्षणे, काही नोंदीतून रिपोर्टाज लिहिता लिहिता कादंबरीसदृश्य संहिता लिहितो. शिस्तपर्वानंतर जाहीर झालेल्या प्रांतिक निवडणुकीतील एकेक प्रक्रिया पुढे जाताना निवेदकाची त्याच्या मतदारसंघाबाबत, तेथील निवडणूक प्रक्रियेबाबत काही निरीक्षणे, नोंदी तयार होत जातात. ज्याची मांडणी कधी तृतीय पुरुषी तर कधी प्रथम पुरुषी रूप घेते. यामध्ये मग निवडणुकीतील उमेदवार, त्यांची सत्ताकांक्षा, त्यांनी आखलेल्या व्यूहरचना, जसजशी निवडणूक जवळ येते तशी अनेकांची बदलत गेलेली भूमिका आणि कृती, वेगवेगळ्यांच्या गाठीभेटी, याविषयीचे सविस्तर विवेचन, नोंदी, निरीक्षणे यांची वर्णने कादंबरीमध्ये येत राहतात. याचवेळी कादंबरीतील काही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखांच्या पलीकडे असलेले समाजातील विविध जातीसमूह, गटातटातील मंडळींच्या भूमिका, मतं यांचाही समावेश निवेदक आपल्या नोंदीमध्ये करतो. ह्या सगळ्यामध्ये कादंबरीमधील व्यक्ती-व्यक्तींच्या हितसंबंधांचे राजकारण गतिमान झालेले आहे की, जे कादंबरीच्या निवेदन प्रक्रियेतून कधी उपरोधिक, कधी सूचकपणे उघड होते. या कादंबरीच्या पहिल्या विभागामध्ये खरेतर प्रथमपुरुषी निवेदनाची आणि त्यातही आत्मकेंद्रित चित्रणाने व्यापलेली जागा अधिक आहे. असे असताना देखील कादंबरी व्यक्तिगत होत नाही. शिवाय ती एकीकडे आणीबाणीसारख्या व्यापक राष्ट्रीय गोष्टींबद्दल बोलत असतानाच तिच्यामध्ये व्यक्तींच्या अस्तिवविषयक काही मूलभूत प्रश्नांना भिडण्याची देखील क्षमता आहे, याचे मूळ या कादंबरीच्या निवेदन स्वरूपामध्ये आहे. कादंबरीच्या उत्तरार्धामध्ये निवेदनाचे स्वरूप काही वेळा प्रथमपुरुषी तर काही वेळा तृतीयपुरुषी होते. खरेतर असे स्वरूप प्राप्त होण्यामागील कारण निवेदकाने देवकरसोबत सुरू केलेल्या निवडणूक सर्वेक्षणात आहे. उत्तरोत्तर ह्या कामातील स्वरूप निवेदक स्वतःपुरते बदलून घेतो. त्याच्या डायरी लिहिण्याच्या मनसुब्याला तो कादंबरी रूप मिळवून देतो. त्यामध्ये मग निवडणुकीच्या प्रचारापासून निवडणूक निकालाच्या दिवसापर्यंतचे कथन समाविष्ट होते. शिवाय त्यात विविध जातीसमूह, गटातटाच्या प्रतिक्रियांचा प्रवेश होतो. परिणामी त्यातून कादंबरीला नंतरच्या भागामध्ये कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी रूप प्राप्त होते.

### ३.३.५.२ भाषा :

रंगनाथ पठारे यांनी आपल्या कादंबरीमध्ये निर्मिलेली भाषा आणि त्या भाषेला आशयाच्या परिघात खेचण्यास त्यांना मिळालेले यश लक्षणीय आहे. अर्थात त्यांच्या कथा-कादंबरीमधील भाषा उपयोजनाचे स्वरूप हे बहुतेकदा स्वतंत्र आणि काही अंशी शैलीदार वळणाने देखील जाणारी आहे. या पार्श्वभूमीवर 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील भाषेचे स्वरूप, त्यातील व्यक्तिरेखांचे निवेदन अथवा कादंबरीतील व्यक्तिरेखांमधील संवादाचे स्वरूप हे

स्वतंत्रपणे आविष्कृत होत असताना जाणवते. कादंबरीतील काही घटना-प्रसंगातील, व्यक्तिरेखांमधील अर्थशून्य व्यवहार स्पष्ट करताना कादंबरीतील भाषेला उपरोध-उपहासाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील भाषेचा विचार करताना आपल्या ध्यानात येते की, व्यवहारभाषा आणि साहित्याची भाषा यातील ठोकताळे पठारे यांनी जाणीवपूर्वक पुसून टाकले आहेत. कादंबरीमधील मध्यवर्ती घटक आणि त्याला जोडलेले संदर्भबिंदू पाहताना त्याला समाज व्यवहारातील अनेक संदर्भानी व्यापल्याचे चित्र स्पष्ट आहे. यातून त्यांच्या कादंबरीतील भाषेचे रूप अनेकवेळा समूहभाषेला देखील छेदत गेले आहे. कादंबरीमधील निवेदक आणि सुरक्षारक्षक गुरखा यांच्यातील संवाद असो अथवा कादंबरीच्या शेवटी निवडणुकांविषयी प्रतिक्रिया देणारे विविध जातीसमूहातील, गटा-तटातील लोकांच्या भाषेवरून वरील विधानाची प्रचिती येते. मुख्य म्हणजे कादंबरीमधील निवेदकाला चिंतन, आत्मचिंतनाची सवय आहे. याला जोडून कादंबरीची जेव्हा वर्णने येतात तेव्हा कादंबरीची भाषा ही प्रवाही होताना अनुभवास येते. जोंधळे, दिवेकर, निवेदकाची पत्नी, देवगिरीकर, प्राचार्य, भास्करराव इ. कादंबरीतील विविध व्यक्तिरेखा देखील त्यांच्या त्यांच्या भाषिक स्वभावाने अभिव्यक्त होताना दिसतात. निवेदक असो अथवा कादंबरीमधील उपरोक्त ठळक पात्र असो त्यांच्या स्वभावाला, वृत्ती-प्रवृत्तींना, सवयींना कादंबरीमध्ये विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे कादंबरीतील भाषा ही बहुकेंद्री रूप घेते. किंबहुना अनेकविध भाषिक स्वभावांचे कादंबरीमध्ये अपेक्षित मिश्रण झालेले आहे. एकूणच कादंबरीच्या पहिल्या भागामध्ये बहुतेकवेळा निवेदक स्वतः विविध गोष्टी कथन करतो, काही वेळा त्यांनी केलेली वर्णने येतात तर काही ठिकाणी त्याचे भाष्य येते. याने कादंबरीतील भाषिक स्वरूप बदलत गेले आहे. कादंबरीतील दुसऱ्या भागामध्ये पुन्हा विविध जातीसमूह, गटातटांमधील मंडळींच्या प्रतिक्रिया नोंदविताना कादंबरीमध्ये विविध भाषिक स्तरांचे मिश्रण येते. पुढे निवेदकांनी केलेल्या कादंबरीसदृश्य लेखनात देखील तो काही ठिकाणी स्वतःबद्दल बोलतो, परिणामी पुन्हा कादंबरीच्या मांडणीमध्ये लालित्यपूर्ण भाषेचा प्रवेश होतो. यावरून प्रस्तुत कादंबरीमध्ये भाषेच्या उपयोजनात वैविध्याचा प्रवेश होतो.

पठारे काही एका मूलभूत प्रयोजनांनी आपले लेखन करतात. आपल्या आस्थेच्या परीघात येणाऱ्या अनेक गोष्टींना आपल्या कादंबरी लेखनात मुरवितात. याचे प्रत्यंतर आपल्याला त्यांच्या पहिल्याच कादंबरीमध्ये येते. आपल्या लेखनामागील प्रेरणा सांगत असताना पठारे एके ठिकाणी असे म्हणतात की, "कुतूहल, अस्वस्थता, असमाधान, प्रश्नांनी वेढले गेल्याची भावना, प्रतिसाद वा प्रतिक्रिया देण्याची इच्छा, स्वतःला व्यक्त करण्याची आंतरिक सक्ती, मान्य न होणाऱ्या व्यूहाला प्रतिकार करण्याची ऊर्मी व कृती करण्याची इच्छा, वनस्पती, प्राणी, माणसे यांच्यातल्या नात्यासंबंधी आस्था, प्रेम व करुणा यांना सर्वसाधारणपणे लेखनामागच्या प्रेरणा म्हणता येईल."[६] त्यांनी स्पष्ट केलेल्या प्रस्तुत लेखन प्रेरणांनीच 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील आविष्काराचे स्वरूप घडलेले आहे. कादंबरीतील कथासूत्र, कथानक, व्यक्तिरेखांच्या निर्मितीवरून ही बाब ध्यानात येते. त्या आधारे मग पठारे प्रस्तुत कादंबरीमधून व्यक्ती आणि समाज यांच्या सहसंबंधांतील कुतूहल, येऊ घातलेल्या राजकीय संदर्भाबद्दल वाटणारे असमाधान, यातून व्यक्तीच्या जगण्याचा जो परीघ संकुचित होत चालला आहे त्याबाबतची अस्वस्थता, समाज चक्रव्यूहासारखा न सुटणाऱ्या पेचात खेचत चालल्याची भावना अभिव्यक्त करतात. या सगळ्याच्या आधारे कादंबरीकार आणीबाणीच्या स्वीकाराने आपल्याकडील एकूण सामाजिक आणि राजकीय अवकाशातील होत गेलेला बिघाड नोंदविण्याचा प्रयत्न करतो. त्यातील विदारकतेच्या स्वरूपाचे अधोरेखन करतो. मुख्यत्वे माणूस आणि माणसाचा भवताल समजून घेण्याचे कुतूहल या कादंबरी निर्मितीच्या मुळाशी आहे. एका कल्पित

जगाची निर्मिती करत पठारे यांनी आणीबाणीचा काळ जिवंत केला आहे. आणि या काळात एकूण जीवनव्यवहाराला आलेली अवकळा, त्याला कारणीभूत असलेली राजकीय स्थिती याला कादंबरीचा विषय बनविला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न 'दिवे गेलेले दिवस' या रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीचे आशयसूत्र स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.४ सारांश

रंगनाथ पठारे यांची लेखकीय क्षमता, लेखनकाळ, प्रत्यक्ष कादंबरीलेखन यांचे संदर्भ आणि 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचे वरील अर्थाने केलेले विवेचन-विश्लेषणाधारे काही सारांश स्वरूपाची मांडणी करता येणे शक्य आहे. मुख्यत्वे १९७५-८० नंतरच्या कालखंडात विलास सारंग, गौरी देशपांडे, श्याम मनोहर, शांता गोखले, अनिल दामले, मकरंद साठे इ. कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा विचार करता येईल. या मंडळींनी लिहिलेल्या कादंबऱ्या कादंबरी रचनेबाबत लक्षणीय ठरलेल्या आहेत. या नामावलीत रंगनाथ पठारे यांच्या नावाचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. १९७५ नंतरचा काळ हा पठारे यांच्या लेखनाचा गाभा राहिलेला आहे. या काळातील बदलते राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक घडामोडीतील वर्चस्ववाद, निरनिराळ्या व्यवस्थांतील सत्तासंघर्ष आणि यांचा सर्वसामान्यांवरील दाब हा पठारे यांच्या लेखनविश्वातील चिंतन विषय राहिलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील एकूण भारतीय समाज आणि राजकारणावर खोलवर परिणाम करणाऱ्या ज्या घटना घडल्या, पैकी १९७५ मधील आणीबाणीची घटना होय. ह्या संदर्भाने मराठी साहित्याने व्यापलेली जागा ही खूप कमी आहे. पैकी या अर्थाने जे काही मोजके प्रयत्न झाले त्यातील पठारे यांची 'दिवे गेलेले दिवस' ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी मानावी लागेल. अर्थात स्वतंत्र भारताच्या बदलत्या राजकारणावर बेतलेल्या काही मोजक्या कादंबऱ्यांमध्ये रंगनाथ पठारे यांच्या 'दिवे गलेले दिवस' चा उल्लेख शक्य आहे.

स्वतंत्र्य भारतानंतर अत्यंत ध्येयाने आणि प्रखरतेने सुरू झालेला शासन, प्रशासन आणि एकूण राजकीय व्यवहाराचा प्रवास आणीबाणीच्या एकवीस महिन्याच्या कालखंडात बदलला. त्यानंतर तर आपल्याकडील एकूणच सामाजिक-राजकीय व्यवहारामध्ये एका अर्थाचा कमअस्सलपणा शिरला. ज्याची नोंद कादंबरी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्यासमोर उभी करते. स्वतंत्र भारतात लोकशाहीची मूल्ये रुजण्याच्या काळात लादल्या गेलेल्या आणीबाणीच्या दिवसांचे वर्णन करताना कादंबरीकार त्याला 'दिवे गेलेले दिवस' असे संबोधतो. स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासामध्ये आणीबाणीचे पर्व हे अंधारपर्व म्हणूनही ओळखले जाते. यावरून कादंबरीकाराने दिलेले कादंबरी शीर्षकाची समर्पकता स्पष्ट होते. आणीबाणीचे पर्व हे अंधारपर्व म्हणूनही ओळखले जाते. यावरून कादंबरीकाराने दिलेल्या कादंबरी शीर्षकाची समर्पकता स्पष्ट होते. आणीबाणीच्या घटनेचा परिणाम तत्कालीन समाजव्यवहारावर कसा पडला हे दाखवता दाखवता पठारे त्याला माणसाच्या अस्तित्वालाच आणून भिडवतात.

परिणामी एका स्वरूपाचे अंधारी वातावरण संपूर्ण माणसाच्या असण्याला कशा पद्धतीने भिडलेले आहे याचे सूचन कादंबरी करते. कादंबरीत आणीबाणीने व्यक्ती व्यवहार आणि समाज-राजकीय व्यवहारांमध्ये पसरलेल्या अंधारमय परिस्थितीचे प्रत्यंतर घडविले. हाच आशय कादंबरीकार कादंबरीच्या शीर्षकातून अभिव्यक्त करतो. कादंबरीचा प्रारंभ कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र एका जगप्रसिद्ध कादंबरीकाराची कादंबरी वाचत असताना दिवे जाण्याच्या प्रसंगाने होतो. खरेतर या घटनेचा आणि कादंबरीतील कल्पित जगात झालेल्या अराजकतेच्या प्रारंभाचे एक प्रतीकात्मक सूचन आहे. या अर्थाने कादंबरीला दिलेले नाव हे कादंबरीत चित्रित झालेल्या जगासंदर्भाने अत्यंत पूरक असून एकाचवेळी संस्थात्मक आणि व्यक्तिगत जीवनात बेतलेल्या अंधाऱ्या संदर्भांना अधोरेखित करणारे आहे. अंतिमतः समाजातील अंधाऱ्या स्थितीला रूपकात्मक पद्धतीने दाखविण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून देखील आपल्याला या कादंबरीच्या शीर्षकाकडे पाहता येईल. याचा अर्थ कादंबरीकार केवळ आणीबाणीच्या काळाला प्रतीत करताना केवळ दिवे गेलेल्या दिवसांचे रूपक देत नाहीये. तर आणीबाणी नंतरची परिस्थिती देखील फसत आणि आणखी नवे गुंते निर्माण करत वाढत होती. त्याचाही परिणाम शीर्षकाशी लावता येईल. एकूणच भारतीय लोकशाहीमध्ये सत्ताकांक्षा, विचारशून्यतेचा शिरकाव होत होता; याचा समाज आणि व्यक्ती व्यवहारावर देखील परिणाम होत होता अथवा होत राहणार याच्या अंदाजातूनच कादंबरीकाराने 'दिवे गेलेले दिवस' असे शीर्षक योजिले असावेत, असे म्हणता येईल.

प्रस्तुत कादंबरीतील कथासूत्र आणि आशयसूत्रांमध्ये सातत्यपूर्ण समकालीन असण्याच्या शक्यता आढळून येतात. उदा. १९८२ मध्ये ही कादंबरी लिहिली गेली. या कादंबरीत आलेल्या सामाजिक-राजकीय घटनांचे संदर्भ हे पस्तीस-चाळीस वर्षाने आज देखील तितकेच समकालीन वाटावेत असे आहेत. मुख्यत्वे राजसत्तेची दमनकारी यंत्रणा ही खरेतर कोणत्याही काळात काम करत असते. ती काही काही वेळा घोषित स्वरूपाची असते तर अनेकदा ती अघोषित शिस्तपालनाचे रूप घेत असते. अशावेळी संशय, भय, असुरक्षितता ह्या गोष्टी एकूण समाजव्यवहारात आणि पर्यायाने व्यक्ती एक एकक म्हणून त्याच्याशी होणाऱ्या व्यवहारात जाणवते. त्यामुळे राजसत्तेतून प्रत्येक काळात निरंतर जन्मणारी दमन व्यवस्था अशा आशयसूत्राच्या परिणामातून या कादंबरीला समकालीन रूप देण्याचा प्रयत्न करते.

आपल्या नियमित चौकटी आयुष्यात जगणाऱ्या तालुका स्तरावरील एका प्राध्यापकाला शिस्तपर्वाच्या काळात 'तुमच्यावर लक्ष आहे' अशा अर्थाचा फोन येत राहतो आणि तिथून पुढे काही दिवस प्राध्यापकाचे जगणे विविध चिंता आणि संशयाने व्यापून जाते. स्वतःवर असलेले संशयी लक्ष कोण ठेवून आहे याचा शोध कादंबरीतील प्राध्यापक निवेदक घेऊ लागतो. मात्र त्याला कोणताही थांगपत्ता लागत नाही. अर्थात चेहरा नसलेला शत्रू शोधण्याचे काम प्राध्यापक करू लागतो. जे निव्वळ प्रतीकात्मक आहे. आजच्या काळाला कादंबरी समांतर जाण्यामागील काही कारणांमध्ये हेही आहे की, आजच्या सामाजिक वातावरणात बहुतांश लोक चेहरा नसलेल्या शत्रूसोबतच झगडताना दिसून येतात. अशा अवकाशाला कादंबरी प्रारंभापासूनच जिवंत करत नेते. आज तर अशी परिस्थिती आहे की, आपण अनेक समस्याने व्यापलेले आहोत आणि आपल्याला ह्या समस्यांच्या मुळाशी असणारा शत्रूच माहिती नसण्याच्या अनेक उदाहरणानी मानवी जीवनव्यवहार व्यापलेला आहे. आजच्या सामाजिक वातावरणात बहुतांश लोक चेहरा नसलेल्या शत्रू सोबतच झगडताना दिसून येतात. अर्थात बहुतांश समस्या प्रधान कादंबऱ्या ह्या त्या काळातील ती ती समस्या संपली की, निष्प्रभ होऊन जातात. काही कादंबऱ्या ह्या त्याही पलीकडे आपले अस्तित्व टिकवून असतात. पठारे यांच्या 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचे

नेमके असेच होते. आणीबाणी संपूनही आज काही दशके ओलांडून गेले मात्र प्रस्तुत कादंबरीचे समकालीन असणे आजही टिकून आहे. पठारे या कादंबरीमधून व्यक्तीच्या अस्तित्वविषयक प्रश्नांना जागा करून देतात की, जे प्रश्न भवतालच्या सामाजिक-राजकीय वातावरणाने निर्माण केलेले आहेत. किंबहुना कादंबरीतील व्यक्तीच्या अस्तित्वलक्ष्यी विवेचनाने कादंबरी निश्चित-नक्की केलेल्या काळापलीकडे खेचली गेली आहे. घोषित आणीबाणी ते आजच्या अघोषित आणीबाणीच्या कालखंडात प्रस्तुतची कादंबरी अधिक लख्खपणे समोर येते. केवळ भारतात नव्हे तर संपूर्ण जगभरामध्ये आज अनेक प्रदेशात अघोषित आणीबाणीचे चित्र ठळक आहे. किंबहुना आणीबाणी ही घोषित आणि अघोषित देखील असू शकते याचे प्रत्यंतर भारत-संपूर्ण जग तुकड्या-तुकड्याने गेल्या पस्तीस-चाळीस वर्षात सातत्याने अनुभवलेला आहे. मग या संपूर्ण पार्श्वभूमीवर रंगनाथ पठारे यांची 'दिवे गेलेले दिवस' ही कादंबरी आजही ताजी-नवी वाटते, असे म्हणणे मान्य होण्यासारखे आहे.

## ३.५ संदर्भग्रंथ सूची


१) थोरात, हरिश्चंद्र : 'कादंबरी विषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. १७७.

२) पठारे, रंगनाथ : 'दिवे गेलेले दिवस', शब्दालय प्रकाशन, श्रीमरापूर, दि.आ., २०००, पृ. १०.

३) तत्रैव, पृ. ५८

४) सप्रे, अविनाश : 'दिवे गेलेले दिवस : निर्मिती - प्रक्रियेचा शोध', तिरकसपणातील सरळता, संपा. गवस राजन, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९५, पृ. २२.

५) पठारे, रंगनाथ : 'दिवे गेलेले दिवस', उनि., पृ. १२९.

६) पठारे, रंगनाथ : 'आस्थेचे प्रश्न', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ. १४९.


## ३.६ संभाव्य प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) रंगनाथ पठारे यांच्या 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील कथानकाचे स्वरूप स्पष्ट करा.

२) रंगनाथ पठारे यांच्या 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीमधील आशयसूत्रांची विस्ताराने चर्चा करा.

३) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील राजकीय संदर्भांची चर्चा सोधाहरण करा.

४) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील प्रमुख पात्रांविषयी विस्ताराने लिहा.

५) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील मी या निवेदक व्यक्तिचित्राचे काही प्रमुख घटना-प्रसंगांच्या आधारे चित्रण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ‘दिवे गेलेले दिवस’ कादंबरीचे कथानक

२) ‘दिवे गेलेले दिवस’ कादंबरीतील व्यक्तिरेखा - अ) प्रा. जोंधळे

३) ‘दिवे गेलेले दिवस’ कादंबरीचे आशयसूत्र

४) ‘दिवे गेलेले दिवस’ कादंबरी शीर्षकाची समर्थकता

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ‘दिवे गेलेले दिवस’ या कादंबरीचा लेखनकाल कोणता आहे ?

२) ‘दिवे गेलेले दिवस’ या कादंबरीतील निवेदकाचे नाव सांगा.

३) या कादंबरीतील निवेदकाची पत्नी कोणत्या स्वभावाची आहे.

४) कादंबरीतील भास्करराव बेंडे यांना कोणत्या पक्षाचे तिकीट विनासायास मिळते ?

❖❖❖❖

# परिशिष्ट
# ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ कादंबरीसाठी पूरक वाचन

**पूरक वाचन :**

**१) संकल्प गुर्जर यांचे सौजन्य (२९ सप्टेंबर २०१९ च्या लोकसत्तामधील लेख) :**

कादंबरीकार अनिल बर्वे लिखित ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ ही मराठी कादंबरी अनुवादातून नेपाळ, श्रीलंका व भूतान या भारताच्या शेजारी देशांत पोहोचली आणि तेथील जनमानसावर कसा प्रभाव पाडून गेली, याचा आंतरराष्ट्रीय अनुवाद दिनाच्या (३० सप्टेंबर) निमित्ताने घेतलेला वेध.

दर वर्षी ३० सप्टेंबर हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय अनुवाद दिवस’ म्हणून साजरा केला जातो. अनुवाद ही खरे तर मूळ लेखनाइतकीच सर्जनशील कृती असते. चांगले अनुवादक हे दोन भाषांमध्ये आणि परिणामी दोन समाजांमध्ये पूल बांधण्याचे, सहकार्याच्या कक्षा रुंदावण्याचे व संवाद साधण्याचे काम करत असतात. अनुवादामुळेच उत्तमोत्तम साहित्यकृती भाषा-प्रदेश-संस्कृती-राष्ट्र-काळ यांनी घातलेल्या मर्यादांच्या पलीकडे पोहोचतात. अनुवादित साहित्याचा प्रभाव एखाद्या समाजावर कशाप्रकारे आणि कधी पडू शकेल, याची मूळ लेखकालाही कल्पना येऊ शकणार नाही. अनिल बर्वे यांच्या ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ या मराठी कादंबरीबाबत असेच म्हणता येऊ शकेल.

‘डोंगर म्हातारा झाला’, ‘अकरा कोटी गॅलन पाणी’, ‘थँक यू मिस्टर ग्लाड’, ‘स्टडफार्म’ आणि ‘आतंक’ अशा कादंबऱ्या ‘चर्मणावरती चंबळ’, ‘तिसरा डोळा’ यांसारख्या रहस्यकथा आणि ‘हमीदाबाईची कोठी’, ‘पुत्रकामेष्टी’ यांसारखी आठ नाटके याद्वारे मराठी साहित्यावर ठसा उमटवणाऱ्या लेखकांमध्ये अनिल बर्वे (जन्म : १९४८, मृत्यू : १९८४) यांचा समावेश होतो. साधारणतः १९७४ ते १९८४ हे दशक इतकाच बर्वे यांचा साहित्यिक कालखंड आहे. सर्वार्थाने राजकीय-सामाजिक अस्वस्थतेचा व लोकशाही व्यवस्थेला आव्हाने निर्माण होण्याचा असा हा काळ आहे. आर्थिक नियंत्रणे, महागाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई असलेल्या लायसन्स-कोटा-परमिट राजच्या त्या काळात सिनेमात खाणमालक, कारखानदार, जमीनदार अशा श्रीमंत वर्गाविरोधी भूमिका घेणारा व कृती करणारा अमिताभ बच्चनचा ‘अँग्री यंग मॅन’ लोकप्रिय झाला होता. बर्वे यांचे लेखन वाचताना सुद्धा वाचकांच्या मनात नकळतपणे प्रस्थापित व्यवस्था, श्रीमंत व्यक्ती, व्यापारी अशा ‘शोषक’ वर्गाविरोधी भावना तीव्र होत जातात; तर व्यवसाय विरोधी लढा देणारे, श्रीमंतांचा गर्व उतरवणारे, नक्षलवादी यांच्याविषयी आपसूकपणेच सहानुभूती दाटून येते. कम्युनिस्ट विचारसरणीशी बांधिलकी असूनही आपल्या लेखनाला प्रचारी न करणाऱ्या बर्वे यांची ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ ही कादंबरी मराठी भाषेतून अनुवादित झाली आणि नेपाळ, श्रीलंका व भूतान या भारताच्या शेजारी देशांवर प्रभाव पाडून गेली.

१९६७ साली पश्चिम बंगालमध्ये सुरु झालेल्या नक्षलवादी चळवळीने अनेक बुद्धिमान तरुणांना आकर्षित केले होते. त्याच चळवळीचा संदर्भ घेऊन लिहिलेली ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ ही बर्वेची पहिली कादंबरी. १९७५ साली आणीबाणी लागू केल्यानंतर ‘माणूस’ साप्ताहिकाच्या

दोन अंकांत ही कादंबरी प्रकाशित झाली होती. ग्लाड नावाच्या एका ब्रिटिश जेलरच्या तुरुंगात फाशीची शिक्षा झालेला वीरभूषण पटनाईक नावाचा, शिक्षणाने डॉक्टर असलेला एक तरुण, तडफदार नक्षलवादी येतो. आयुष्यातले शेवटचे काही दिवस राजमहेंद्री तुरुंगात कंठणाऱ्या या नक्षलवाद्याचा आत्मविश्वासपूर्ण वावर आणि उमद्या वर्तनामुळे कर्तव्यकठोर, क्रूर आणि निर्दयी ग्लाड साहेबाच्या मनोवृत्तीत होत गेलेले बदल असे कथानक असलेली ही केवळ १२ पानांची कादंबरी. ग्लाड साहेबांच्या एकुलत्या एका मुलीची अतिशय गुंतागुंतीची प्रसूती पार पाडणाऱ्या वीरभूषण पटनाईकला त्याच दिवशी फाशी देण्यासाठी नेले जाणार असते. मात्र, एखाद्या सामान्य गुन्हेगाराला देतात तशा प्रकारे फाशी न देता ग्लाड साहेब उलट त्याच्या छातीवर गोळी घालून त्या 'कॉम्रेड' ला वीरमरण देतो आणि वीरभूषण पटनाईक 'थँक यू मिस्टर ग्लाड!' असे म्हणत प्राण सोडतो. प्रत्येक पिढीतील संवेदनशील वाचकांच्या मनावर विलक्षण गारुड करणारी, एकाच वेळी बुद्धीला व भावनेला हात घालणारी आणि पुन:पुन्हा वाचायला आवडेल अशी ही प्रभावी कादंबरी. आज या कादंबरीतले संदर्भ बदललेले असले आणि नक्षलवादाचा राष्ट्रीय सुरक्षेला किती धोका आहे हे पुरेसे स्पष्ट झालेले असले, तरी आजसुद्धा ही कादंबरी अजिबातच कालबाह्य वाटत नाही.

या कादंबरीचे गुजराती, हिंदी अशा भाषांत अनुवादही झाले आहेत. अर्थात, कादंबरी प्रकाशित होऊन ४४ वर्षे झाली असली तरी अजूनही तिचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झालेला नाही. मात्र इंग्रजी अनुवाद झाला नसला, तरीही भारताच्या शेजारी देशांमध्ये ही कादंबरी किंवा त्यावर आधारित नाटक कोणत्या ना कोणत्या मार्गाने पोहोचलेले आहे. एप्रिल २०१८ मध्ये प्रसिद्ध श्रीलंकन नाटककार के. समन तुषार यांनी श्रीलंकेच्या नाट्यवर्तुळातील आघाडीच्या कलाकारांना सोबत घेऊन या कादंबरीवर आधारित नाटकाचे 'सेरादा सहोदरा' (इंग्रजी अर्थ : कॉम्रेड ब्रदर) या नावाने प्रयोग केले होते. श्रीलंकेतील प्रस्थापित शक्तींना, आक्रमक बुद्धिस्ट-सिंहली राष्ट्रवादाला विरोध करणाऱ्या डाव्या प्रवाहाला, संवेदनशील कलावंतांना हे नाटक जवळचे वाटल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. श्रीलंकेच्या सरकारने राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली केलेले अत्याचार आणि विरोधी आवाज दडपण्याचे जे प्रयत्न केले आहेत, ते पाहता हे नाटक करणे हीच एक मोठी सरकार विरोधी कृती आहे.

मात्र, या कथानकाचा श्रीलंकेपेक्षाही अधिक प्रभाव नेपाळमध्ये पडला आहे. ही कादंबरी बहुधा हिंदी अनुवादामुळे नेपाळी कलावंतांपर्यंत पोहोचली असावी. कारण मूळ कादंबरी प्रकाशित झाल्यानंतरच्या फक्त सातच वर्षात १९८२ साली नेपाळमध्ये या कादंबरीवर आधारित नाटक 'उसको कबितामा आबा को रुदैना' (मराठी अर्थ : त्याची कविता ऐकून कोण रडणार नाही) या नावाने तयार केले गेले होते. नेपाळी भाषेतील १,२०० हून अधिक टीव्ही मालिका आणि ६० पेक्षा अधिक सिनेमांत अभिनय केलेल्या रमेश बुधाटोकी या प्रसिद्ध अभिनेत्याच्या कारकीर्दीची सुरुवातच या नाटकापासून झाली होती. तेव्हा राजेशाही शासन असलेल्या नेपाळच्या काठमांडू, भद्रपूर या महत्त्वाच्या शहरांत या नाटकाचे प्रयोग झाले होते. यापैकी भद्रपूरमधील प्रयोगाच्या वेळेस सरकारी अधिकाऱ्यांनी या नाटकाला 'सेन्सॉर' केले आणि मगच प्रयोग होऊ दिला होता.

तिसऱ्या जगातील मागासलेल्या देशांत जुलमी राज्यकर्त्यांच्या विरोधात लढा देणारे, लोकशाहीची मागणी करणारे गट डाव्या विचारसरणीने प्रभावित झालेले असतात, असे आपल्याला अनेकदा पाहायला मिळालेले आहे. अन्याय करणारी प्रस्थापित सामाजिक-राजकीय व्यवस्था उलथून टाकून नवी 'न्याय' व्यवस्था प्रस्थापित करावी याचे आकर्षण तरुणाईला

नेहमीच असते. नेपाळही याला अपवाद नव्हता. राजेशाही शासन, मागासलेली समाजव्यवस्था असलेल्या व स्वतःला 'हिंदूराष्ट्र' म्हणवणाऱ्या नेपाळच्या तेव्हाच्या प्रतिगामी राजकीय-सामाजिक परिस्थितीत 'लोकशाही', 'स्वातंत्र्य' अशा क्रांतिकारी विचारांचा प्रचार या नाटकातून होई.

बुधाटोकी यांच्या गटाने हे नाटक नेपाळप्रमाणेच हिमालयाच्या कुशीत वसलेल्या व राजेशाही व्यवस्थाच असलेल्या भूतान या देशातही नेले होते. मात्र, हे नाटक तेथील राजाच्या विरोधी आहे असे वाटल्याने एका प्रयोगानंतरच या गटाला आपली अटक टाळण्यासाठी भूतान सोडायची वेळ आली होती. त्यानंतर पुढे १४ वर्षांनी, म्हणजेच १९९५-९६ मध्ये या कादंबरीवर आधारित 'बलिदान' नावाचा एक सिनेमा तुलसी घिमिरे या यशस्वी दिग्दर्शकाने नेपाळी भाषेत बनवला. नेपाळसारख्या देशात सिनेमातून असे कथानक मांडणे याचे काय परिणाम होऊ शकतात, याची कल्पना असूनही असा सिनेमा तयार केला गेला. यावरुन या कादंबरीचे 'अपील' काय असेल, याची कल्पना करता येऊ शकते. पावणेतीन तासांचा हा सिनेमा आज यूट्यूबवर पाहण्यास उपलब्ध आहे. या सिनेमावर २००५ मध्ये बंदी घातली गेली होती. मात्र, नेपाळमध्ये जी राजेशाहीविरोधी जनआंदालेने झाली, त्यात त्या सिनेमातील एक गाणे फारच लोकप्रिय झाले होते...

नेपाळमध्ये 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचे 'अपील' समजून घेणे कठीण नाही. नक्षलवादाची सुरुवात झाली. त्या ह्या बंगालमधील नक्षलबारीचा प्रदेशापासून नेपाळ आणि भूतान हे दोन्ही देश फारच जवळ आहेत. तसेच उत्तरेला आक्रमक, कम्युनिस्ट चीन आणि दुसरीकडे पश्चिम बंगालचे कम्युनिस्ट राज्य सरकार अशा शेजार या देशांना होता. सरंजामी व कर्मठ व्यवस्था असलेल्या नेपाळ व भूतान या देशांना राजेशाही विरोधी विचार प्रसृत होणे, लोकशाही, स्वातंत्र्य यांसारख्या मूल्यांचा प्रचार होणे नको होते. त्यामुळे या देशात अशा 'धोकादायक' नाटकांवर व डाव्या विचारांचे काम करणाऱ्या गटांवर बंधने होती. असे असले तरीही नेपाळच्या राजकारणामध्ये डाव्या विचारांचा प्रभाव १९८० नंतर क्रमाने वाढतच गेला. पुढे १९९६ ते २००६ अशी दहा वर्षे नेपाळ राजेशाही शासन विरुद्ध माओवादी गट अशा यादवी युद्धात सापडला. या युद्धात १६ हजारांहून अधिक लोक मारले गेले. हजारो लोकांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली.

यादवी युद्धाच्या काळात सरकारी फौजांशी लढणाऱ्या माओवादी सैनिकांपैकी अनेकांनी तुरुंगात असताना 'थँक यू मिस्टर ग्लाड' नेपाळी भाषेत वाचली होती. या कादंबरीला प्रज्वल श्रेष्ठ यांनी १९९८-९९ मध्ये नेपाळी भाषेत 'धन्यवाद, ग्लाड महोदय' या नावाने अनुवादित करून प्रसिद्ध केले होते. (नेपाळमध्ये अनुवादित कम्युनिस्ट पुस्तकांचा व मॅक्झिम गॉर्कीच्या 'आई' सारख्या कादंबऱ्यांचा खूपच प्रभाव होता.) या सैनिकांपैकी काही जणांनी असे नोंदवले आहे की, तुरुंगात असताना जेव्हा जेव्हा त्यांचा छळ होत असे, तेव्हा या कादंबरीने त्यांचे मनोधैर्य टिकवून ठेवले होते. अशा या पोलिसी छळापेक्षा आपल्यालाही 'वीरभूषण पटनाईक' सारखे मरण यावे असे त्यांना वाटत असे. एका मराठी साहित्यिकाच्या अनुवादित कादंबरीने शेजारी देशातील, मुख्यतः ग्रामीण भागातून आलेल्या अशिक्षित / अर्धशिक्षित सैनिकांच्या मनोवृत्तीवर असा प्रभाव टाकला होता, हा किती विलक्षण 'फेनॉमेनॉ' आहे!

अर्थात, यात जितका वाटा बर्वेंच्या लेखनाचा होता, तितकाच त्यांच्या कादंबरीचा अनुवाद करणाऱ्यांचाही होता. या कादंबरीचा नेपाळी समाजावरील प्रभाव पाहता, चांगल्या साहित्याची व त्याच्या अनुवादाची ताकद ध्यानात येऊ शकते.

**२) हा लेख लोकसत्ता या मराठी दैनिकात प्रसिद्ध झाला होता :**

साहित्य आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांना अल्प कारकिर्दीत आपल्या लेखनाचे नवे परिमाण देणाऱ्या अनिल सदाशिव बर्वे यांचा जन्म नाशिक येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण बीड, जालना, औरंगाबाद येथे झाले. अर्थशास्त्र हा विषय घेऊन ते बी.ए. झाले. शालेय जीवनापासूनच त्यांना लेखनाचे विलक्षण वेड होते. १९६७ पासून त्यांनी लेख लिहिण्यास सुरुवात केली. आपल्या परखड आणि स्वतंत्र विचारांना मुक्त व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांनी १९६७ मध्ये 'संग्राम' तर १९७३ मध्ये 'रणांगण' नावाचे पाक्षिक काढले आणि त्यातून शोषित पीडितांच्या अन्यायाला समाजाच्या वेशीवर टांगले. १९७० मध्ये 'फुलवा' नावाचे सिनेसाप्ताहिक काढले.

१९७३ साली त्यांची 'थँक यू मिस्टर ग्लाड' ही कादंबरी प्रकाशित झाली. 'थँक यू मिस्टर ग्लाड' ते 'फाशी गेट' १९७५ पासून १९८७ पर्यंत त्यांच्या एकूण आठ कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यांच्या जवळ-जवळ सर्वच कादंबऱ्यामधून समकालीन वास्तव घटनेतून साकारले आहेत. 'अकरा कोटी गॅलन पाणी' चासना येथील कोळसा खाणीतील हादरवून टाकणाऱ्या घटनेच्या संदर्भातून तर 'आतंक' तुरुंगातील एका कैद्याच्या भेटीतून अपरिचित अशा विषयांची मांडणी वाचकांसमोर ठेवते. समकालीन कादंबरीकार भालचंद्र नेमाडे, श्री. ना. पेंडसे, भाऊ पाध्ये ह्यांच्या साहित्यापेक्षा बर्वे यांची कादंबरी पूर्णतः वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे, याचा प्रत्यय येतो.

अनिल बर्वे यांचे साहित्य गुजराती, हिंदी, उडिया, तेलगू, मल्याळम, उर्दू, पंजाबी इत्यादी भाषांमध्ये अनुवादित झालेले आहे. त्यांच्या अनुवादित नाटकांचे रंगभूमीवर अनेक प्रयोग यशस्वी झालेले आहेत.

पत्रकार बर्वेही ललित लेखना इतकेच सामर्थ्यवान होते. आंध्रमधील नक्षलवादी चळवळ, बांगला देश युद्ध, चासनाला कोळसा खाण अपघात इत्यादी विषयांवरच्या त्यांच्या लेखमाला अतिशय गाजल्या. रिपोर्टाज लेखन प्रकाराचा एक आदर्श वस्तुपाठ म्हणूनही या लेखमालांचे विश्लेषण केले गेले. या सर्व लेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव आहे. भाषा सौंदर्यामुळे, वस्तुनिष्ठ आणि परखड भूमिकेमुळे हे लेखन दर्जेदार उतरले आहे.

'रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता' ते 'चर्मणावती चंबळ' या १९७२ ते १९८६ कालखंडातील एकूण पाच लेखमाला म्हणजे केवळ वृत्तान्त नसून ते इतिहासाचे दस्तऐवज आहेत.

नाटक, कादंबरी आणि रिपोर्टाज या क्षेत्रांत अनिल बर्वे यांनी एक नवा मापदंड निर्माण केला आणि साठोत्तरी मराठी साहित्याला अधिक समृद्ध आणि सधन केले. मुंबई येथे त्यांचे वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी निधन झाले.

❖❖❖❖

# नमुना प्रश्नपत्रिका
# द्वितीय वर्ष कला
# सत्र - III, मराठी अभ्यासपत्रिका क्र. - II

**सूचना :**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ कादंबरी या साहित्यप्रकाराचे विशेष नमूद करा. **(२०)**

किंवा

कादंबरीच्या विविध घटकांवर चर्चा करा.

प्र. २ 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीची भाषावैशिष्ट्ये नमूद करा. **(२०)**

किंवा

'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीचे कथानक थोडक्यात स्पष्ट करा.

प्र. ३ 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील राजकीय घडामोडीची चर्चा करा. **(२०)**

किंवा

'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील पात्रांचे वैशिष्ट्ये सांगा.

प्र. ४ प्रत्येक गटातील एकेक टीप लिहा. **(३०)**

अ)कादंबरीच्या कोणतेही दोन प्रकार

किंवा

कादंबरीतील व्यक्तिचित्रण

ब) 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील निवेदन

किंवा

'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील वेंधळा जमादार.

क) 'दिवे गेलेले दिवस' कादंबरीची भाषा

किंवा

'दिवे गेलेले दिवस' कादंबरीची निवेदन व्यवस्था.

प्र. ५ एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच) (१०)

१) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीमधील ग्लाड कशाचा प्रतिनिधी आहे ?

२) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील वीरभूषण पटनाईक याच्या पत्नीचे नाव काय ?

३) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील नक्षलवाद्याला कोणी गोळ्या घालून मारले ?

४) 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीतील ग्लाडच्या मुलीचे नाव काय ?

५) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीच्या लेखकाचे नाव काय ?

६) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील सुंदर स्त्री चा नवरा कशाने मरतो ?

७) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीचा निवेदक व्यवसायाने काय आहे ?

८) 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीतील निवेदकाला कोणत्या गोष्टीचे फोन येत असतात ?

❖❖❖❖

Curiginal

## Document Information

| | |
|---|---|
| **Analyzed document** | SYBA Marathi Paper II Semester III.pdf (D110894335) |
| **Submitted** | 7/31/2021 6:50:00 AM |
| **Submitted by** | Pandit Rajashri |
| **Submitter email** | rajashree@idol.mu.ac.in |
| **Similarity** | 0% |
| **Analysis address** | rajashree.unimu@analysis.urkund.com |

## Sources included in the report